-श्रावण गेलो भादवो आयलो
तारवं डेवरू या....
खोल खोल दरीयात् जाऊन....
मावरं मारू या....


हे पारंपारिक गीत गात गात त्यांनी तारवं-बोटी उतरल्या होत्या व ते सर्व आपल्या कामधंद्याच्या तयारीस लागले होते. खारेकुरण.... मुरबे.... सातपाटी बंदरांतील बोटी मासेमारीकरिता दर्यात

तुकाराम आरेकर हा तरूण तसा धार्मिक प्रवृत्तीचा. लहानपणापासूनच साईबाबांचा निस्सीम उपासक! त्यांच्या घरी आई विठाबाई, भाऊ दादाराम मास्तर, बंधु रोहिदास आणि बहीण वत्सला! सर्वच आरेकर कुटुंब साईबाबांचे भक्त. दररोज नित्यनियमानं सर्वजण साईबाबांच्या मूर्तीची गंध, पुष्प, फुलं वाहून व नैवेद्य दाखवून पूजा करतात. दररोज सकाळ,

मासे पकडण्यासाठी जाळी लावण्याकरिता कव मारताना मेढ्यास जाड दोरखंडाचा विळखा घालण्यात आला होता. कव मारण्याकरिता तुकाराम स्वत: समुद्रात उतरला व पाण्यात मेढा रोवण्याचे अवघड काम करू लागला. हे करीत असताना मेढ्यास घातलेल्या दोरखंडाचा विळखा तुकारामच्या उजव्या पायात अडकला आणि तो समुद्राच्या तळाशी ओढला

तळाशी काय चाललं आहे, या घटनेची काहीच कल्पना आली नाही. मात्र, एरवी कव मारण्यात पटाईत असलेल्या तुकारामला आज एवढा उशीर का झाला म्हणून ते सर्व चिंताग्रस्त होऊन लाटांची खळखळ उदासपणे पहात होते.

गुरूवारी दुपारची विशेष पूजा-अर्चा झाल्यानंतर नैवेद्य दाखवून तुकारामच्या आईने सर्वांना प्रसाद वाटला आणि थोडा वेळ त्या झोपेच्या आधीन झाल्या.



होतं आणि तुकाराम कव मारीत असतानाच दोरखंडाचा विळखा त्याच्या उजव्या पायाला बसला. तो त्यातून सुटका करायच्या प्रयत्नात असताना दोरखंडाचा बांधलेला खुंट सागराच्या तळाशी रोवल्यामुळे त्या खुंटाबरोबर तुकारामही तळाशी ओढला गेला आणि मृत्यूशी झुंज खेळू लागला. हे पाहून तुकारामची आई दचकून जागी झाली आणि स्वत:ला सावरून लगेच मुखमार्जन करून साईबाबांच्या आरश्यासमोर नतमस्तक होऊन साईंस विनवू लागली,

"हे साईबाबा, आजपर्यंत जवळजवळ २०-२५ वर्षे आम्ही तुझी मनोभावे सेवा करीत आहोत. नित्यनेमाने वर्षातून एकदा तुझ्या पुण्यपावन शिरडीस्थानी येतो. भक्तिभावानं पहाटेच्या काकड आरतीत सामील होतो. तुझी मनोभावे पूजा-अर्चा करतो. चादर, फुलं, हार, नारळ नम्र होऊन तुझ्या चरणी वाहतो. तुझ्या पांढऱ्याशुभ्र संगमरवरी समाधीचे दर्शन घेऊन तुझ्या पवित्र पायाशी नतमस्तक होतो आणि दर्यावर्दी मच्छिमार जीवनात उद्‌भवणाऱ्या संकटांस सामोरे जाण्यासाठी तुझा कृपाशीर्वाद मागतो, आणि साई, तुझ्याच कृपाछत्रानं आम्हाला आजपर्यंत तारलं आहे. तूच आजपर्यंत साथ दिली आहेस. तुझ्याच भक्तिप्रसादानं मुरबे गावात आम्ही सुखासमाधानानं जगतो आहोत. तुझाच भक्त असलेला तुकाराम आता यावेळी कुठे आहे, हे सर्व साई, तूच पाहतोस! तुझ्या कृपाछत्रानं तुकारामला मुरबे

(पृष्ठ क्र. २४ वर)

(पृष्ठ क्र. २३ वरून)

खाडीकिनारी सुखरूपपणे पोचव !''

तुकारामच्या आईचे नेत्र पाण्यानं भरून आले होते. साईबाबांची प्रसन्न मूर्ती डोळ्यासमोर उभी होती. जणू साईबाबाच म्हणत होते,

''घाबरू नकोस !''

''शांत हो !''

''धीर धर !''

''सबुरीने घे !''

तुकारामच्या मातेनं साईबाबांचे चरण-कमल घट्ट धरून ठेवले होते. तुकारामला प्रत्यक्ष डोळ्यानं पाहिल्यांशिवाय मी हे पाय सोडणार नाही, असा त्या माऊलीने निर्धार केला आणि ती माऊली तशीच पडून राहिली.

फेसाळणारा समुद्र खळाळत होता. गर्जत होता. लाटा कुजबुजत होत्या. सायंकाळचा सूर्य लालीलाल होऊन अस्तास जात होता, आणि त्याच सुमारास समुद्रात कव मारण्यास गेलेल्या बोटी एक-एक किनाऱ्याकडे परतत होत्या. मुरबेच्या या घटनेच्या बातमीनं तुकारामची बोट किनाऱ्याला केव्हा लागते, याची सर्वांनाच उत्सुकता लागली होती. किनारा जवळ करणाऱ्या बोटींत तुकारामची 'हरिहरप्रसाद' बोट येताना दिसली. सर्वजण किनाऱ्यावर उभे होते. तुकारामचे भाऊ, बहीण बोटीला पाहून, तुकारामला पाहून आनंदाने नाचू लागले. कुणीतरी तुकारामच्या आईला सांगायला गेले,

''आई, तुकाराम आला.... त्याची बोटही खाडीत आली.''

ते ऐकून ती माऊली गाढ निद्रेतून जागी व्हावी तशी जागी झाली. तुकाराम सुखरूपपणे येणार, हे तिला माहीत होतं.

खाडीकिनारी बोट लागताच तुकाराम व त्याचे सहकारी बोटीतून उतरून घरी आले, आणि भरसमुद्रात घडलेल्या घटनेची कहाणीच त्यांनी कथन केली. तुकाराम दोरखंडाबरोबर पाण्याच्या तळाशी कसा अडकला आणि मृत्यूशी झुंजत असताना अचानक त्याची सुटका कशी झाली, हे रसभरीत वर्णन करून त्यांनी सांगितलं. एक साथीदार म्हणत होता, दोरखंडाबरोबर समुद्राच्या तळाशी गेलेला कोणताच दर्यावर्दी आजपर्यंत जिवंत परत आलेला नाही, पण सुदैवानं या मृत्यूच्या दाढेतून तुकारामची सुटका झाली.

''होय !''

परमेश्वराच्या.... साईच्याच कृपेने मी वाचलो ! डोळीकरिता कव मारीत असताना, मेढ्यास दोरखंडाचा विळखा घालीत असताना त्या दोरखंडाचा विळखा माझ्या उजव्या पायात पडला आणि मी त्या विळख्यात अडकलो, खोल पाण्यात अगदी तळाशी ओढला गेलो. माझा मृत्यू त्या पाण्यात मला स्पष्ट दिसत होता. मी पाण्यातच गुदमरू लागलो. शरीराची अखेरची धडपड सुरू झाली. मी मनोमन साईंची प्रार्थना केली आणि अकस्मात माझ्या डोळ्यासमोर लख्ख असा तेजस्वी प्रकाश पडला ! तेजस्वी गोलाकार शक्ती माझ्याजवळ आली. त्या गोलाकार शक्तीच्या लांबलचक त्रिशूळाच्या नुसत्या स्पर्शानं माझ्या पायाला बसलेला दोरखंडाचा विळखा नाहीसा झाला, आणि माझे पाय मोकळे झाले. मी जोरदार मुसंडी मारून पाण्यावर आलो. माझे दर्यावर्दी सहकारी मलाच शोधत होते. मी बोटीच्या सुकाणूजवळ दिसताच त्यांनी मला ओढून बोटीत घेतले. मी वाचलो आणि बोटीतून सुखरूप किनारी आलो. तुकारामची आई सारं शांत व मन लावून ऐकत होती.

''ही साईंचीच कृपा बाळा ! तू समुद्रात संकटात आहेस, हे मला स्वप्नातच स्पष्टपणे दिसले आणि मी साईंची करूणा भाकली आणि त्यांच्या हाती असलेल्या त्रिशूळाने तुझी सुटका झाली !''

मुरबे खाडीकिनारी साईबाबांच्या देवळाजवळ हे सर्व ऐकणारी मंडळी भारावलेल्या मन:स्थितीत ऐकत होती. काही सुशिक्षित माणसे मनातल्या मनात ही भाकडकथा आहे म्हणून समजले असतील, पण तांडेल एका दोरखंडाच्या विळख्यातून सागराच्या तळाशी जाऊनही जिवंत परत येतो ! हा चमत्कार नजरेआड करता येत नव्हता ! भाविकच नव्हे, तर नास्तिकही भक्तिभावानं साईबाबांपुढे नतमस्तक झाले !

धन्य.... धन्य.... साई ! म्हणून सर्वांनी साईबाबांचा गजर केला. त्या दिवशी त्यांना जणू साईसाक्षात्कारच झालेला दिसत होता. ●

# वाळलेला उंबर हिरवळला !!



(प्रा. विश्वनाथ इप्पर, रिसोड, अकोला यांच्याकडून):

खरोखरच, श्री साईबाबा म्हटले की आपोआपच 'श्रद्धा आणि सबुरी' हे दोन अमृतकण चट्कन आठवतात. जणूकाही साईबाबा व श्रद्धा आणि सबुरी हे समीकरणच बनले आहे. मी जीवनात अतिशय आनंदी व सुखी आहे. त्यांच्या कृपेचे अनेक अनुभव मी अनुभवले आहेत. त्यातील हा एक....

मी १९७७ पासून दरवर्षी न चुकता दिवाळीला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शिरडीस जात असतो. साईबाबा मला व माझ्या कुटुंबाला शिरडीला येण्याची स्फूर्ती देतात. मी १९७७ ला जेव्हा शिरडीला गेलो होतो तेव्हा एक सुशिक्षित बेकार होतो. श्री साईबाबांच्या कृपेने आज मी प्राध्यापक आहे. त्यावेळच्या आणि आजच्या माझ्या आर्थिक, सामाजिक व मानसिक स्थितीत जमीन-अस्मानाचा फरक आहे. 'श्रद्धा आणि सबुरी' ह्या देन अमृतकणांचा मला खूपच अनुभव आला आहे.

दरवर्षीप्रमाणे १९९२ च्या लक्ष्मीपूजनासाठी मी कुटुंबासह शिरडीला गेलो होतो. आमच्या वाड्यात माझ्या पत्नीने ४ वर्षांपूर्वी उंबराचे एक रोपटे एका कुंडीत लावले होते. आपल्या हिंदू धर्मात उंबराच्या झाडाला (औदुंबर वृक्ष) पूजेच्या दृष्टीने खूप महत्त्व आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ आम्ही त्या रोपट्याला पाणी घालत होतो. शिरडीला जाताना त्या रोपट्याला पाणी घालण्यासाठी कुणाजवळतरी घराची चावी देणे आवश्यक होते; पण आमच्या हे ध्यानीच नाही आलं व आम्ही तसेच

# किती म्हणून अनुभव सांगू !

(सौ. सुप्रिया वारंगवाशी यांच्याकडून):

'श्रद्धा आणि सबुरी' – परमपूज्य श्री साईबाबांच्या ह्या दोन शब्दांची मला वारंवार प्रचिती आली आहे. बाबांना मी फक्त एवढेच सांगते की माझ्यावर संकटे आली तरी त्यांचा धीराने मुकाबला करण्याची शक्ती तुम्ही मला द्या! मी कधीच उपासतापास करीत नाही अथवा देवळात जाऊनं रोज पूजा-अर्चा करीत नाही. फक्त "ओम् श्री साईसमर्थ" या मंत्राचा उच्चार मात्र सतत करीत असते; आणि त्या मंत्राचे सामर्थ्य मी बरेचदा अनुभवले आहे. माझी मुलगी लहान असताना सारखी आजारी पडायची. डॉक्टरांनी तिला एखादा मोठा आजार असावा, अशी शंका वाटून त्यादृष्टीने तिच्या सगळ्या टेस्ट केल्या होत्या व त्याचे रिपोर्ट एका सोमवारी संध्याकाळी मिळणार होते. त्या दिवशी मी फारच घाबरलेल्या मनस्थितीत होते. सकाळी मी ऑफिसला जाण्यासाठी बसमध्ये बसले, तेव्हा मनात म्हटले की आज वाशी ते वरळी येथील माझ्या ऑफिसमध्ये जाईपर्यंत जर तीनदा मला साईदर्शन झाले तर तिचे सगळे रिपोर्ट नॉर्मल येतील. मला पूर्ण प्रवासात फक्त दोनदा साईदर्शन झाले. मी व्यथित मनाने ऑफिसच्या आवारात पाऊल टाकले आणि काय आश्चर्य ! माझ्या बाजूने एक कार गेली, त्यात माझ्या साईंचे चित्र होते. नकळतच भक्तिभावनेने माझे हात जोडले गेले व मी मनात म्हटले की सगळे रिपोर्ट आता नॉर्मलच येणार; आणि संध्याकाळी तसेच कळले.

दुसरा प्रसंग जुलै, १९९२ सालातील आहे. तेव्हा माझ्या मुलाला पॅराटायफॉईड झाला होता. ताप अजिबात उतरत नव्हता. रात्रीचे १२-३० वाजले होते. मी साईप्रतिमेसमोर दिवा लावला, साश्रूनयनांनी साईस्तोत्र वाचून काढले व मुलाच्या कपाळावर हात ठेवला. काही वेळातच घाम येऊन ताप उतरला.

तिसरा प्रसंग माझ्यावरच गुदरला होता. या विज्ञानयुगात कोणी विश्वास ठेवणार नाही, पण मी तो अनुभवला आहे. माझ्या एका कानाच्या पाळीवर गाठ आली होती. मी कुठलेही औषध न घेता सतत तीन दिवस कानाच्या पाळीला हात लावून साईनामाचा जप केला. चौथ्या दिवशी ती गाठ नाहीशी झाली.

आणखी एक प्रसंग लक्षात राहण्यासारखा आहे. २४/२५/२६ डिसेंबर अशी जोडून सुट्टी आल्यामुळे आम्ही अचानक शिरडीला जाण्याचे ठरविले. माझा छोटा मुलगा तेव्हा ८ महिन्यांचा होता. आम्ही संध्याकाळी शिरडीला पोहचलो, तेव्हा कडाक्याची थंडी होती. सगळी निवासस्थाने, धर्मशाळा व इतर रहाण्याची ठिकाणे भरलेली होती. रात्री अकरापर्यंत जागा शोधून आम्ही थकून गेलो व एका धर्मशाळेत रात्र काढावी म्हणून गेलो. तिथे कशीबशी जागा मिळाली, पण माझा मुलगा तिथली गर्दी बघून रडू लागला व झोपेचना. मी आमच्या ड्रायव्हरला म्हटले, चल, परत एकदा प्रयत्न करून बघू. आम्ही रस्त्यावर आलो तर एका म्हाताऱ्या गृहस्थाने आम्हाला विचारले,

"तुम्हाला जागा पाहिजे ना ! चला माझ्याबरोबर !"

आम्ही त्याच्याबरोबर एका हॉटेलमध्ये गेलो. तिथे एक खोली खाली झाली होती. संध्याकाळी त्याच हॉटेलमध्ये आम्ही चौकशी केली होती; पण अजून दोन दिवस तरी आमच्याकडे जागा मिळणार नाही, असे सांगण्यात आले होते. मी नंतर त्या वृद्ध गृहस्थाचे आभार मानण्यासाठी मागे वळून पाहिले तर तो तिथे नव्हता ! तो वृद्ध गृहस्थ कोण होता असेल, हे साईभक्तांनी ओळखले असेलच. असे आमचे बाबा विशाल मनाचे, सगळ्यांची काळजी घेणारे. जेव्हा जेव्हा मी अस्वस्थ होते तेव्हा फक्त साईनामाचाच जप करते. माझी पूर्ण खात्री आहे की माझे साई माझ्या आसपास सावलीसारखे आहेत. ●

शिरडीला गेलो. जवळपास एका आठवड्यानंतर आम्ही घरी परतलो. घर उघडताच आम्हाला तो उंबर एकदम वाळलेला दिसला. त्याची पाने वाळून खाली पडली होती. त्या उंबराची काडी आता केवळ इंधनासाठीच कामी येणार होती. मला, माझ्या पत्नीला, सर्वांना फारच वाईट वाटले. आमच्या घरातून जणूकाही देवच निघून गेला की काय ? अशी भीती वाटू लागली. मी लागलीच हात जोडले, डोळे मिटले व प्रार्थना केली,

"बाबा, आम्ही या दीड फूटाच्या रोपट्याला पुन्हा पाणी घालतो. हा उंबर पहिल्यासारखा हिरवा होऊ दे !"

बाबांनी माझी प्रार्थना ऐकली. आज या गोष्टीला १ वर्ष पूर्ण होत आहे. तो उंबर ४ फूट वाढला असून हिरवागार झाला आहे. (वाचकांच्या माहितीसाठी हिरव्यागार उंबराचे छायाचित्र सोबत दिले आहे.) वाड्यात पुन्हा प्रसन्नतेचे वातावरण दरवळू लागले आहे. कुणाचाही विश्वास बसणार नाही अशी ही घटना श्री साईबाबांच्या कृपेने, त्यांच्या श्रद्धा-सबुरीच्या मंत्राने घडली आहे. ●

## श्री साईंच्या ग्रंथाने नोकरी दिली !

(डॉ. मारूतीबाई राहाटे, सावनेर, नागपूर यांच्याकडून):

माझा मधला मुलगा देवेंद्र १९८८ साली पशुवैद्यक पदवी परीक्षा पास झाला; परंतु त्याला नोकरी नव्हती. प्रायव्हेट धंदा व इतर लघुउद्योग वगैरे करून पाहिले; पण आर्थिक लाभ पुरेसा नव्हता. त्यामुळे त्याच्या व पर्यायाने माझ्यासमोर नाराजी होती.

दिनांक ११-४-१९९३ रोजी देवेंद्र व मी बाहेर पडलो. ओढून नेल्याप्रमाणे आम्ही श्री साईमंदिरात (वर्धारोड, नागपूर) गेलो. समाधीमंदिरात पूजा करून आम्ही नव्यानेच बांधलेल्या द्वारकामाईत गेलो. देवेंद्रला नोकरी मिळावी म्हणून बाबांपुढे पदर पसरून मी नमस्कार केला व व्यथेची पुनरावृत्ती केली. नंतर दारात उभी राहून पुन्हा फोटोकडे पहात असताना एक अनोळखी, पिवळा ड्रेस घातलेली, सुंदर स्त्री येऊन मला म्हणाली,

"यह आप लीजिये !"

तिच्या हातात मोठा ग्रंथ होता. मला वाटले, ती पुस्तक-विक्रेती असावी. मी "नको" म्हणाले. पुन्हा ती म्हणाली,

"यह आप लीजिये !"

क्षणातच ती मला साईरूपी भासू लागली.

"मैं आपको यह प्रेझेंट कर रही हूँ।"


मला धन्य वाटले. साईप्रसादाच्या या अनुभवाने मला द्वारकामाईच्या कुशीत स्थान मिळाले. माझ्या पदरात सर्वश्रेष्ठ प्रसाद मिळाला. मी त्या देवता स्त्रीशी बोलले, तिचे उपकार मानले. त्या ग्रंथाचे नाव आहे 'श्री साईगीता'. तो ग्रंथ मी साईचरणी ठेवला व घरी आणला. वाचन सुरू केले. एकदा वाचायला घेतला, तर वाचतच राहावे, असा चित्तवेधक आहे.

दिनांक १८-४-९३ रोजी देवेंद्रला खासगी कंपनीत नोकरी लागली. तो आज नांदेड येथे श्री साईकृपेने आनंदात आहे.

दिनांक ५ मे, १९९३ ला माझा लहान मुलगा संजय याला विद्युत् केंद्र, कोराडी, नागपूर येथे नोकरी लागली.

मी व माझा मोठा मुलगा डॉ. निशिकांत आरोग्य प्रशिक्षण केंद्र, सावनेर येथे नोकरीला आहेत. ●

# "कृतांताच्या दाढेतून काढीन मी निजभक्ता ओढून !"



(श्री. मधुकर चव्हाण, संगमेश्वर, रत्नागिरी यांच्याकडून):

२६ मार्च, १९९३ रोजी सुट्टी संपवून नोकरीवर हजर होण्यासाठी मी साखरपा येथून चिपळूणमार्गे खेडला एस्.टी. बसमधून प्रवास करीत होतो. चिपळूण स्टँड सोडून गाडी खेडला निघाली. गाडी चिपळूणपासून सुमारे ४ कि.मी. आली. परशुराम घाट चढायला लागली. त्याचवेळी मला अस्वस्थ वाटायला लागले. गाडी लोटे या गावात आली आणि माझ्या छातीमध्ये कळा येऊन असह्य वेदना व्हायला लागल्या. तब्येतीत काहीतरी बिघाड झाला आहे आणि पुढील प्रवास होणे शक्य नाही, असे वाटू लागले. श्री साईबाबांच्या नावाचा जप "श्री साई समर्थ" अंत:करणामध्ये जोरात सुरू होता. अशा असहाय्य अवस्थेत मी लोटे येथे उतरलो व तेथील एस्.टी. पीकअप शेडमध्ये जावून झोपलो. श्री साईबाबांच्या नावाचा जप अखंड सुरू असतानाही मनामध्ये अनेक भयानक विचारांचा गोंधळ सुरू झाला. इतक्यात माझे मित्र, जे ग्रामसेवक म्हणून लोटे येथे काम करतात, ते तेथे आले व मला लगेच तेथून डॉक्टरकडे घेऊन गेले. त्यावेळी श्री बाबांचे वचन स्मरणामध्ये असल्यानेच लगेच आठवले, "प्रेमे घेईल जो मन्नामा, तयाच्या मी सकल काम पुरवी प्रेमा वाढवी." या आश्वासनाप्रमाणे बाबाच ग्रामसेवकाच्या रूपाने प्रथम धावले व तेथे माझ्यावर औषधोपचार होऊन मी माझ्या घरी साखरपा येथे गेलो.

छाती सारखी भीतीने धडधडतच होती. दोन दिवसांनी बरे वाटले. माझ्या मूळ पोटाच्या दुखण्यावर (अल्सर) डॉक्टरांनी उपचार चालू केले. परंतु तब्येत सुधारण्याऐवजी बिघडत गेली. त्यामुळे तेथून मला स्पेशल गाडी करून रत्नागिरी येथील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. तज्ञ डॉक्टरांनी पूर्ण तपासणी केल्यानंतर निदान केले,

"तुम्हाला हृदयविकाराचा झटका आला होता ! रोग हृदयविकाराचा व उपचार मात्र अल्सर या दुखण्यावर केले गेले."

मनात जबरदस्त भीतीची लाट उसळली. डॉक्टरांनीच मला धीर दिला,

"पहा, मी माझे उपचार करीत आहे. जो तुम्हाला झटका आला त्यातून तुम्ही तुमच्या दैवानेच वाचलात. तरी, त्या परमेश्वराचे स्मरण करीत औषधोपचार घेत जा ! तुम्हाला चांगले बरे वाटेल."

बाबांच्या नामावर विश्वास ठेवला म्हणून बाबांनी मला वाचविले

"श्री साई समर्थ पाठीशी असताना तू व्यर्थ चिंता का करतोस !"

जो विनम्रतेने शरण गेला त्याला सर्व आधीव्याधीतून बाबा मुक्त करतात. कोणत्याही रूपाने साईभक्तांच्या हाकेला धावून येतात.... आणि बाबांवरील प्रेम अधिकच दृढ होते.

ज्याप्रमाणे गंगा, यमुना, सरस्वती ह्या नद्यांच्या प्रवाहास कधीच खंड पडत नाही त्याप्रमाणे श्री साईसमर्थ नामाची गंगा माझ्या अंत:करणात अखंड चालू राहू दे, असे माझे अंतर्मन मला सांगू लागले. नंतर श्री साईंच्या कृपेने बरा होऊन ५ महिन्यानंतर नोकरीवर हजर झालो. दयाळू, कृपाळू बाबांना माझे कोटी-कोटी प्रणाम. अशात्ऱ्हेने यापुढे हाताने काम व मुखी अखंड "श्री साईनाम" असा माझा पुढील जीवन-प्रवास सुरू आहे व असाच कायम राहो, अशी श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना.

# "साई साई नित्य म्हणावे"

(श्री. सदानंद गुंजाळ, कांदिवली (पूर्व), मुंबई यांच्याकडून):

श्री साईनाथांचं स्मरण करून मी माझ्या जीवनात प्रत्यक्षात घडलेला प्रसंग थोडक्यात लिहीत आहे. संकटाच्या वेळी बाबांचा धावा केल्याने संकट निवारण झाले, असा हा प्रसंग.

आम्ही सहकुटुंब (आई-भाऊ-बहीण-भाओजी-मुले) २० एप्रिल, १९९२ रोजी वज्रेश्वरी देवीचे दर्शन व ऐतिहासिक गरम पाण्याचे झरे पहावयास गेलो होतो. प्रवास-दर्शन-प्रसाद-भोजन-मनोरंजन व नैसर्गिक वातावरणातील आनंद उपभोगून संध्याकाळी ६-०० च्या दरम्यान घरी निघालो. मुले-मंडळी दिवसभराच्या थकव्यामुळे व गाडीमध्ये येणाऱ्या थंड हवेमुळे झोपेचा आनंद घेत होती.... हायवेवर कुठेतरी अपघात झाला असावा.... दीडतास आमच्या गाडीचा प्रवास कासवाच्या चालीप्रमाणे चालला होता. नंतर पुढे रस्ता मोकळा मिळाला व उशीरही झाला होता, म्हणून आमच्या ड्रायव्हरला वेगाने गाडी चालविण्याचा मोह आवरेना. आई वारंवार सांगत होती, गाडी हळू चालव, गाडी हळू चालव; परंतु इतर गाड्यांना मागे टाकत आम्ही भरधाव निघालो. इतक्यात प्रचंड आवाज झाला. काय झाले कळण्यापूर्वीच आमची गाडी आमच्यासहित रस्त्यावर आडवी होऊन फरफटत जात होती. आतील मंडळींच्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. क्षणभर तर असे मनी येऊन गेले की आपण आता इथेच संपलो. पण काय विलक्षण चमत्कार ! सर्व मंडळी सुखरूप होती. माझा हात मागे गाडीखाली सापडला होता, त्यामुळे बाहेर पडणे शक्य नव्हते. रस्त्यावरील मंडळींनी गाडी उचलल्यावर मी बाहेर आलो व आतील मंडळींना बाहेर काढले. सगळी सुखरूप होती. मी बाबांचे लाख लाख आभर मानले. बाबांनीच अप्रत्यक्षरीत्या आम्हाला मदत केली होती. रस्त्यावरील मंडळींची मदत, पोलिसांची मदत, दुसऱ्या गाडीने घरापर्यंत पोहचविणे, डॉक्टरांनीसुद्धा अल्पशा मोबदल्यात मला पूर्णपणे बरा करणे इत्यादी.... सर्वकाही गोष्टी

# बाबांच्या दर्शनाला गेलो आणि बॉम्बस्फोटातून वाचलो !

(श्री. एकनाथ सावंत, भांडुप (पश्चिम), मुंबई यांच्याकडून):

श्री साईंच्या कृपाशक्तीमुळे मी एका मोठ्या अपघातातून वाचलो. १२ मार्च, १९९३ ची गोष्ट. शुक्रवार होता. मी शेअरबाजारच्या बिल्डिंगजवळून चाललो होतो. आर्मी नेव्ही (ईराणी) हॉटेलजवळ एक साईंचं मंदिर आहे, त्या ठिकाणी मला साईंनी नेहमीप्रमाणे नमस्कार करायला थांबविले.... तेवढ्यातच तिकडे शेअर बाजारच्या बिल्डिंगमध्ये बॉंबस्फोट झाला आणि धुराच्या व आगीच्या प्रचंड लाटा बाहेर पडल्या. जर मला साईबाबांनी तिथे थांबविले नसते तर मला मृत्युमुखी पडावे लागले असते. बाबांची ही कृपा अशीच सर्वदा आम्हा सर्व भक्तांवर राहो, ही त्यांच्या चरणी प्रार्थना.

# बाबांच्या कृपेने बाळंतपण सुखरूप झाले !



(कु. निरूपमा मोरजे, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई यांच्याकडून):

**मी** ५-६ वर्षांपासून साईभक्त आहे. माझ्या सर्व मनोकामना बाबांच्या कृपेने पूर्ण झाल्या, अजूनही पूर्ण होत आहेत आणि यापुढेही पूर्ण होत रहाणार. अशा या कृपाळू, दयावंत बाबांना आम्हा सर्वांचे प्रथम कोटी कोटी प्रणाम.

बाबांची लीला अगाध आहे. बुधवार, दिनांक १८-८-९३ रोजी माझी वहिनी सकाळी नेहमीप्रमाणे साडेसहा वाजता उठली व आईला आपण लवकर हॉस्पिटलमध्ये जाऊ असे म्हणू लागली. वहिनीची डिलीव्हरीची तारीख १५ ऑगस्ट होती व १६-१७ ला अमावास्या होती. आम्हाला तीच काळजी होती. त्यातून ती सहीसलामत सुटली. दिनांक १८ रोजी आई, भाऊ व वहिनी, आम्ही रहातो, त्याच अंतरावर एक हॉस्पिटल आहे, तिथे प्रथम गेली. तिथे वहिनीला ॲडमिट केले. आई कपडे घेऊन घरी आली. भाऊ तिथेच थांबला. आई येऊन दहा ते पंधरा मिनिटं झाली असतील, तोच भाऊ घरी आला. त्यावेळी त्याचा चेहरा उतरलेला दिसला. आईने विचारले, तेव्हा कुपर हॉस्पिटलसाठी लिहिलेली चिठ्ठी त्याने दाखवली. मुल आडवं आहे, असे डॉक्टरने सांगितलं होतं. घरी आम्ही तिघंच होतो. काय करावं, काहीच सुचत नव्हतं. तरीपण बाबांवर श्रद्धा ठेवून आई व भाऊ वहिनीला घेऊन कुपर हॉस्पिटलला गेली. मी घरात एकटीच होते. पटकन न्हाणीघरातून मी बाहेर आले. देवाजवळ निरांजन पेटत होतं, त्यात मी आणखी तेल घातलं आणि नेहमीप्रमाणे बाबांना हात जोडून विनंती केली, ''बाबा, तुम्ही दयाळू, कृपाळू आहात. आजपर्यंत प्रत्येक संकटातून तुम्ही आमची मुक्तता केली. तशीच सोडवणूक या संकटातून वहिनीची करा ! कुपर हॉस्पिटलमध्ये सर्व रिपोर्ट नॉर्मल निघू दे ! डिलीव्हरीही नॉर्मल होऊ दे ! तुम्हीच आमच्या घरात या ! तोपर्यंत हा दिवा विझणार नाही, अशी प्रार्थना करून मी माझे काम करण्यास गेले. अधून-मधून दिवा विझू नये याची काळजी घेत होते. चार वाजता आमच्या शेजारच्या मुलाला बोलावून सर्व परिस्थिती समजावून सांगितली. ताबडतोब तयारी करून तो कुपर हॉस्पिटलमध्ये गेला. थोड्याच वेळात, म्हणजे संध्याकाळी ४-३० वाजता भाऊ घरी आला व त्याने सांगितले की वहिनीचे रिपोर्ट चांगले आले आहेत. सिझेरियन न होता नॉर्मल डिलीव्हरी होईल; परंतु थोडा वेळ लागेल. हे ऐकून बाबांचे मनोमन आभार मानले. संध्याकाळी ६ ची वेळ दिली गेली. त्यानंतर रात्री दहाची. छोटा भाऊ आईला डबा घेऊन रात्री ९-३० वाजता गेला, तो रात्री १२-३० ला घरी आला. तरीसुद्धा डिलीव्हरी झाली नव्हती. मागाहून आलेल्या स्त्रियांची डिलीव्हरी ताबडतोब होत होती.... दिवा पेटत होता. मी सहज बोलून गेले, उद्या गुरूवार आहे.... बाबा नक्की येणार.... आणि काय आश्चर्य ! पहाटे पावणेपाचला भाऊ घरी आला, मुलगा झाल्याची बातमी घेऊन. नॉर्मल डिलीव्हरी झाली, हे ऐकून किती आनंद झाला म्हणून सांगू तुम्हाला ! दिवा रात्री पावणेदोनपर्यंत होता. डिलीव्हरी रात्री १२-३० वाजता झाली होती. मुलाचं नावराशीवरून मिथिलेश हे नाव आहे; परंतु आमच्या सर्वांचा तो साईराज आहे. सत्याने चालणाऱ्या भक्ताच्या पाठीशी बाबा सदैव उभे असतात, असा माझा विश्वास आहे.

●

**सटका :**

हा दंड म्हणजे हात दीडहात लांब आणि चांगला पायाच्या अंगठ्याएवढा जाड असा मजबूत काळ्या लाकडाचा सटका, जो बाबांच्यापाशी नित्य असे. मशिदीतून चावडीत जाताना आणि तेथून मशिदीत परत येताना बाबा एका हातात त्यांची चिलीम व तंबाखूची पुरचूंडी आणि दुसऱ्या हातात हा त्यांचा सटका, असे बरोबर घेऊन नित्य जात व येत.

**कफनी :**

पहिलवान दोघे कुशल।
होणारापुढें न चले बल।
मोहिद्दीन होऊनि प्रबळ।
बाबा हतबळ जित झाले॥६५॥
तेथूनि मग निश्चय केला।
पोशाख अवघा बाबांनी बदलला।
कफनी ओढिली लंगोट लाविला।
फडका गुंडाळिला माथ्यासी॥६६॥
केलें गोणाचें वरासन।
गोणाचेंचि अंथरूण।
फाटकें तुटकें करोनि परिधान।
त्यांतचि समाधान मानावें॥६७॥
''गरीबी अव्वल बादशाही।
अमीरी से लाख सवाई।
गरीबों का अल्ला भाई।
अक्षयीं साई वदत कीं'' ॥६८॥

— अध्याय ५, श्री साईसच्चरित

सटक्याचें टोंक दों हातीं धरलें। पोटाचिया खळगींत खोचलें।
दुजें खांबांत समोर रोविलें। घट्ट कवळिलें खांबाला॥१३०॥
सटका लांब सव्वाहात। शिरला वाटे सबंध पोटांत।
आतां स्फोट होऊनि प्राणांत। ओढवेल क्षणांत तैं वाटे॥१३१॥

— अध्याय २४, श्री साईसच्चरित

मशिदीच्या जोत्यावरील। बाबा उचलूनि घेती टमरेल।
त्यांत होतें इवलेंसें तेल। कष्टें लागेल सांजवात॥१०८॥
त्या तेलांत घातलें पाणी। स्वयें बाबा गेले पिऊनी।
ऐसें तें ब्रह्मार्पण करूनी। निव्वळ पाणी घेतलें॥१०९॥
मग तें पाणी पणत्यांत ओतुनी। सुके कांकडे पूर्ण भिजवुनी।
तयांसी कांडें ओढूनि लावुनी। दीप पेटवूनि दाविले॥११०॥

— अध्याय ५, श्री साईसच्चरित

घेई टमरेल एके करीं। दुजिया हातीं चौपदरी।
स्वयें फिरे दारोदारीं। नियमित घरीं प्रतिदिनीं॥९३॥
भाजी सांबारें दूध ताक। पदार्थ तितुके सकळिक।
टमरेलांत ओतिती लोक। पहा हें कवतीक खाण्याचें॥९४॥
शिजला भात अथवा भाकरी। घ्यावया पसरली चौपदरी।
पातळ पदार्थ मग कैसीही परी। टमरेलाभीतरीं रिचविती॥९५॥

— अध्याय ८, श्री साईसच्चरित

# चल ग बाई शिरडी गावाला....

किती किती गावू शिरडी गावाची महती
संत साईमुळे झाली जगी शिरडीची ख्याती ॥१॥

काय सांगू बाई शिरडी गावाचा महिमा
द्वारकेचा हरि कलियुगी जन्मा आला ॥२॥

शिरडी गावामध्ये खेळे गोदामाईचे पाणी
संत साईमुळे झाली पावन इथली भूमी ॥३॥

शिरडी गावाची लोक करतात वारी
समाधि-मंदिरात बसण्याची मौज भारी ॥४॥

शिरडी गावात लोक येतात घडोघडी
समाधि-मंदिराची त्यांना फारच अवीट गोडी ॥५॥

जाति-धर्माला इथे नाही थारा-वारा
साईंच्या दर्शनाला लोटे भारत देश सारा ॥६॥

भाव आणि भक्ति बाबांना आहे प्यारी
श्रद्धाळू भक्त बाबांना सदा हाक मारी ॥७॥

श्रद्धा नि सबुरी मनामध्ये तुम्ही ठेवा
स्मरताच समजा तुमच्याजवळ आहे 'तो' उभा ॥८॥

साई साई करू, साई भावाचा भुकेला
भक्तांच्यासाठी धावून येतो ग हाकेला ॥९॥

शिरडी गावात पडे फुलांचा ग सडा
प्रसादास घेऊ फुटाणे लाह्या अन् पेढा ॥१०॥

शिरडी गावात नाही फुला-फळांना ग तोटा
व्यापाऱ्यांचा येथल्या धंदा चाले हा मोठा ॥११॥

सगळीकडे दुकानांत मोठ-मोठे फुलांचे हार
लाखांवर येती, बाबा सर्व पेलणार ॥१२॥

चल ग बाई जाऊ बाबांच्या मंदिरी
भक्त देतील शाली चंदेरी रूपेरी ॥१३॥

चल ग बाई जाऊ बाबांच्या द्वारकेत
उजेड करतील बाबा आपल्या हृदयात ॥१४॥

चल ग बाई जाऊ बाबांच्या सेवेला
हजर राहू तिथे तिन्ही त्रिकाळ आरतीला ॥१५॥

श्रद्धा नि सबुरी बाबांचे शब्द हे दोन
ज्याचा बसेल विश्वास त्याला देतील दर्शन ॥१६॥

कटोरे घेऊन बाबा दिसता उभे दारी
दक्षिणा जो देई त्याला नेतील पैलतिरी ॥१७॥

पालखीचा सोहळा नेमाने गुरूवारी
चांदीची चिलीम पाजतात भक्त सेवेकरी ॥१८॥

मुरलीधरासाठी मंदिर बांधविले बाबांनी
स्वत: बनले मुरलीधर आत प्रवेश करूनी ॥१९॥

किती किती सांगू साईबाबांचे चमत्कार
अनुभव ते घेता लोक करिती नमस्कार ॥२०॥

लग्नाच्या वरातीतून बाबा शिरडीत प्रगटले
म्हाळसापतीने साईंना आधी बोलावले ॥२१॥

बाबांच्या हयातीत कुडाच्या होत्या भिंती
साईभक्तांसाठी आता मोठमोठल्या इमारती ॥२२॥

लेंडीबागेसाठी बाबांनी वाहिले पाणी
पाणी भरण्यासाठी मडके पुरविले कुंभारांनी ॥२३॥

मनोकामनेसाठी लोक नवस बोलती
भक्तांच्या इच्छा बाबा सदाच पुरविती ॥२४॥

शिरडीत साईबाबा, शेगावी गजानन
निराळे नका मानू, एकचि ते दोन ॥२५॥

पणत्यांमध्ये घालून पाणी पेटविल्या अखंड ज्योति
व्यापाऱ्यांच्या झाल्या माना बाबांपुढे खालती ॥२६॥

दुकानदारांनी बाबांना तेल दिले नाही
पाण्याच्या ज्योतींनी प्रकाशली द्वारकामाई ॥२७॥

बाबांच्या हाताने पेटविली आहे धुनी
आजतागायत ज्वलंत आहे तो अग्नी ॥२८॥

किती किती पाहशील माझ्या जिवाचा अंत
पुरी कर आता माझ्या मनातली खंत ॥२९॥

कोणाजवळ सांगू माझ्या जिवाची ग घालमेल
एका साईशिवाय दुसरे कोण निवारील ॥३०॥

भक्ति-भावनेने बाबांना नारळ-फुलं वाहू
आपल्या संसाराचे आपण सार्थक करून घेऊ ॥३१॥

**– सौ. सुशिलाबाई भिला सिनकर**
देवपूर, धुळे.

---

(पृष्ठ क्र. २१ वरून)

विचार मनात आला तर वाईटच होईल.

बाह्यमन फक्त वर्तमान काळाचाच विचार करते. ते भूत-भविष्य काळात कधीच जाऊ इच्छित नाही. हे कार्य फक्त अंतर्मनच करू शकते. या अंतर्मनाला योगसाधनेद्वारे जर विकसित केले तरच सफलता मिळते. आपल्या अंतर्मनाला जास्तीत जास्त मजबूत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या इच्छा कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कारण जेवढ्या इच्छा कमी तेवढा मनाला विचार करण्याचा ताण कमी पडेल व त्याची शक्ती वाया जाणार नाही, मन शक्तिशाली बनेल. जेवढी मनाची शक्ती जास्त तेवढे ते भविष्यात जाण्याचा प्रयत्न करते.

समुद्रात वरवर पाहिल्याने आत किती रत्ने आहेत ते दिसणार नाही; परंतु जर त्याच्या तळापर्यंत गेले तर दिसेल की त्यात किती रत्नभांडार भरलेले आहे. वरवर बुडी मारून पाहिले तर आपल्या हातात फक्त शिंपलेच येतील, मोती येणारच नाहीत. म्हणून तुम्ही खूप प्रयत्न करा. आपल्या अंतर्मनात किती रत्नांच्या खाणी भरलेल्या आहेत ते आत गेल्यानंतरच कळेल. वरवर पाहिल्याने फक्त आपल्या पदरी केवळ निराशाच पडेल. जोपर्यंत आपण स्वत:लाच ओळखू शकत नाही तोपर्यंत दुसऱ्यास काय ओळखणार? स्वत:ला समजण्यापूर्वी आपल्या मनाला प्रथम ओळखायला हवे की आपण कोण व काय आहोत. मन हे पाऱ्याप्रमाणे चंचल आहे. त्याला हातात धरणे इतके सोपे नाही. त्याला ताब्यात ठेवणे महाकठीण काम आहे.

---

जुन्यातलं सोनं

# बाबांचें स्मारक अथवा शिरडी कशी असावी

(सन १९२६ मध्ये बाबांचें बाळ यांनीं मांडलेले विचार)

शके १८४० सालीं विजयादशमीचे सुमुहूर्तावर मंगळवारीं तिसरें प्रहरीं (ता. १५ ऑक्टोबर, १९१८) बाबांनीं भक्तकल्याणासाठीं आपला पुण्यपवित्र व दिव्य देह ठेविल्यानंतर एके वेळीं पुष्कळ मंडळी भक्तवर्य शांत मूर्ति रा. रा. काकासाहेब दीक्षित यांचे पार्ले येथील बंगल्यात जमली असतां बऱ्याच भक्तमंडळीकडून बाबांच्या स्मारकासंबंधानें निरनिराळ्या पण माझे अल्पसमजुतीप्रमाणें कांहींशा एकदेशी सूचना येऊन त्याबद्दल चर्चा सुरू झाली. वास्तविक पाहतां अनंत कोटी ब्रह्मांड व्यापक सद्गुरूंचें स्मारक कोण व कसें करणार व तें सर्वांगसुंदर तरी कसें होणार? संतांची परीक्षा करण्यास संतच व्हावें लागतें. परमात्म्याचें ऐश्वर्य, सामर्थ्य व व्यापकता जाणण्यास परमात्माच व्हावें लागतें. ''स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती'' या महाराष्ट्र कविवर्य मयूरोक्तिप्रमाणें बाबांचें सर्वांगसुंदर स्मारक करण्यास त्यांच्याच सारखे अद्वितीय सत्ताधारी सत्पुरुषच निर्माण झाले पाहिजेत. तथापि बाबांचे कांहीं तरी स्मारक व्हावें अशी प्रत्येक भक्त अपेक्षा करणारच, व मानवी प्राणी त्यास जी बुद्धिमत्ता परमात्म्यानें दिली आहे, त्याप्रमाणें व त्या कार्यासाठीं द्रव्यमदत जशी मिळण्याचा संभव असेल त्यावर नजर देऊनच सूचना करणार. त्यामुळें भक्तवृंदांकडून त्यावेळीं झालेल्या सूचना केवळ एकदेशीच होत्या म्हणून त्यांना नांवें ठेवण्यास मी केव्हांही तयार नाहीं, व तसा माझा उद्देशही नाहीं. उलट त्या निरनिराळ्या स्वरूपाच्या सर्व सूचनांचा समावेश एकाच योजनेंत कसा होईल व माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें त्या योजनेस अल्पांश प्रमाणांत तरी सर्वांगसुंदरत्व कसें प्राप्त होईल याबद्दलचे विचार तेव्हांपासून आज कित्येक वर्षे माझे मनांत घोळत आहेत. ते मी आतां वाचकांपुढें ठेवणार आहे. 'सर्वारंभा स्तंडुला: प्रस्थमूला:' या न्यायानें ते विचार वाचकांस आज काल्पनिकच वाटणार. परंतु कोणतीही गोष्ट जी कालांतरानें मूर्त स्वरूपास येते तिचा उगम प्रथम कल्पनेंतच होत असतो. कल्पना विचारास पटली म्हणजे ती वाचेंत येते व नंतर वाचेंतून ती कृतीत येते. असो. फार दिवस नुसतें डोक्यांत घोळत असलेले विचार मग ते काल्पनिक असोत वा व्यावहारिक असोत, एकदां सहृदय वाचकांपुढें ठेवावे, व त्याबद्दल पुन्हा चर्चा सुरू व्हावी असें वाटल्यावरून त्यांचें आज थोडेंसें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे.

माझे विचार पैशाच्या अभावीं काल्पनिकच ठरणार. परंतु यथास्थित द्रव्यबळ असल्यावर ते व्यावहारिकच आहेत. आतां विचार पटून त्याप्रमाणें कामास लागणारा पैसा खर्च करणारीं माणसें सांपडणें तूर्त तरी कठीण दिसते. परंतु पौषाचे अगर वैशाखाचे महिन्यांत आकाश निरभ्र असून कडकडीत ऊन पडलें असतांही निमिषमात्रांत तेंच आकाश मेघांनीं आच्छादित होऊन पर्जन्यराज गर्जनारूपीं दुदुंभी व विद्युत् लखलखाट रूपीं दिव्यशाली व अनंत धारारूपीं अगणित सैन्य या आपल्या लवाजम्यासह अवनीतलावर अवतीर्ण होऊन जिकडे-तिकडे गारीगार करून सोडल्याची उदाहरणें कांहीं थोडी नाहींत. सारांश, परमात्म सृष्टींत अशक्य दिसणाऱ्या गोष्टी त्याच्या लीलेनें शक्य होतात, व त्याच जगदीशाच्या अतर्क्य लीलेचें आपण कौतुक करतों व धन्यवादही गातों. त्याचप्रमाणें श्री सद्गुरुरायांच्याच मनांत आल्यावर अशीं खर्च करणारीं माणसें निघण्यास अगर आपण होऊन पुढे येण्यास उशीर कसला? ''ये नाम किंचिदिह न: प्रथयंत्यवज्ञां। जानंतु ते किमपि तान्प्रति नैष यत्न:। यत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समान धर्मा। कालोऽह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी''॥ या प्रसिद्ध कविवर्य भवभूतींच्या मालती माधव, अंक १ ला, श्लोक ६ वा यांत म्हटल्याप्रमाणें कालही अगणित आहे, स्थलही अमर्याद आहे, व द्रव्य खर्च करणारीं माणसेही असंख्य आहेत. करितां आतांच नसल्यास कालांतरानें अवनीतलाच्या कोठल्या तरी प्रदेशावर कोणी तरी भावनाप्रधान व संपत्तीवान माणसें निघतील व माझे विचारास मूर्तस्वरूप देतील अशी मला बळकट आशा आहे.

प्रथमत: शिरडी कशी असावी हें सांगून ती बाबांचें सर्वांगसुंदर, टुमदार व नमुनेदार लहानसें शहर असावें. तें साधें असावें. त्यांत निसर्ग व कृत्रिम शोभेचें मिश्रण असावें. त्याचा परीघ ८-९ मैलांचा असून ते अष्टकोनी असावें. शहर रचना व शहर सुधारणा करणारी एक संस्था तेथे निर्माण करावी. तिनें रस्ते, हवा, पाणी व प्रकाश यांची उत्तम व्यवस्था करावी. मुंबई इतके रुंद नाहींत, पण त्या धर्तीचे मुख्य रस्ते व दोहों बाजूंस (फूटपाथस्) पायमार्ग असावे. रस्त्याचे बाजूस सुंदर झाडें असावीं. शहरात ठिकठिकाणीं पाणी विपुल असावें, कारंजीं असावींत. घरें साधीच असावी, पण प्रत्येक घरीं पुढें व मागें बगीचा असून मागे विहीर असावी. प्रत्येक धंदा करणाऱ्या लोकांची दुकानें अथवा पेठा निरनिराळ्या असाव्या. ठिकठिकाणीं सार्वजनिक धर्मशाळा, आरामस्थानें, उपहारगृहें, पुष्पफलउद्यानें, व्यायामशाळा, संगीतशाळा, क्रीडास्थानें, वेदशाळा, संस्कृत पाठशाळा, अजबखानें, किताबखाने, मंड्या, मार्केटें असावीं. आठवड्याचे धान्याचें बाजार, गुरांचे बाजार, भाजी-फळफळावळींचे बाजार भरावेत. ठिकठिकाणी मुबलक जलविहार करण्याचे तलाव असावे. या शहरीं मराठी शाळा, उरदू शाळा, गुजराथी शाळा, हुन्नर शाळा, व इंग्रजी शाळा असाव्यात. हायस्कूलें (सरस्वती मंदिरें), आर्ट (कला), मेडिकल

(वैद्यक) असावीं. युनिव्हर्सिटी (विश्वविद्यालय) असावी. त्या युनिव्हर्सिटींत सर्वांगसुंदर शिक्षण देण्याची व्यवस्था असावी. शारीरिक, मानसिक, व्यावहारिक, धार्मिक, पारमार्थिक शिक्षण देण्याची व्यवस्था असावी. प्रत्येक ठिकाणीं बाबांचे फोटो, मूर्ती अगर नांव दिसेल अशी सोय व्हावी. शहरांत ठिकठिकाणीं अन्नछत्रे असावीं. त्यांचा उपयोग बहुश: किंवा प्रायश: गरीब, निराधार विद्यार्थी, पीडित किंवा व्यथीत सेवेकरी, विरक्त, संन्यासी, पंगू, दुर्बल, बैरागी, फकीर, योगी, ध्यानी, मौनी वगैरे लोकांकरतांच व्हावा. ठिकठिकाणी पण जरा शहराबाहेर संन्याशांकरितां व निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत होऊन त्यांत कांहींतरी जास्त शोध लावण्याकरितां उत्सुक, तत्पर, लायक व आजन्म विद्याव्यासंगीं व ब्रह्मचारी अशा लोकांकरितां शिवालयें व मठ बांधून ठेवावे, व त्या मठांत व शिवालयांत त्या त्या शास्त्राचीच रात्रंदिवस चर्चा चालावी. उत्कृष्ट संन्यासी, उत्कृष्ट योगी, उत्कृष्ट बैरागी पुरुष असतील तर यांची जेवणा-खाण्याची सोय मठांत किंवा शिवालयाजवळच करावी. संन्याशांनीं गीता, पंचदशी, शारीरभाष्य व उपनिषदें यांचीच चर्चा करीत रहावें. हे सर्व मठ व हीं शिवालयें ब्रह्मविद्या, योग व विरक्तिही प्रत्यक्ष कृतींत व आचरणांत आणून दाखविणाऱ्या भक्तिज्ञान वैराग्याच्या सोपान परंपराच असाव्या. येथे शहरीं वेदशाळाही असावी. आर्यवैद्यकाचा येथें जिर्णोद्धारच व्हावा. सारांश, शिरडी शहर १४ विद्या, ६४ कला यांचें माहेरघर असावें. शास्त्री, विद्वान्, पंडित, मुमुक्षू लोकांचें हें आश्रयस्थान असावें. शिरडी क्षेत्रांचें क्षेत्र व तीर्थांचें तीर्थ असावें. प्रत्येक घरी व संस्थेंत सकाळ-संध्याकाळीं तरी बाबांची पूजा-अर्चा, भजन, नामस्मरण व वंदन मोठ्या आनंदानें व प्रेमानें होत असावें. प्रत्येक घरीं, व संस्थेंत प्रथमत: बाबांचे नामोच्चरण, वंदन करून प्रत्येक कार्यास, दररोजच्या दिनचर्येच्यासुद्धा, सुरवात व्हावी. शिरडींतील प्रत्येक व्यवहारांत बाबांचं नांव प्रामुख्याने ऐकूं यावें. प्रत्येक जीव बाबांच्या अत्युच्च व अत्युत्कट भावनेनें नखशिखान्त भरलेला व रमलेला असावा. शिरडी हा भूलोकींचा स्वर्ग असावा. शिरडी ही भूलोकीची अमरावती असावी. शिरडी हें नंदनवन असावें. ''कृष्ण कृष्ण चिमण्या शुक बोलती'' या वामन पंडितांच्या गोकुळ वर्णनाप्रमाणे, ''गोकुळीच्या सुखा अंत पार नाहीं लेखा'' या संतचूडामणी तुकाबा महाराजांच्या उक्तीप्रमाणें शिरडीच्या सुखाला अंतपार नसावा व तेथील चिमण्या, पोपट व मैना आदिकरून पक्षांनींसुद्धां ''बाबा बाबा'' नामाचा सारखा रात्रंदिवस गजर करावा. लेंडी नाल्यांत श्री गोदावरीच्या पाण्याचा मोठा लोट आणून सोडावा व लेंडी नाल्याच्या उभय तीरावर सुंदर घाट बांधावे. उपरीं निर्दिष्ट शिवालयें व मठ या घाटासंन्निध असल्यास उत्तमच, अथवा शिरडी शहराच्या आसपास जे गोदावरीचे कालवे आहेत त्यानजीक असल्यास चालतील. ही शिवालयें, व मठ सुंदर बाग-बगीच्यांनीं सुशोभित केलेली असावीं. तीं बहुधा निर्जन ठिकाणींच असावीत. तेथें नैसर्गिक शांतताच असावी. त्या त्या विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान करून घेण्याची इच्छा करणारींच अत्यल्प संख्यांक माणसें तेथें यावीं. येथें हिंस्त्र अथवा वन्य श्वापदांचा त्रास असूं नये. हीं ठिकाणें इतकीं रम्य असावीं की त्यांचें दर्शन होतांच शृंगारप्रिय विषयलोलुप प्राण्यांससुद्धां आपण संसाराचा त्याग करून या ठिकाणीं योगाभ्यास करण्यास अथवा ब्रह्मज्ञान संपादण्यास यावें, अशी बलवत्तर इच्छा व्हावी. या ठिकाणीं दिवसा दोन-चार हरीणें अथवा मोर आले तर चालतील, किंवा उष:कालीं कोकिळांचा मधुर स्वर ऐकावयास आल्यास चालेल. (श्री ज्ञानेश्वरी, अ. ६ ''शुचौ देशेंप्रतिष्ठाप्य'' या श्लोकावरील ओव्या १६३ पासून १८० पर्यंत पहा!) याच ठिकाणी आसपास कोठेंतरी बाबांचें एक फल-पुष्पोद्यान असावें. यांतील फळे व पुष्पें, दूर्वा, बेल, तुलसी नित्य बाबांच्या त्रिकाल पूजेच्या व नैवेद्याच्या वेळीं उपयोगांत यावीं. महाराजांच्या दररोजच्या पूजेस सुवासिक व सौगंधिक निरनिराळ्या पुष्पांचे हार व इतर सामग्री मुबलक असावी. याच बागेंत बाबा लेंडीवर गेले म्हणजे स्वत: लेंडी नाल्याचें पाणी ज्या झाडांस घालीत त्याच जातीचीं पुष्कळ झाडें लावून तीं परम पवित्र मानून अत्यंत कळकळीनें त्यांची जोपासना करावी. बाबांच्या मंदिरासमोर, पण त्यास जोडून मशिदमाईपर्यंत एक सुंदर व भव्य सभामंडप असावा. मंदिरामागें अथवा बाजूस एक लहानशी पुष्कर्णी असावी. त्यांत श्रीगोदावरीचें स्वच्छ पाणी भरपूर असावें. ती फार खोल असूं नये. तींत नानातऱ्हेचे व निरनिराळ्या रंगाचे मासे असावे. त्यांचीं हिंसा कोणीं करूं नये. त्यास ''साई-सरोवर'' असें नांव द्यावें. तें दिव्य व पुण्यतीर्थ मानावें. त्यांत फक्त स्नान करावे. कपडे धुऊं नयेत. कपडे धुण्यास घाटावर जावें. या तलावाच्याभोंवती एक लहानसा मनोहर फलपुष्पांचा बगीचा असावा. मंदिराचा मुख्य भाग, साईसरोवर व सभामंडप यांचेभोंवती बरीचशी जागा सोडून विस्तीर्ण कोट असावा. कोटास चार-पांच दरवाजे असावेत. या कोटाचे आंत त्याचे भिंतीस लागून चारी बाजूस निरनिराळीं लहान लहान मंदिरें बांधून हिंदुस्थानांत हिमालयापासून रामेश्वरपर्यंत व द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत असलेल्या सर्व मुख्य-मुख्य देवांच्या मूर्ती स्थापन कराव्यात. हिमालयातील हरिद्वार, व बद्रिकेदार, बद्रीनारायण, गंगोत्री, जम्नोत्री, सरस्वती उगमस्थान, काश्मिरांतील महासरस्वती, नेपाळांतील पशुपती, बारा ठिकाणची बारा जोर्तिर्लिंगें, आठ ठिकाणचे अष्टविनायक, अयोध्या, काशी-विश्वेश्वर, प्रयागराज, त्रिवेणी, गया, कलकत्त्याची महाकाली, जगन्नाथ, अमृतसर येथील सुवर्ण मंदिर, कुरूक्षेत्र, मथुरा-वृंदावन, गोकूळ, द्वारका, अबूपहाडावरील श्रीदत्त पादुका, नाशिक येथील श्रीरामचंद्रजी, पंढरपूर, गांडगापूर, कोल्हापूर येथील महालक्ष्मी, वाडी, औदुंबर, श्रीआळंदी, गिरी, शिवकांची, विष्णुकांची, त्रिपतीरामेश्वर वगैरे मूर्ति स्थापन कराव्या. त्यांच्या पूजेची व्यवस्था विद्यार्थी लोकांकडे सोंपवून द्यावी. याच मंदिराचे आवारांत ओंवऱ्या करून विद्यार्थ्यांची राहाण्याची सोय करावी. मंदिरासमोर एक भव्य व उंच दीपस्तंभ असावा. कोटाचे समोरील दरवाज्यावर चौघडा सनईची व्यवस्था असावी. मंदिराचें आंत प्रदक्षिणेस सुंदर रस्ता असावा. हल्लीचे समाधीवर सुंदर संगमरवरी दगडाचे लहानसें नक्षीदार मंदिर असावे. या लहानशा मंदिरांत समाधीचे वरचे बाजूस बाबांची संगमरवरी दगडाची मूर्ती बसवावी. पंचामृत स्नानाचें व शुद्ध जलस्नानाचें पाणी जाण्याकरिता

समाधीचें भोंवती चारी बाजूस समाधीस लागून सहा इंच रूंदीची व दीड इंच उताराची जागा असून तें सर्व पाणी जाण्याकरितां समाधीच्या ओटयाच्या एका बाजूस ओटयाच्या भिंतीस लागून एक संगमरवरी दगडाची लहानशी कुंडी असावी. म्हणजे तीर्थाचें पाणीं पायदळीं न जातां सर्वांस मुबलकपणें घेतां येईल. समाधीपुढें पाण्याचें एक सुंदर कारंजें असावें. मंदिरावर सुंदर शिखर असावें. कै. बापूसाहेब बुटींच्या अकालीं निधनामुळें जें कांहीं राहिलें तें आतां भक्तमंडळींनीं पुरें करावें.

बाबा हे हिंदु व मुसलमान या दोघांस सारखेच मानीत. पूजा हिंदूंकडूनच करवून घेत. आरतीही हिंदूंकडूनच करवून घेत. बाबांचें दरबारात हिंदु-मुसलमानांचा दर्जा सारखाच असे. दोघेही त्यांच्या पायांस स्पर्श करून त्यांचें वंदन करीत. (ब्राह्मणांच्या स्त्रिया बाबांचा विटाळ मानीत नसत. इतरांचा मानीत असत.) बाबांनीं पंचभौतिक शरीर विसर्जन केल्यावर हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें त्यांच्या शवाची व्यवस्था करण्याबद्दल तंटा उपस्थित झाला. मुसलमान म्हणत कीं बाबा हे मुसलमान असल्यामुळें आम्ही त्यांचे शव दरग्यांत नेऊन त्यावर कबर बांधूं. हिंदु म्हणत कीं बाबा हे हिंदु असल्यामुळें आम्ही त्यांचें शव हल्लींचे मंदिरांत ठेवून त्यावर समाधी बांधू. आपल्या तंटयांत महाराजांच्या शवाचे मात्र हाल होत आहेत, व ही गोष्ट उभयतांसही लांच्छनास्पद आहे, असें उभय जातींतील पुढारी मंडळीचे लक्षात येऊन असें ठरलें कीं जर मुसलमानांना मंदिरांत दर्शनाला जाण्याची मोकळीक असेल तर हिंदूंनीं हल्लींचे मंदिरांत बाबांचें शव ठेवून त्यावर समाधी बांधावी. बाबांच्या तालमींत व कृपाछत्राखालीं वाढलेल्या हिंदु पुढारी मंडळींनी ही गोष्ट कबूल केली, व त्याप्रमाणें हल्लीं वहिवाट सुरू आहे. यावरून घ्यावयाचें काय कीं अखिल हिंदुस्थानांत हिंदूंचे कोणत्याही देवालयांत पाहाण्यास न सांपडणारी अभेदबुद्धीची अथवा समतेची वहिवाट येथें पहावयास सांपडतें.

शिरडींतील रस्ते, हौद, तोटया, तलाव, कंदील, संस्था, शाळा, मंदिरें, पीठें, बागबगीचे, धर्मशाळा व इतर स्थानें म्हणजे प्रत्येक वस्तू बाबांच्या नांवानें अन्वित असावी. म्हणजे प्रत्येक वस्तूंस बाबांचें निरनिराळें नांव ठेवावें.

बाबांचे मंदिरांत चौघडा व सनई नेमानें त्रिकाल सुंदर रीतीनें वाजली पाहिजे. हल्लीं ही वाजते. परंतु ती नियमितपणें उत्कृष्ट रागरागिणींत वाजत नाही. समाधीस रोज त्रिकाल स्नान व एकदां अभिषेक पंचसूक्त पवमानाचा व रूद्राचा झाला पाहिजे. त्रिकाल नैवेद्य पाहिजे. नैवेद्यास रोज एकतरी नित्य नवें, कमीत कमी पावशेराचें पक्वान्न असावें. ब्राह्मणानें त्रिकाल स्नान करून पूजा, नैवेद्य व आरती केली पाहिजे. सणावारास त्या त्या सणांचीं पक्वान्नें नैवेद्यांस आलीं पाहिजेत. चावडी मिरवणूक नेहमीप्रमाणेंच निघाली पाहिजे. पहाटे काकड आरती व सकाळीं पूजा झाल्याबरोबर एक तास समाधीपुढें गायन झालें पाहिजे. दुपारची पूजा व आरती झाल्यावर तिसरे प्रहरीं एक तास पुराण झालें पाहिजे. पुराणांत वेदांत विषयाखेरीज विषय असूं नये. श्री ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, दासबोध, वगैरे जगन्मान्य मराठी ग्रंथ व भारत भागवत, गीता, उपनिषदें, शारीर भाष्य, पंचदशी, योगवसिष्ट वगैरे संस्कृत ग्रंथ पुराणांत असावे. प्रत्येक एकादशीस किंवा निदान महिन्यांतून एका एकादशीस तरी मंदिरांत हरि-कीर्तन असावें. पुजारी, पुराणिक, चौघडा व सनई वाजविणारी मंडळी कायमची असावी. पुराणिक व कथेकरी एकच असतील तर फारच उत्तम. मंदिरांत मोठें घडयाळ व तास असावा, व प्रत्येक तास झाल्याबरोबर तासाचा ठोका पडावा व ठरलेल्या तासाप्रमाणें ज्यांनीं त्यांनीं आपापली कामें करावीं. रात्रीची पूजा आरती झाल्यावर दोन तास तरी समाधीपुढे भजन व्हावें. पुराण व रात्रीची पूजा होण्याचे दरम्यान म्हणजे सायंकाळी सुमारें ७ पासून ८ पावेतों समाधीपुढें पुन्हां रोज गायन व्हावें.

मंदिरांत रॉकेलचे दिवे बिलकूल नसावे. गोडयातेलाचे, तूपाचे मेणबत्तीचे दिवे असावेत. मंदिरांत हंडया, झुंबरें व श्यामदानें असावी.

आर्य वैद्यक शाळेस व तसेंच वैद्यक उच्च पीठास जोडून एकेक उपयुक्त वनस्पतींचे बगीचे (नर्सरीज) असावें.

भरपूर पैसा, अंत:करणापासूनची इच्छा, उत्कट भक्ति व बाबांवर निस्सीम प्रेम, विशाल बुद्धि, अपूर्व योजना, मुमुक्षत्व व बाबांच्या कृपेची अनुकूलता इतक्या गोष्टींचा योगायोग मात्र कपिलाषष्ठीचा किंवा कंकणाकृति ग्रहणाचा खरा, परंतु महाराजांचे मनांत आल्यावर त्यास उशीर कसला!

"God said let there be light and there was light."

या बायबलांतील म्हणींप्रमाणें किंवा 'एकोहं बहु:स्याम्' या उपनिषदातील वचनाप्रमाणें बाबांच्या मनांत आलें कीं वर लिहिल्याप्रमाणें व्यवस्था व्हावी कीं ती ताबडतोब होईलच. मग तिला काळाची, द्रव्याची व इच्छेची जरूर लागणार नाहीं. बाबा जरूर त्या गोष्टी ताबडतोब निर्माण करतात. हल्लींच्याच मंदिराची गोष्ट घ्या. कै. बापूसाहेब बुट्टी नागपूरचे कोटयाधीश. नागपूर शिरडीपासून कितीतरी लांब. बापूसाहेबांचे गुरूही निराळेच. पण बाबांच्या मनांत आलें कीं शिरडीस समाधिकरतां मंदिर असावें. ही गोष्ट अगर हें कारण त्यांनीं कधीं कोणास, अगर बापूसाहेबांसही सांगितलें नाहीं. पण येथें एक मंदिर बांध इतकेंच त्यांना सांगितलें व जसें बाबांनीं सांगितलें तसें मंदिर बापूसाहेबांनीं लाख-सव्वालाख रुपये खर्च करून बांधिलें व शेवटीं त्यांत बाबांनीं आपला देह ठेविला. म्हणून बाबांचे मनांत आल्यावर माझे वरील विचार खात्रीनेंच अशक्य कोटींतील किंवा काल्पनिक ठरणार नाहींत.

बाबा पूर्ण परब्रह्म होते. म्हणून त्यांचें स्मारक प्रत्येक बाजूनें व्हावयास पाहिजे. बाबा भक्तांस परमार्थाचे धडे देत असत. इतकेंच नव्हे, तर तो धडा कसा गिरवावा, त्याचा अभ्यास कसा करावा, हें प्रत्यक्ष वर्तनाने दाखवीत असत. बाबा योगेश्वर होते. बाबा यतिचूडामणी होते. बाबा विरक्त सिंह होते. बाबा सच्चिदानंद ज्ञान कैवल्य मूर्ती होते व ते मुमुक्षूजनांना त्यांच्या अधिकाराप्रमाणें तात्विक बोध करून तें बोधरूपी उदाहरण आपल्या स्वत:च्या वर्मनरूपी कृतीनें सोडवून दाखवीत असत. म्हणून मठ, शिवालयें इतर आश्रम

(पृष्ठ क्र. ४१ वर)

# अकरा हनुमान

–पंडित ग. रा. सावंत

## याज्ञिक-दृष्टि

अग्नेय नम:। वदृये नम:। पावकाय.। ज्वालिने.। महाद्युतये.। सप्त जिव्ह पतये.। धूम्रकेतवे.। प्रकाशकाय.। महातेजसे.। तमोहर्त्रे.। अंगिरसे.। मृगवे.। वशिष्ठा.। च्यवनाय.। कालाग्नेय.। दिवाकरसमप्रभाय.। होत्रे.। हत्रे.। हव्याय.। हविषें.। कव्याय.। स्वधाकाराय.। स्वाहाकाराय.। पुरुहुताय.। यजमानाय.। पिंगकेशाय.। पीतवाससे.। पिंगरोम्णे.। रक्ताम्बरधराय.। लोहितांगाय.। सुवर्णवर्णाय.। रक्षोघ्नाय.। लंकेशगृहभंजनाय.। समीर तनुजाय.। यातुधानरिपुप्रियाय.। रक्ताय.। पिप्पलाश्रयाय.। पुच्छलंकाविदाहकाय.। महावीराय.। हिरण्मयाय.। इ.

अग्नेनयसुपथा राये अस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान्।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां नमउक्तिं विधेम॥१८॥

ईशउप शरण शरण हनुमंता। तुज आलों रामदूता॥१॥
काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा॥२॥
शूर आणि धीर। स्वामिकाजीं तूं सादर॥३॥
तुका म्हणे रुद्रा। अंजनीचिया कुमरा॥४॥ तुकोब्बाराय

हे मार्गदर्शक देवा हनुमंता! ऐतिहासिक आणि पौराणिक कालापूर्वीहि तूं सगुण-निर्गुण रामभक्तांचा मध्यस्थ कोणत्यातरी रूपांत असशीलच, या दृढबुद्धीनें मी एका वेदवेत्या वृद्ध अग्निहोत्र्यास तुझें अति प्राचीन खरें स्वरूप कोणतें तें विचारलें. तो वृद्ध याज्ञिक त्यावेळीं आपल्या शिष्यवर्गास वेद-पाठ देत होता. मी मध्येंच पुढें होऊन त्यास वरील प्रश्न विचारला. तेव्हां तो याज्ञिक मला म्हणाला, ''तुमचा प्रश्न काय तो मला पुरा समजला नाहीं. तथापि घटकाभर थांबा. माझा हा पाठ पुरा झाला, म्हणजे मी तुमच्याशीं बोलतो.''

त्यांच्या पाठांत अधिक व्यत्यय आणणें बरें नाहीं, असा विचार करून मी त्या याज्ञिकाच्या मठीपासून थोड्याच अंतरावर त्यांचा पाठ आटोपण्याची वाट पहात बसलों. त्या याज्ञिक गुरुजींच्या तोंडचीं कांहीं वैदिक वचनें व त्यांचा अर्थ मधून मधून अस्पष्ट असा माझ्या कानीं येत होता. पण हें हनुमंता! तुझें अति प्राचीन स्वरूप जाणण्याविषयीं मी अत्यंत उत्कंठित असल्यामुळें त्यांचें चाललेलें वेदाध्यायन ऐकण्याकडे माझें विशेष लक्ष नव्हतें. इतिहासकारांनीं व पुराणकारांनीं हे हनुमंता! तुझें जें वर्णन केलें होतें, त्याचें मी चिंतन करीत होतों. त्यांचें तें कर्मकांडांचे वेदपठण व मी करीत असलेलें तुझें भागवत धर्मांतील गुणचिंतन या अगदीचं गैरमेळाच्या गोष्टी आहेत, अशा समजामुळें ते वेदपठण करीत होते त्यावेळीं मी तिकडे फारसें लक्ष न देतां तुझ्या चरित्राचें चिंतन करीत होतों! ते अग्नीचीं सूक्तें म्हणत होते व मी तुझें पौराणिक स्तोत्र गुणगुणत होतों.

पण पुढें हे हनुमंता! अशा त्या गैरमेळांत जो विलक्षण मेळ अनायासें माझ्या कानीं आला, तो मी तुला आतां सांगणार आहें. या मेळांत काय अर्थ आहे, तेवढा मला समजावून सांग! हे वेदवेत्त्या महापुरुषा! त्यावेळीं मी तुझ्या चिंतनांत गढलों असतां, त्या वृद्ध अग्निहोत्र्याचे मुखांतून अशीं वाक्यें माझ्या कानीं आलीं कीं, ''देव आणि मानव यांच्यामधील मध्यस्थ अग्नि आहे. तो मर्त्य लोकांत अमर असून जनतेला उन्नतिपथ दाखविणारा जनतेचा मित्र व केन्द्र आहे. हा गौतमाचा वातप्रेरित वैश्वानर प्रथम अप्रसिद्ध होता. त्याचें बल प्रथम अव्यक्त होतें. पण तो यजमानाचा दूत म्हणून आपल्या तेजानें जेव्हां प्रगट झाला, तेव्हां त्याच्या पराक्रमाकडे सर्वांचें लक्ष वेधलें. तो रुद्र, वसू आणि वायु यांनीं पुरस्कृत केलेला विलक्षण देव, क्षुधित होत्साता आपलें भक्ष्य शोधण्यासाठीं गाईंच्या कळपांत बैल फिरतो, तसा प्रथम वनांत फिरूं लागला. पुढें त्यानें उंच उंच झाडांवरून उड्या घेतल्या व अंतरिक्ष गांठलें. अशा या विलक्षण, बलवान व ज्योतिस्वरूप अग्निची लोक सेवा करूं लागले. कारण त्यानें मानवांचे शत्रू जे दस्यु त्यांस ठार मारलें. हा अग्नि तोच वृत्रहंता इंद्र होय.''

हनुमंता! त्या वेदोनारायणाच्या या भाषणानें माझ्या नजरेपुढें तुझेंच चरित्र खेळूं लागलें. म्हणून मी जरा पुढें सरसावून त्यांच्यां भाषणाकडे थोडें अधिक लक्ष देऊं लागलों, तो यदृच्छेनें त्यांच्या उपदेशपाठांत मला अनेक विस्मयकारक गोष्टी समजल्या! ते आध्यात्मक अग्निहोत्री आपल्या शिष्यांजवळ देव-मानवांचा मध्यस्थ मित्र, देवांचा पहिला सर्वांत मोठा त्यागी व विरक्त दूत असा जो अग्नि, त्याचें वर्णन करीत होते, आणि माझ्या मनांत तुझें आश्चर्यकारक रूप व गुण वावरत होते. ते वेदोनारायण म्हणाले, ''वायुप्रेरित, बुद्धिमानांत श्रेष्ठ व देवमानवसंपूज्य असा अग्नि जन्मला, तों सूर्योदय झालासा दिसला.'' हें ऐकून मला तुझ्या जन्मकालचें स्मरण झालें, व तुज मध्यस्थाची उपस्थिती आणि प्रबोधपहांट यांचें साहचर्य मला चिंतनीय वाटलें. ''तमोहर्त्रे नम:'' हें तुझ्या सहस्त्रनाम पाठांतील वचन त्यावेळीं माझ्या मनांत आलें.

हे बालब्रह्मचारी मारूते! शुक हा तुझ्याप्रमाणेंच नैष्ठिक बालब्रह्मचारी होता. विहंगमदृष्टीच्या स्वैराचारी व वाक्पटु अशा ह्या जीवन्मुक्त पुरुषास शुक हें पक्ष्याचें नामरूप पुराणकारांनीं कल्पिलें, असें दिसतें. अथवा शुक्र या शब्दाचा तो अपभ्रंशहि असेल. कारण त्याचा कथाभाग विलक्षण आहे. व्यासांनीं अविवाहित असून रुद्रापाशीं मुलाची इच्छा प्रदर्शित केली. मुलगा अग्नि-पृथ्वी-जल-वायु-अंतरिक्ष असा पाहिजे, म्हणून वर मागितला. रुद्रानें वर दिला. मग व्यासांनीं अग्नि सिद्ध केला. तेथें घृताची अप्सरा पोपटीच्या रूपानें आली. पुढें घृताची अप्सरेला पाहून व्यासांचे रेतस्खलन झालें, व ते अरणीवर पडलें. त्या अरणीचें मंथन करितांच त्यांतून अग्निप्रमाणें शुक प्रगट झाला. अग्निहोत्रांतील

उत्तरारणीला घृत लावतात. घृताची म्हणजेच घृताक्त अरणि. घृत म्हणजे आयु. तेंच रेत्तस, तेंच बीज. त्यांतूनच चिरंजीव शुक जन्म पावला. घृताक्त अरणि हीच ज्ञानयुक्त श्रद्धा. रेतस म्हणजे अंतर्मुख वृत्तीनें उत्पन्न झालेला ज्ञानोदय अथवा अहंप्रत्यय असावा. 'हें विश्वचि माझें घर।' असाहि तो **ब्रह्मांडवर्तुळाचे** उभय कक्षांस स्पर्श करणाऱ्या सर्वज्ञ व्यासांचा अहंप्रत्यय असेल. जो मी तोच तो, व जो तो तोच मी असाहि तो ब्रह्मभाव असेल.

कांहीं असो. तुझ्या जन्माचे पूर्वीं तुझ्या मातेनें असाच रुद्राचा वर संपादन केला होता. त्यावेळींहि शृंगऋषींनी दशरथ राजाचे येथें पुत्रकामेष्टि यज्ञांत अग्नि सिद्ध केला होता. तेथेंहि सुवर्चसा ही अप्सरा घारीचें रूप घेऊन आली होती. त्यावेळींहि अंजनेला पाहून एका पर्णावर वायुचें रेतस्खलन झालें होतें. तें तुझ्या अरणिरूप अंजनामातेनें सेवन केलें, तेव्हां तूं कपि जन्मास आलास. याप्रमाणें स्कंद, शुक व तूं ह्या तिघां ब्रह्मचाऱ्यांचें जन्मकर्म विलक्षण दिसतें. तुम्हां तिघांच्या जन्मकथनांतील रेतस हा शब्द गूढवाची आहे, हें तुला सांगावयास नकोच.

अशा या लाक्षणिक कथांवरून असें दिसतें कीं, आध्यात्मिक दृष्टीनें व्यक्तिच्या संकल्प-विकल्पात्मक अंत:करणाच्या अरणींचे मंथनांत, ऐतिहासिक दृष्टीनें समष्टी जनतेच्या ज्ञानकांड, कर्मकांड आणि उपासनाकांड या तीन कांडांसंबंधीच्या वादविवादात्मक संघर्षणांत, आधिदैविक दृष्टीनें किंवा सृष्टीच्या उत्क्रांतीच्या दृष्टीनें स्पष्टास्पष्टोच्चार शब्दसंघर्षणांत, अथवा परोक्षापरोक्ष-व्यक्ताव्यक्त सृजननकथनांत, व्यक्त होणारा धर्मरूप 'तनूनपात' अग्नि, यासच शुक आणि वानर (मारुति) अशीं, अंतरिक्षांत संचार करणाऱ्या प्राण्यांचीं सांकेतिक नांवें प्राप्त झालीं असावीं. अशा अनेक कल्पना माझ्या मनांत येऊं लागल्या.

हे एकादशरुद्र वायुसुता! तुझ्या सहस्त्रनामावळींत तुला 'पावक' असेंहि म्हणतात. अग्निसंबंधी अकरा अकरा ऋचांच्या आप्री सूक्तांत पराक्रमी पुत्रासंबंधी पुत्रेषणा सांगितली आहे. ''सुवर्णकांतीचा, चलाख, वीर, कर्मकुशल, बलवान्, संयोजक आणि देवभक्त असा पुत्र आम्हांला दे!'' असाच त्यांतील भाव आहे. असें ते याज्ञिक म्हणाले आणि तसाच तूं आहेस, यांत शंका नाहीं.

हे हनुमंता! तुझ्या दिव्य जन्मकर्माचें मी चिंतन करीत होतो व ते वेदोनारायण आपल्या प्रिय शिष्यांना अग्निचें चरित्र मोठ्या उत्साहभरानें सांगत असलेलेंहि माझ्या कानीं येतच होतें. ते वेदोनारायण आपल्या प्रिय शिष्यवर्गास उद्देशून म्हणाले, ''हे शिष्य हो! आज मी तुम्हांला श्री अग्निनारायणाचें जन्मकर्म थोडक्यांत सांगतों, तिकडे लक्ष द्या. हा आपला उपास्य देव लोकप्रसिद्ध आहे. तो उघडा आहे. रानांत शीतनिवारणार्थ झगरी पेटविणाऱ्या गोवाऱ्याच्या पोरापासून वेदमूर्ति अग्निहोत्र्यापर्यंत सर्वांचा तो आवडता उपास्य आहे. स्वयंपाकघराच्या चुलाणांतील गुहेपासून पर्वतावरील गर्द झाडीपर्यंत, पाकसिद्धी करणाऱ्या पावकापासून वणव्याच्या प्रलयाग्निपर्यंत, प्रकाशक खगोलांपासून बुद्धिप्रकाशकापर्यंत, तो गुहानिवासी सर्वांनी पाहिलेला आहे. त्याचें स्वभावत: सौम्य आणि संघर्षणानें प्राप्त होणारें दाहक व उग्र स्वरूप सर्व जाणत आहेत. चंद्राप्रमाणें नंदादीपाचा शीतल प्रकाश आणि नरसिंहाच्या भयंकर आयाळांप्रमाणें वणव्यांतील भडकलेल्या ज्वाळा सर्वांनीं पाहिल्या आहेत. आकाशांत तळपणारा मार्तंड, अंतरिक्षांत चमकणारी विद्युत् आणि होमकुंडांतून प्रगट होणारा दक्षिणाग्नि हीं अग्निचीं त्रैलोक्यांतील विविध दिव्य रूपें प्रत्यक्ष आहेत.

हे हनुमंता! याप्रमाणें ते गुरुजी आपल्या जिज्ञासु शिष्यांपुढें अग्निनारायणाचें वर्णन करीत असतां, त्यांच्या डोळ्यांसमोर लाल गुंजांच्या राशींप्रमाणें अग्निस्फुल्लिंग चमकत असतील. पण माझ्या दृष्टीसमोर गुरुजींच्या तोंडच्या वर्णनानुसार डोंगराच्या कपारीवर, नाहींतर गुरुचरणांतील वटछायेखालीं स्थापलेली तुझी सिंदूरचर्चित रक्तमालाविभूषित लाल मूर्ति दिसत होती. अशोकवनांत सीतामाईपुढें उभी असलेली तुझी नंदादीपाप्रमाणें शांत व प्रसन्न मूर्ति आणि घोर राम-रावण युद्धांत वीरश्रीच्या आवेशांत रोमांचकारी दिसणारी तुझी क्रोधाग्निनें भडकलेली मूर्ति मी मनापुढें पाहात होतों. पहिल्या प्रचंड उडींत सूर्यास ग्रासणारा द्युलोकींचाच अग्नि, दुसऱ्या उडींत समुद्रावरील ढगांतून चमकत जाणारा विद्युताग्नि आणि तिसऱ्या उडींत लंकादहनाचे रणयज्ञांतील तूंच समराग्नि, असा तूं मला त्रैलोक्यवाशी अग्निच्या ठिकाणीं दिसत होतास.

## जन्मकर्म

हे हनुमंता! त्या अग्निहोत्र्यांच्या तोंडचे अग्निसंबंधीं विवरण ऐकत असतां माझ्या मनांत एकेक ऐक्यभावनेचे विचार येऊं लागले. अग्नि आपल्याच ठिकाणीं (तनूनपात) उत्पन्न होतो, असें वेदांत वर्णन आहे. तसाच तूहि अयोनिसंभव दिसतोस. हे मारुताग्ने! उर्वशी आणि पुरुखा याप्रमाणें अंजना आणि मातरिश्वा या तुला जन्म देणाऱ्या दोन अरणीच वाटतात. पुरुखा आणि मरुत् ह्या नामांत एकच ध्वनि दिसतो. आदिमाया तुलाच मा-रूत, म्हणजे रडूं नकोस, असें म्हणाली. तेंच तुझें नांव पडलें.

अग्नि जसा रुद्राचा पुत्र, तसा तूं रुद्राचाच अवतार आहेस. वायु हा तुझा, तसाच अग्निचा जनक नाहीं काय? अंजनानामक आकाशरूप महद्योनींत वायुचा संचार झाल्यावर तिसरें महद्भुत तेज अग्निरूपानें उत्पन्न झालें, तेंच तुझें तात्विक रूप असें मला वाटलें. अग्निला दोन बाप असल्याचे वेदांत वर्णन आहे. तसेंच तुझे जनक केसरी व वायु होत. अग्निला दोन आया आहेत असें मानतात, तशाच तुझ्या पूंजकस्थली किंवा मार्जारास्या व अंजना होत असें मला वाटतें. महाभूतांतील तृतीय भूत जें तेज तें प्रगट झालें नव्हतें, तेव्हां सर्व तम होतें, असें नासदीय सूक्त सांगतें. तें जें तम-व्योम तीच तर अंजना नव्हे ना! तमानें दृष्टि उघडली, तों तेज प्रगट झालें. त्याप्रमाणें ध्यानस्थ अंजनेनें नेत्र उघडले, तों अंकावर, हे मारुते, तूं दिसलास.

हे मारुतिराया! तूं जन्मतांच त्या अंजनेच्या मांडीवरून उडी घेतलीस व विद्युल्लतेच्या वेगानें सूर्यबिंब गांठलेंस, असें मला वाटतें. या तुझ्या उडीनें तूं द्यावा-पृथ्वी-अंतरिक्ष या त्रिस्थळींतील अग्निचें त्रितच प्रगट केलेंस. तेव्हां त्या अग्नित्रयाची उपासना रूढ झाली. त्यांपैकीं

(पृष्ठ क्र. ३६ वर)




**जाते :** श्री साईंनी स्वत: दळून, कांडून, भाकऱ्या करून त्या गोरगरीबांना व इतरांना खावविल्या. श्री साईमाऊलीने जाते आपल्या देवळात ठेवून स्वत: दळून गोरगरीबांस व क्षुद्र देवतादि इतरांस त्यांच्या पिठाच्या भाकऱ्या भाजून तृप्त केले.

**– कै. श्री. रा. आ. तर्खड**

स्वयें बैसूनि मशिदीतें। जातें माडूनियां निज हातें।
गहूं डाळ जोंधळियातें। बाबांनीं तेथें दळावें॥३५॥

**– अध्याय ३८, श्री साईसच्चरित**

एके दिवशीं सकाळीं जाण। बाबा करोनि दंतधावन।
सारोनि मुखप्रक्षाळण। मांडूं दळण आरंभिलें॥११०॥

हातीं घेतलें एक सूप। गेले गव्हांचे पोत्यासमीप।
भरभरूनि मापावर माप। गहूं सुपांत काढिले॥१११॥

दुसरा रिकामा गोण पसरिला। वरी जात्याचा ठाव घातला।
खुंटा ठोकूनि घट्ट केला। व्हावा न ढिला दळतांना॥११२॥

मग अस्तन्या सारूनि वर। कफनीचा घोळ आवरी।
बैसका देऊनि जात्याचे शेजारीं। पसरूनि पाय बैसले॥११३॥

महदाश्चर्य माझिये मना। दळणाची ही काय कल्पना।
अपरिग्रहा अकिंचना। ही कां विवंचना असावी॥११४॥

असो खुंटा धरोनि हातीं। मान घालोनियां खालती।
बाबा निजहस्तें जातें ओढिती। वैरा रिचविती नि:शंक॥११५॥

संत देखिले अनेक। परी दळणारा हाचि एक।
गहूं पिसण्याचें तें काय सुख। त्याचें कौतुक तो जाणे॥११६॥

**– अध्याय १, श्री साईसच्चरित**




## कोळंबे :


एणेंपरी जें अन्न आणीत। मशिदींतील कुंडींत ठेवीत।
कावळे कुत्रे त्यांतचि खात। कधीं न हांकीत तयांना॥१००॥

**– अध्याय ८, श्री साईसच्चरित**


## धुनी :

मशिदींत नित्याची धुनी। अक्षयी प्रदीप्त निशिदिनीं। त्यांतील मूठमूठ रक्षा देउनी। बाबा बोळवणी करीत॥२१॥ सारांश, ही बाबांची धुनी प्रसवली कितीक उदीच्या गोणी। नाहीं गणाया समर्थ कोणी। परम कल्याणी ही उदी॥३०॥

**– अध्याय ३३, श्री साईसच्चरित**




**श्री साईबाबा चित्रात दिसत असलेल्या दगडी चौरंगावर स्नान करीत असत.**



**बाबांना या पलंगावर ऐहिकदृष्ट्या अखेरचे स्नान घालण्यात आले.**

---

डोईस टोपी अंगांत कफनी। खाकेस सटका तमाखू चुरुनी।
तयारी केली चिलीम भरुनी। नवल ते स्थानीं वर्तलें॥१०॥

चांद पाटील रस्त्यानें जातां। फकीर ऐकिला हांका मारितां।
ये रे चिलीम पिऊनि जा पुढतां। छायेखालता बैस जरा॥११॥

फकीर पुसे हें खोगीर कसलें। पाटील म्हणे जी घोडें हरवलें।
मग तो म्हणे जा शोध ते नाले। घोडें सांपडलें तात्काळ॥१२॥

चांद पाटील विस्मित झाला। मनीं म्हणे अवलिया भेटला।
पार नाहीं ह्या कृत्याला। मानव ह्याला म्हणूं नये॥१३॥

पुढें तो घोडी घेऊनि परतला। पाटील पूर्वस्थळीं पातला।
फकीर पासीं बैसवी त्याला। चिमटा उचलिला स्वहस्तें॥१४॥

मग तो तेथेंचि मातींत खुपसिला। आंतूनि प्रदीप्त निखारा काढिला।
हातांतील चिलमीवर ठेविला। सटका घेतला उचलुनी॥१५॥

पुढें छापी भिजवावयास। पाणी नाहीं जवळपास।
सटका आपटी जमिनीस। पाणी निघावयास लागलें॥१६॥

छापी भिजवूनियां पिळिली। मग ती चिलमी सभोंवती वेष्टिली।
स्वयें प्याला तयाही पाजिली। मती गुंगली पाटलाची॥१७॥

**– अध्याय ५, श्री साईसच्चरित**

डोईस सफेत पागोटें खासें। स्वच्छ धोतर लावीत कासे।
अंगांत सदरा कीं पैरण असे। पेहराव ऐसा आरंभीं॥४५॥

**– अध्याय ७, श्री साईसच्चरित**

अंगांत नित्याची कफनी। सटका आपुला बगलेस मारुनी।
तमाखू आणि चिलीम घेउनी। फडका टाकुनी स्कंधावर॥१३२॥

**– अध्याय ३७, श्री साईसच्चरित**

(पृष्ठ क्र. ३३ वरून)

तुझे बांधव भूत दोन अग्नि, अन्तरिक्ष व द्युलोकांत राहिले, व तूं मृत्युलोकींचा संरक्षक अग्नि पार्थिव रूपांत भूलोकीं अवतरलास, असें दिसतें. या तीन अग्निंना त्रेता असें म्हणतात, व त्या अग्न्युपासनेच्या काळाला त्यायोगें त्रेतायुग असें म्हणूं लागले. हे त्रेतायुग म्हणजेच तुझाहि या पृथ्वीवर प्रगट होण्याचा काळ नव्हे काय?

वैदिक सीतेच्या उद्धारक त्रेत्याप्रमाणें पौराणिक सीतेचा तूंच त्राता नव्हेस काय? भूमीच्या सौभाग्याप्रमाणें सीता-उर्मिलांचें सौभाग्य राखणारा, मारूतिराया! तूंच ना? सीता व उर्मिला हीं भूमीचींच रूपे मानलीं, तर हे मारूते! तुलाच त्यांना समृद्ध करणारा अग्नि म्हणून कां लेखूं नये?

## गुणमहिमा

हे हनुमंता! त्यानंतर ते विद्वान अग्निहोत्री पुढें म्हणालें, "हे शिष्य हो! ऐका! या बलवान्, प्रशंसनीय विलक्षण गतीच्या, पिंगट वर्णाच्या आणि उत्कृष्ट दंष्ट्रा असलेल्या अग्निला वायुनें उत्पन्न केलें. वायुसुत अग्नि बलवान्, चलाख, सर्वज्ञ, आनंददायक व कर्ता आहे. त्याची कांति सुवर्णासारखी असून त्याचे पिंगट केस मोठे तेजस्वी दिसतात. शास्त्रांनीं त्याचा जन्म गुहेंत मानला आहे, व तो गुहासंचारी आहे. ज्ञानाग्निची गुहा हृदय ही आहे. वैश्वानराची गुहा जठर आहे. अरणी हीदेखील एक गुहाच आहे. हा पराक्रमी अग्नि जन्मतांच द्यावापृथ्वी व्यापतो. हा गमनशील अग्नि आपल्या तेजानें आकाशाला व्यापून सूर्याच्या किरणांना प्रतिबंध करतो. हें त्या अग्निचें ऐश्वर्य अवर्णनीय आहे. असा हा अग्नि सूर्योदयाचे वेळींच जन्मास येतो. त्यावेळीं उषा सूर्याला घेऊन येते. पुढें शास्त्र नवलकथा सांगतें कीं, हा अग्नि पक्ष्याप्रमाणें झाडावरहि बसतो व दातांनीं अन्न खातो!

हे हनुमंता! गुरुजींनीं केलेलें अग्निनारायणाचें हे वर्णन तुझ्याशीं तंतोतंत कसें जमतें, याचें मी आपल्या मनाशीं आश्चर्यच करीत असतां, ते वेदोनारायण पुढें म्हणाले:

"हे प्रिय शिष्य हो! ह्या पराक्रमी अग्निची द्यावापृथ्वीप्रमाणे शक्तिमान कामदुधा आई असतां, तो आईचे दूध पिण्यासहि जास्त वेळ न थांबतां महान दूतकर्म करीत देवकार्याला वाहून घेतो", असें वेदच सांगतात. हे भाग्यवान अंजनानंदना! गुरुवर्यांच्या तोंडचें हे वर्णन कानीं येतांच मला हंसूं आले! व समर्थ रामदासांचें तुजसंबंधीं सुप्रसिद्ध अंजनीगीत आठवलें.

राम अंजनेमातेला म्हणतात:

"माते! तुझ्या उदरीं जाण।<br>
हनुमान जन्मला रत्न॥<br>
एवढें माझें रामायण।<br>
याचेनि योगें" ॥६॥

अंजना:

माझ्या दुग्धाची हे प्रौढी।<br>
कळिकाळाची नरडी मुरडी॥<br>
रावणादिक हीं बापुडीं।<br>
घुंगुरटीं काय!॥९॥<br>
असत्य रामा वाटेल बोली।<br>
दुग्धधारा सोडियेलीं।<br>
शैला-उदरीं खोंचविली।<br>
त्रिखंड तेव्हां!॥१०॥

केवढें हें विलक्षण विचारसाम्य! याहून देवमाता अदितिरूप द्यावापृथ्वींच्या स्तन्याचें सामर्थ्य अधिक तें काय असणार!

हे हनुमंता! पुढें ते गुरुजी म्हणालें कीं, आपल्या वेदशास्त्राप्रमाणें "अग्नि हा मानवांचा पूर्वज आहे व मर्त्य लोकांमध्यें वस्तीस राहिलेला असा अमर्त्य, म्हणजे अग्निच होय." हा वैश्वानर अग्नि अढळ, अबाधित, सर्वव्यापी आणि शरीरानें सारखा वाढणारा असा उत्पन्न झाला आहे. हें ऐकून माझे मनांत आलें कीं, ऐतिहासिकांनीं, तुज वानरालाहि मानवांचा पूर्वज मानला असून पौराणिकांनीं तुला ह्या मर्त्य लोकांतील एक अमर ठरविलें आहे. अनाघनंत असेंच तुझें मध्यस्थाचें पद आहे. असो. पुढें "सूर्य, इंद्र आणि अग्नि हें अग्निचें त्रिकूट होय", असें गुरुजी म्हणाले. तेव्हां त्यांचेंच अवतरणरूप असें सुग्रीव, वाली, व मारूते! तूं, असें वानर त्रिकूट माझे नजरेसमोर आलें.

गुरुजी पुढें म्हणाले, "अग्नि पक्ष्याप्रमाणें उड्डाण करीत मार्गक्रमण करतो." "तो देवाकडे त्वरेनें उडून जातो." "अश्वाप्रमाणें तो आपली शेंपटी हालवितो." "तो तेल खाणारा आहे." "तो पिशाचांचें, रोगांचें व राक्षसांचें निराकरण करणारा आहे." तसेंच हा मनुष्यें आणि देव या दोन वर्गांमध्यें इकडून तिकडे जात असतो. भक्तांची प्रार्थना देवांना कळविणें व देवांना यज्ञस्थानीं आणावयाचें, हीं दोन्ही कामें अग्निवर सोंपविलीं आहेत. तो देवांचा दूत आहे. त्याला मनुष्याचा दूतहि मानलें पाहिजे. तो आपल्या चातुर्यानें सर्व जाणतो. हें अग्निचें सारें वर्णन तुला कसें बरें तंतोतंत लागू पडतें? पुढें गुरुजी म्हणालें कीं, "अग्नि हा उत्तम वक्ता व गायक आहे." अग्नि हा वक्ता व उत्कृष्ट गायक असावा, आणि हे वानरश्रेष्ठा! त्याप्रमाणेंच तुझ्या ठिकाणीं वक्तृत्वाचीं व संगीतकलेची सीमाच झाली, असें वाल्मिकींनीं व समर्थ रामदासस्वामी यांनीं वर्णन करावें, याहून आश्चर्य ते कोणते? तुझी ती मधुर वाणी माझें कानीं कशी येत नाहीं? फार काय, त्या मधुर वाणीची कल्पनाहि माझे ठिकाणी कशी संभवत नाहीं! परमार्थात आप्ताचा शब्द हाच एकमेव श्रवणमनोहर असा विषय नव्हे काय? "नभासारखें रूप या राघवाचें" असें समर्थ रामदास वर्णन करतात. हे रामदूता! तूं त्या राघवाचा निकटसंबंधीच आहेस. शब्द हा आकाशाचाच गुण. नादब्रह्म म्हणजे अपरब्रह्मच तें.

अथवा अंजनानामक तमाकाशरूप महद्योनींत प्राणरूप वायुचा संचार झाला असतां जें तिसरें महद्भुत (अग्नितेज) प्रगट झालें व सूर्योपासकांचा मुलगा जो रामदास त्यास झोंबलें, तें मारूतिराया, तूंच नव्हे काय? अशा त्या महाकाशाचा नातू तो अग्नि अथवा तूं वायुनंदन! त्या तुझें अलौकिक गायन ऐकून संत-मुनि मौन पावले व कृतार्थ झालें, यांत नवल नाहीं. "वज्रतनू बलभीम पराक्रम। संगीत गायन सीमा रे" असें समर्थ रामदास तुझें वर्णन करतात. त्या दिव्य गायनाचे पडसाद माझ्या कानीं पडून मी केव्हां धन्य होईन बरें! हे बुद्धिप्रचारक देवा! निरभ्र आकाशाच्या पडद्यावरील तुझा उद्बोधक हनुमानमताचा संगीत बोलपट मला कधीं ऐकण्यास व पहाण्यास मिळेल बरें? असें माझ्या मनांत येतें.

हे हनुमंता! पुढें ते याज्ञिक म्हणतात कीं, अग्निला युद्धांत बोलावितात. तेथें तो सर्वांच्या अग्रभागी असतो. त्याचे थोर पराक्रम पाहून मनुष्य थरथर कांपतात! युद्ध करून त्यानें देवांकरितां जागा

मिळविली. (ऋ ७/५/६) तो आर्यांचा पुरस्कर्ता आहे, व अधर्मी पापी लोकांचा पराभव करणारा आहे. संत तुकोबाराय म्हणतात कीं, ''रात्रंदिवस आम्हां। युद्धाचा प्रसंग॥'' या दारूण युद्धांत तूं आम्हांला पुढारी लाभशील काय? प्रभु रामचंद्रच तुझ्या पराक्रमासंबंधीं म्हणतात– मुनीसी म्हणे श्रीराम। धन्य धन्य याचा पराक्रम। धन्य धन्य याचा जन्म॥ माझ्या अवतारा नाम याचेनी॥ ७/३६/७१ (भा.रा.)

गुरुजी पुढें अग्निची स्तुति करतात कीं, ''त्यानें अंतरिक्ष मोजलें व आपल्या महात्म्यानें आकाशास स्पर्श केला. तो चपल आहे.'' हें अखेरचें वर्णन ऐकत असतां, हे मारुते! तुझी समुद्रोल्लंघन करणारी प्रचंड उडी माझे नजरेसमोर आली. भवसागरावरील ही लोकविलक्षण उडी ज्यास साधली, तोच परमार्थातील मध्यस्थ नव्हे काय? ह्याप्रमाणें, मारुते, तो वृद्ध याज्ञिक आपल्या शिष्यांपुढें आपल्या उपास्याचा स्तव करूं लागला, तेव्हां तो अक्षरश: तुझेंच वर्णन करीत आहे कीं काय, असें मला वाटलें.

## पराक्रम

हे महावीरा! ते वेदमूर्ति गुरुजी पुढें अग्निनारायणाचा पराक्रम वर्णन करू लागले, तेव्हां तें ऐकून मलाहि मोठें स्फुरण चढलें. त्यांनीं त्यावेळीं ऋग्वेदांतील शेंपन्नास मंत्र भराभर म्हणून दाखविलें असतील. त्यांनीं त्यांतील भावार्थ असा सांगितला कीं, अग्नि हा संग्रामाचा अधिश्वर आहे. तो असूर आणि राक्षस यांना मारणारा म्हणून प्रसिद्ध आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील सत्यांयशाचें सूक्त याच त्याच्या पराक्रमांनीं भरलेलें आहे. तो शत्रूंचीं नगरेंच्या नगरें जाळून उध्वस्त करतो. शूरांच्या संग्रामांत व हातघाईच्या आणीबाणीच्या लढाईत लहानाकडूनहि तो मोठ्यामोठ्यांचा नि:पात करतो! अखेर ते म्हणालें कीं, असा हा क्रूरकर्मा जसा बलवान आहे, तसाच मोठा बुद्धिवान् कवि आहे; आणि विशेष हें कीं, तो अजर आणि अमर आहे. तो सनातन धर्माचे भूषण आहे.

हे चिरंजीव रक्षोघ्ना! तुझ्या पराक्रमाचें वर्णन याहून वेगळ्या शब्दांत काय करावें! समर्थ रामदासच तुज संग्रामाच्या अधिश्वराचें वर्णन करतात कीं,

कपिरिस घनदाटीं जाहली थोर आटी॥
म्हणवूनि जगजेठी धांवणें चार कोटी॥
मृतविरहित ठेले मोकळे सिद्ध झाले॥
सकळ जन निवाले धन्य सामर्थ्य चाले॥१०/३॥

थरकत धरणी हे हाणितां वज्रपुच्छें॥
रगडित रणरंगीं राक्षसें तृणपुच्छें॥
सहज रिपुदळाचा थोर संहार केला॥
अवघड गड लंका शीघ्र जाळूनि आला॥९/४॥

एकनाथ तुज धर्मभूषणाचें स्तवन गीत गातांना म्हणतात: अहिरावणें राम धरूनियां नेला थोर मांडिलें निर्वाण। पायातळीं राम उभा करूनियां म्हणतसे करीं रे स्मरण॥१॥ जगाच्या संकटीं रामातें स्मरति रामें स्मरावे कवणा। देवाचें मरण भक्तें चुकविलें म्हणोनी अमर केला हनुमंत॥२॥ न तुटे न जळे न बुडे संसारी असोनि अलिप्त। दुसरेनि अवतारें रामासी जन्मू परी हनुमंत जन्मातीतू॥३॥ देवासी जन्ममरण दिसतें अविनाशी। एका जनार्दनें केलें भक्त रे या॥४॥

हे बलभीमा, तूं ज्याप्रमाणें महावीर म्हणून प्रसिद्ध आहेस, त्याचप्रमाणें तूं बुद्धिमान, वेदवेत्ता, व्याकरणकार, नाटककार व संगीतज्ञ म्हणूनहि प्रसिद्ध आहेसच.

## मार्गदर्शक बंधु

हे हनुमंता! अग्निनारायणाचें वर्णन करणारे ते गुरुजी पुढें म्हणालें, हे प्रिय शिष्य हो! अग्नि हा शास्त्रांत पहिला मानव व अधिराजा गणला आहे. तो मानवाचा मार्गदर्शक पितर, आप्त अथवा बंधु आहे. तो जगाचा मित्र आहे. मित्र मित्राला असतो, किंवा आईबाप मुलाला असतात, त्याप्रमाणें अग्नि हा उपासकांचा कार्यसाधक असतो. हा सर्वदर्शी अग्नि चुकीच्या मार्गानें जाणाऱ्या उपासकाला योग्य मार्ग दाखवितो. देवाकडे जाणारे मार्ग पूर्णपणें जाणणारा असा तो आहे.

हे हनुमंता! तुलाही संत मार्गदर्शक म्हणूनच विनवितात कीं, ''काय भक्तिच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा॥'' –तुकोबाराय. रामदास तुला सारथी म्हणतात, आणि ''नांव मारुतीचें घ्यावें। पुढें पाऊल टाकावें॥'' असा इशारा देतात.

हे पुराणपुरुषा! ज्यावेळीं शिवरूप प्रथम जीवरूपांत अवतीर्ण झालें, अथवा ज्यावेळीं जीव-शिवांची प्रथम जणूं ताटातूट झाली, तेव्हांपासून जीवाला आपल्या पित्याचा, म्हणजे शिवाचा ध्यास लागला असेल, हें स्वाभाविक दिसतें. मग आजच्या भौतिक विज्ञानाच्या दृष्टीनें त्या आद्य काळास कोणी रानटी काळ असें खुशाल म्हणो. कोणताहि देश असो व कोणताहि काळ असो, आपण जेथून आलों, तिकडे जाण्याची उत्कंठा प्राणिमात्रास सहजच असते. फार काय, वनस्पतींचा बीजांकुर वाढत असतां आपल्या मातृभूमीकडे जाण्याची ओढ त्याच्या मुळांस उपजत दिसून येते. ही मुळांची वाढ जशी बाहेर दिसून येत नाहीं, त्याप्रमाणें मानवांच्या प्रवृत्तींत त्याच्या मनाची अंतर्मुख होण्याची सूक्ष्म प्रवृत्ति बाह्यत: दिसून येत नाहीं. पण झाडांच्या मुळांचे खोल वाढीप्रमाणें जीवाचें खरें जीवन त्या अंत:प्रवृत्तींतच असतें. आनंदकंद तेथेंच आहे. तेव्हां हे मानवांच्या पूर्वजा! आदिमानवांनीं त्या जगाच्या पित्याचा शोध प्रथम कोणाजवळ बरें केला असेल? तुम्हीं आमचे जनक पाहिलेत काय? असें त्यांनीं प्रथम कोणाला विचारिलें असेल बरें? मायामहेश्वर, म्हणजे त्यांचे खरे मातृ-पितृ देव दिसले नाहींत तोंवर, चुकून कां होईना, ''आई'' ''बाबा'' म्हणून तीं आदिबालकें कोणाला म्हणालीं असतील? त्या अजाण मुलांचा अज्ञानांध:कार प्रथम कोणीं घालविला असेल? त्यांना प्रथम प्रेमाची ऊब कोणीं दिली असेल? त्यांना प्रथम अन्न शिजवून कोणीं घातले असेल? मी हा मूलग्राही प्रश्न सर्व प्राचीन धर्मांना व प्राचीन आणि अर्वाचीन शास्त्रांना विचारला. तेव्हां त्यांनीं 'अग्नि' असें एकमुखानें उत्तर दिलें. या भौतिक व्यक्त जगाचें मूळ स्वरूप व जीवन तेज हे आहे, असेंच आधुनिक भौतिक विज्ञान म्हणालें; प्राचीन धर्मांनीहि तेंच उत्तर दिलें. अमेरिकेंतील तेझुक, कोलोश, ऐनो, अझटेक, पेरू, नाटचेझ, ओजिब्वे इत्यादि प्राचीन लोकांनीं अग्नि हेंच मूळ दैवत सांगितलें. आफ्रिकेंतील कांगो व डमरा लोक हेंच म्हणाले. युरोपांतील खिस्ती धर्म हा धात्वर्थावरून अग्निपूजकच असल्याचें विद्वान खिस्ती मानतात, असें आढळतें. आशियांतील पार्शी लोक अग्निपूजकच दिसले, आणि आमचा अनादि जो ऋग्वेद त्याचा आरंभ अग्निच्या स्तवनानेंच झाला

असून वेदांत निरनिराळ्या नांवांनीं त्याचीच उपासना प्रामुख्यानें सांगितली आहे. त्या वेदोनारायणाचे बोलण्यावरून असेंच आढळून आलें. छांदोग्यांत तत्वत: तेजापासूनच जगदुत्पत्ति सांगितली आहे. हे वायुसुता! असा जो अग्नि, तेंच तुझें रूप दिसतें. तुलाहि ''अग्नेय नम:। वन्हये नम:।'' असें सहस्त्रनामस्तोत्रांत म्हटलें आहे; व कृतयुगापासून तूं मारुति नांवानें प्रसिद्ध आहेस. ऋग्वेदांत तुझें बीजभूत चरित्र असल्याचें मंत्ररामायणावरून दिसतें.

## मध्यस्थ

हे हनुमंता! ते वेदोनारायण अग्निनारायणासंबंधीं पुढें असें सांगूं लागले कीं, ह्या सृष्टीचे चालक जे देव, त्यांचें मुख अग्निनारायण होय. अग्निला प्रसन्न केलें असतां देव प्रसन्न होतात. उलट अग्निच्या अनुकूलतेवांचून देव प्रसन्न होत नाहीत. यास्तव अग्निच्या उपासनेचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. दुसरें असें कीं, भक्तांच्या कर्माची सांगता करणारा अग्निदेव आहे. आपल्या कर्मात कांहीं उणें पडलें तर तें तो पुरें करतो. फार काय, आपल्याकरतां तो देवाची पूजा करतो. अज्ञानी लोकांकरतांच परमेश्वरानें हा अग्निदेव चिरंजीव करून ठेवला आहे. आपल्याला बळ प्राप्त व्हावें, म्हणून बलोपासक या अग्निची उपासना करतात. आपणां मर्त्य जीवांकरतां देवांना बोलविणारा महामध्यस्थ अग्नि होय. देवांना बोलावणें व देवांची आणि साधकांची गांठ घालून देणें, भक्तांचें संकट दूर करून त्यांचा उद्धार करणें हें तुजप्रमाणें अग्निचें विशिष्ट कार्य आहे. या तुमच्या महत्कार्याचा गुणगौरव ऋग्वेदांतील शेंपन्नास मंत्रांत केलेला आढळेल.

हे हनुमंता! प्रभु रामचंद्राशीं बोलण्याचें मुख तूंच आहेस. तुझ्या कृपेवांचून रामकृपा होतच नाहीं. समर्थ रामदास स्पष्टच सांगतात कीं, ''पावावया रघुनाथ। जया मनीं वाटे आर्त। तेणें घ्यावा हनुमंत। करील भेटी॥'' याहिपुढें जाऊन समर्थ सांगतात कीं, ''उपदेश देऊनी दिधला मारुति। स्वयें रघुपती निखीता॥'' पुढें आणखी ते निर्वाळा देतात कीं, ''नित्य निरंतर भजकारंक्षी। धरूनियां अभिमान॥'' हे हनुमंता!. अग्नि ज्याप्रमाणें अन्नांतील व हवापाण्यांतील दोष जाळून टाकून आमच्या खाद्यपेयांतील वैगुण्यें दूर करतो, त्याचप्रमाणें तूं आमच्या उपासनाकर्मातील वैगुण्यें दूर करून रामकृपेस आम्हांला पात्र करशील, हाच निर्वाळा समर्थ रामदास, ''तयावीण आमुचा परमार्थ सिद्धीतें न पावेकीं'', अथवा ''दासा रक्षिल हाच भरोंसां। वदतों त्याची आण॥'' या स्पष्टोक्तींत देत आहेत. समर्थ म्हणतात, ''स्वधामासि जातां प्रभू रामराजा। हनुमंत तो ठेविला याच काजा॥'' सारांश, अग्निप्रमाणें तुलाहि आम्हां अजाण जीवांच्या उद्धाराकरिताच परमेश्वरानें चिरंजीव केलें आहे. परमार्थसाधक तुझ्या मध्यस्थीनें परमार्थ साधतात, पण असें मुमुक्षूजन जरी थोडे असले, तरी या जगांत शरीरबळावांचून कांहींच चालत नाहीं. तें शरीरबळहि संपादन करण्याचें कामीं बलोपासकांचा तूंच मुख्य उपास्य आहेस. तसेंच दुर्बल लोक देवाकडे जाऊं शकत नाहींत. अशा वेळीं देवांना त्यांच्याकडे नेणारा तूंच आहेस. प्रभू रामचंद्राची भेट सुग्रीव, सीता, चंद्रसेना, भरत, यांस तूंच करवून दिलीस. तेव्हां ते अग्निहोत्री आपल्या उपास्याची स्तुति करीत असतां हे वायुनंदना! ती सारी स्तुति ते तुझीच करीत होते, असें माझ्या मनानें घेतलें. रामाची व सुग्रीवाची मैत्री जोडण्याकरितां तू अग्नि सिद्ध केलास असें वाल्मिकी वर्णन करितात, तो सिद्ध अग्नि तूंच, असें मला वाटूं लागलें. ''अग्नि गर्भी रामदूतो'' (८९) असें हनुमत्पटलांत तुला म्हटलें आहे. तसेंच तुझें कवचांत ''ॐ नमो भगवते हनुमते पवनपुत्राय वैश्वानर मुखाय'' (३५) असें ठिकठिकाणीं म्हटलें आहे.

## संहारक आणि संरक्षक

हे हनुमंता! ते वृद्ध अग्निहोत्री आपल्या शिष्यांस पुढें म्हणाले, हे प्रिय शिष्य हो! देवाचें संरक्षक स्वरूपच आपल्याला नेहमीं आवडतें. पण देवाचें संहारक स्वरूप तितकेंच महत्त्वाचें व हितपरिणामी असतें, हे आपल्या लक्षांत येत नाहीं. वस्तुत: संहार आणि रक्षण हीं एकाच क्रियेची दोन नांवे आहेत. चुलींतला अग्नि शोभनांचा नाश करतो व त्याच क्रियेनें पाकसिद्धी करतो. ज्या क्रियेने तो पुष्टिदायक अन्न तयार करतो, त्याच क्रियेनें तो त्या अन्नांतील अपायकारक अंश अथवा सूक्ष्म रोगबीजें भाजून टाकतो. भयंकर व अनावर झालेल्या साथीच्या रोगांचीं बीजें अग्निप्रलयांनीं नाहींशीं झाल्याची उदाहरणें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. ग्रीष्मऋतूंतील असह्य उष्णता अरण्यांतील वृक्षलतांना नवी पालवी उत्पन्न करते. सूर्याचा दु:सह ताप हाच मेघवृष्टीला कारण होतो. सतीचा जिवंत देह जाळणारा निष्ठूर चिताग्नि तिच्या आत्म्यास शान्ति देत असतो! घोर आणि शिव अशीं अग्निचीं दोन मुखें आहेत. भयंकर उष्णता म्हणजे मरण होय. सौम्य उष्णता हेंच जीवन आहे. शत्रूचा नाश हेंच संरक्षण आहे. रोगनाशन हेंच आरोग्य आहे. या पुरातन अग्निनें युद्धामध्यें वध करणारे लोक एकमेकांवर पडले असतां आपल्या भक्ताचें घरदार सांभाळलें. हे अग्ने! आमची तुझ्याशी मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं, हें ऋग्वेदांतील पहिल्या मंडळाच्या चौऱ्याण्णवाव्या सूक्ताचें पालुपदच आहे. उपासकांचें कल्याण कशांत आहे तें तोच जाणतों.

हे हनुमंता! तुझेंहिं असेंच वर्णन आढळतें. म्हणून तुझें स्तोत्र गातांना संत तुझे उभयविद्य गुण आठवितात. प्रलयकाळचा अग्निच अशा त्वां लंकेची होळी केली असतां तुझें पुच्छ जळालें नाहीं व जानकी देवीच्या केसासहि धक्का लागला नाहीं. रावण, कुंभकर्ण, अहिरावण, महीरावण, यांच्याशीं रणकंदन करीत असतां तूं राम-लक्ष्मणांस खांद्यावर वाहून सुरक्षित नेलेंस. हे हनुमंता! तुझे महाभक्त देवनाथ यांच्या निर्याणसमयीं ते राम-जन्माचें कीर्तन करीत असतां, त्यांनीं पूर्वी भाकित केल्याप्रमाणें कीर्तन-मंडपास भयंकर आग लागली! तरी त्या आगीच्या डोंबांत उभें राहून देवनाथ प्रेमभरानें तुला पदें म्हणत आळवीतच होते. पुढें ''तुज काय म्हणावें आम्हीं। दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी॥धृ०॥'' असें त्या अग्निच्या डोंबांत म्हणत म्हणत ते अग्निरूप झाले, व दुसऱ्या दिवशीं त्यांचे प्रिय शिष्य मल्हारनाथ यांस तेथें एक तांब्याची तुझी मूर्ति सांपडली. यावरून तूं, तुझे भक्त आणि अग्नि सारे एकरूपच आहांत, असें म्हणावें लागतें.

## अग्निविद्या

हे रामदूता! मीं त्या अग्निहोत्र्यांचे तोंडून यापुढें अग्निचें ऐकलेलें वर्णन फारच मनोहर आणि उद्बोधक असें मला वाटलें. ते गुरुजी म्हणालें कीं, ''वेदांनी प्रामुख्यानें वर्णिलेलें

या अग्निनारायणांचें कार्य म्हणजे देवांना बलवर्धक हवि पोंचविणें हें आहे. हव्यवाहन, होमहवन हीं त्यांचीं सुप्रसिद्ध नांवें आहेत. अग्नि गतिमान् झाला कीं तो वायुरूप होतो. त्याचे किरण सात नद्यांत प्रविष्ट होतात. तो वैश्वानर अग्नि नद्यांना गति देणारा म्हणून वर्णिला जातो. यांतील रहस्य जाणलें पाहिजे.''

''हे शिष्य हो! या अनंत सृष्टि चक्रांतील आपल्याला ज्ञात आणि अज्ञात असें असंख्य व्यवहार अनादि काळापासून ईशसंकेतानुसार चालू आहेत, व ते पुढें अनंत काळ तसेच चालू राहतील. हा एवढा प्रचंड व्यवहार ईशसत्तेनेंच होत असला, तरी राज्ययंत्र चालण्यास ज्याप्रमाणें अनेक अधिकारी व नोकर नेमावे लागतात, त्याचप्रमाणें या सृष्टिकर्माचें नियंत्रण करणारे अनेक देव असले पाहिजेत, हे शास्त्र आणि अनुमान यांवरून उघडच दिसतें. त्या सर्व देवतांकडे त्यांचें त्यांचें अन्न पोचविणारा अग्निदेव आहे. इतकेंच नव्हे, तर हा सृष्टिरूप जो महायज्ञ सुरू आहे, त्यातील यज्ञपुरूषच तो आहे. व्यष्टी-समष्टीचे जीवन चालविणारा व या पांच भौतिक (आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी) विश्वाचा महामध्यस्थ चैतन्यदेव तोच आहे. हे विद्यार्थीजन हो! अग्नि, इंद्र, मित्र, वरूण, यम आणि मातरिश्वन् अशा अनेक नांवांनीं एकाच देवाला संबोधितात. तोच पक्षयुक्त दिव्य सुपर्ण होय.

हे हनुमंता! वेद हे परोक्षप्रिय असल्यामुळें वेदांतील अग्निविद्या गूढ आहे. वेदांतील अग्नि या नामाचा अर्थ विस्तव असाच केवळ नाहीं. आधुनिक दृष्टीनें विचार करणारे लोक अग्निचे जीवनाग्नि, राष्ट्रीय जीवनाग्नि, व पांच भौतिक अग्नि असे निरनिराळे अग्निपर अर्थ करतात. कोणी हृदयास गार्हपत्य व मनास आहवनीय अथवा दक्षिणाग्नि मानतात. प्रत्यक्षानुसारी शास्त्रें, व व्यावहारिक उपयुक्ततावाद यांस उत्तरोत्तर जास्त महत्व येत असल्यामुळें आधिदैवत जगाकडे फारसे कोणाचें लक्ष जात नाहीं. अध्यात्म म्हणजे शरीरासंबंधी जठराग्नि, भौतिक म्हणजे गिरण्या, कारखाने, व इंजिनें यांतील अग्नि, अर्धभौतिक म्हणजे समाजांत पेटलेला राष्ट्राभिमान, अशी अग्निविद्येची आधुनिक परिभाषा व सजावट बनत चालली आहे. या नवीन तऱ्हेच्या अर्थनिष्पत्तीत पुराणें ही अगदी टाकावू व भलताच गैरसमज माजविणारीं प्रमाणें आहेत, असेंच बहुधा मानण्यांत येतें. मला मात्र तसें वाटत नाही. पुराणांचें रहस्य जर आमचे लक्षांत येईल, तर तींच सर्वश्रेष्ठ ठरतील, असें मला वाटतें. पण अग्निपुराणांत अग्निचें माहात्म्यं मुळींच वर्णिलेलें आढळत नाही व तुझें तर पुराणच नाही. अशा स्थितींत वेदांतील अग्निविद्येला रामायणांतील तुझ्या चरित्राची जोड देऊन एक नवीनच पुराण मी रचूं लागलों! एखादा दुभाषी ज्याप्रमाणें भाषांतर करतो, त्याप्रमाणें मी अग्निविद्येचें तुझ्या चारित्र्यांत रूपांतर करूं लागलों. विषयशास्त्रीय किंवा व्यावहारिक कोणताहि असो, त्याचें चिंतन करणारा जो तो स्वभाषेंतच करणार. त्याप्रमाणें, तुझ्या एकनिष्ठ भक्तिच्या परिभाषेंतच साऱ्या अग्निमाहात्म्याचें चिंतन करावें अशीं मीं आवड धरलीं. यामुळें गुरूवर्याच्या तोंडची ती अग्निविद्या श्रवण करून तिचें मी मनन करू लागलों असतां, तूंच मूर्तरूपाने मला दिसूं लागलास.

श्रीकृष्ण गीतेंत म्हणतात कीं, श्रौतस्मार्त यज्ञ तो मी, स्वधा आणि औषधी मी, मंत्र आणि तूप मी, तसेंच अग्नि आणि हवि मीच. हेच भगवान, हनुमान तो मीच असेंहि भागवतांत उद्धवाला सांगतात. फार काय? होमसाधन, होमद्रव्य अग्नि, कर्ता आणि हवनक्रिया हीं ब्रह्मवेत्त्याच्या दृष्टीनें ब्रह्मातिरिक्त नसून ब्रह्मच आहेत व ब्रह्मरूप कर्माचे ठिकाणीं लय लावून राहिलेल्या त्या ब्रह्मवेत्त्याला प्राप्त होणारे फलहि ब्रह्मच आहे. तसेंच, तुझ्या सहस्त्रनामावलींत वरील बहुतेक सर्व नांवें तुझी म्हणून वर्णिली आहेत.

गोपालकृष्णास विसरून ऋषींचे चाललेले यज्ञयाग त्यांच्या पाल्यांनीच फोल ठरविले! शंकरावांचून झालेला दक्षयज्ञ विफल झाला, तुझें महत्त्व न जाणतां केलेले अंगिरस व भार्गव यांचे यज्ञ व कृताकर्माऋषींचे यज्ञ, तूं व्यर्थच मानलेस. इंद्रजिताचा यज्ञहि तूं निंद्य ठरविलास. या तुझ्या कृतींत, ''श्रेष्ठ यज्ञ पुरुष तो मी'', असेंच पर्यायानें तूं जाणविलेंस, असें वाटतें. हे हनुमंता! एकनाथांनीं तुझें जन्मवर्णन करतांना तुला महासमर्थ यज्ञपुरुषच म्हटलें आहे. हे लंकाप्रासाद भंजका! त्या लंकादहनप्रसंगी तूंच अग्निरूप झाला होतास व तुझें पुच्छच समिधारूप झालें होतें. आहवनीय आणि दक्षिणाग्नि सारे तूंच झाला होतास. सारे यज्ञ ज्ञानमय यज्ञांत पर्यवसान पावतात आणि ज्ञानमय यज्ञ हेंच तुझें रूप आहे. सर्वज्ञ अशा अंतर्मनांत अल्पज्ञ बहिर्मनाचा जो यज्ञ, त्याचेंच नांव हनुमान् असें मी समजतों. आज्ञाचक्रांतील जो दिव्य तृतीय नेमरूप अग्नि, तोच खरा वायुनंदन नव्हे काय? ज्ञानदेव मारुति त्यालाच म्हणत असतील.

तसेंच, हे हनुमंता! यज्ञ म्हणजे त्याग-पूजा आणि संगतिकरण निस्सीम त्यागानेंच अमृततत्वाची प्राप्ती होते. तूं त्यागमूर्तिच आहेस. अद्वयभजन हींच सर्वोत्कृष्ट पूजा होय. तेंच तुझें स्वरूपलक्षण आहे, आणि संगतिकरण हे तर तुझें मुख्यच अवतारकृत्य आहे. म्हणून यज्ञनारायण तो तूंच यात शंका नाही.

हे हनुमंता! त्या विद्वान गुरुवर्यांच्या तोंडचे हें वर्णन ऐकल्यानंतर मी या देहाश्रित यज्ञांत तुझें स्वरूप कोणतें ते पाहूं लागलों. तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं श्येनयागांत यज्ञभूमिश्येन पक्ष्याच्या आकाराची करतात. हे रामदूता! 'गरूडाय नम:' हें तुझेंच नाम आहे, आणि तुझ्या अनेक मुखांत गरूड हें एक रूप आहे. या हृदयस्थ जनार्दनाचे गरूड आणि तूं हे दोघे प्रसिद्ध पार्षदगण आहांत. देवाला भक्ताकडे वाहून नेणारे तुम्ही आहांत. ''स्वामी रामाचें वाहन'' हे तुझें वर्णन आहे. त्याचप्रमाणें सहचारी देवतांना मधु आणि अमृत येथेष्ट देणारे तुम्हीच आहांत. सोम हाच शरीरांतील जीवनरस आहे. अस्थि, मज्जा, स्नायु, शिरा, धमन्या, केशवाहिन्या आणि नलिका या सात नद्यांतून अन्न-रस-रक्तरूप जीवन पुरविणें हें शरीरांत जोंवर वैश्वानर अग्नि आहे तोवरच शक्य आहे, आणि वायुनंदना! यज्ञपुरुष वैश्वानर हें तुझेंच स्वरूप आहे. अन्नपचनासाठीं तुझेंच स्मरण करतात. अग्नि, वन्हि, स्वाहाकार, स्वधाकार, हवि, कव्य, हव्य अशीं तुझीं यज्ञसंबंधीं कितीतरी नांवें आहेत.

हे हनुमंता! तुझीं पांच, सात आणि अकरा अशीं मुखें तुझ्या उपासना ग्रंथांत वर्णिली आहेत. पांच, सात आणि अकराच काय, तुझीं अनंत मुखें मानणेंहि योग्यच होईल. या शरीराग्निंत पांच प्रकारचें पित्त, सात प्रकारचे धातु, मनासहित अकरा प्रकारचे रुद्रप्राण, हीं सर्व तुझीं अग्निरूप देवता मुखेंच होत.

हे वायुनंदना! कविवर्णित तुझे दिव्य तेज मनांत आणतांच तूं साक्षात् अग्निच आहेस, ही वेगळी कल्पना करावी लागत नाहीं. निस्सीम त्याग हीच तुझी यज्ञभूमि आहे. देवसेवा हें तुझें अग्निव्रत आहे.

हे हनुमंता! सूर्याला ग्रासणारा अग्निशिवाय दुसरा कोण असणार! हे मारूते! लंकेतील रणयज्ञाचा यजमान जर श्रीराम, तर होता (अग्नि) तुझ्यावांचून दुसरा कोण असणार! हे पिप्पलाश्रया! या अश्वत्थ वृक्षावर दोघेच पक्षी आहेत. त्यांपैकीं एक आत्माराम, मग दुसरा त्याचा सखा तुझ्यावांचून दुसरा कोण? आणि तो तरी पिप्पलाश्रित अग्निच नव्हे काय?

हे सुग्रीवसचिवा! मस्तिष्क आणि मज्जा हें तुझें ज्ञानतंत्र आहे, तर बाकीचें शरीर हें तुझें क्रियातंत्र आहे. उंच माडीवर गुप्त कचेरी आणि तारायंत्र आहे. खालीं मोठा गुंतागुंतीचा विविध क्रियांचा कारखाना आहे. ज्ञान आणि क्रिया हे सापेक्ष गुण कार्यक्षम आणि व्यवहार्य होण्यास ते एकाच व्यक्तीकडे असले पाहिजेत. यास्तव संज्ञान-संदेश-वाहकाप्रमाणें हविर्वाहक आणि शक्तिप्रेरकहि तूंच असला पाहिजेस. आमच्या शरीरांत आम्हांस सामान्यत: अज्ञात अशीं जीं रुधिराभिसरणादि कार्ये होत आहेत, त्यांचा नियंता हे वायुनंदना, तूंच आहेस. उष्णता आणि गति हे दोन जीवनाधारधर्म, वायुसुतरूप जो अग्नि, त्याचेच आहेत. इतर कोणाचेच ते असूं शकणार नाहींत.

हे हनुमंता! रामायणांतील अयोध्या म्हणजे हें आमचें शरीर, असें म्हणतात. पण रामायणांतील अयोध्या आणि लंका हीं मीं पाहिलीं नाहींत, आणि राम-रावण युद्धहि मीं पाहिलें नाहीं. तसेंच या शरीरांतर्गत सर्व हालचाली कोणाच्या प्रेरणेनें कसकशा चालतात, हें तरी मला कोठें दिसत आहे? या पिंडांतील यज्ञक्रिया आणि याज्ञिक हेहि अदृश्य असल्यामुळें ते तरी कसे जाणावेत? पण मी असें कोणास म्हणतांना ऐकतों कीं, जिव्हा हाच होता. ब्रह्मा आणि दक्षिणाग्नी म्हणजे मन, पृथ्वी म्हणजे बस्तीचा भाग; द्यावापृथ्वी म्हणजे छाती आणि बस्ती; फुप्फुसें हाच स्वर्ग; हृदय हेंच अंतरिक्ष; आणि बस्ती हीच पृथ्वी. हविर्धन म्हणजे फुप्फुसें. सोम म्हणजे अन्नदांत, हेच सोम कुटण्याचे दगड, सोम आहवनीय मुख, सोमवेदि म्हणजे नाक, यज्ञिय पशु म्हणजे विकार, मनाच्या प्रेरणा हेंच हवनीय आज्य, आणि यूप म्हणजे हृदयस्तंभ होय. पण विशेष चैतन्यरूप हविवाहन कोण? तूंच नव्हेस काय?

हे रामदूता! वाल्मिकीनें रामचरित्राच्या निमित्तानें लिहिलें तेवढेंच काय तें तुझें मुख्य चरित्र लोक-प्रसिद्ध आहे. तुझी अग्निशीं तुलना करण्यास दुसरी फारशी साधार माहिती मिळत नाहीं. यामुळे हे हनुमंता! या यज्ञशालेशीं तुझा संबंध निरखित असतां अनुमानानें व ऐकींव माहितीवरून रामायणांतील कित्येक ठळक ठळक गोष्टी मी ह्या शरीराचे ठिकाणींच शोधूं पहात आहे. हृदय हीच ती अयोध्या आणि यकृत हीच ती लंका. सूर्यवंशी राम हृदयकमलांत अथवा शतदलकमलांत स्थित असेल. सूर्याचा अंश राजा सुग्रीव हा नाभिकमलाचे ठिकाणीं मणिपूर चक्रांत किंवा कंठस्थ विशुद्ध चक्रांत वसत असेल. मैद आणि द्विविद हे अधोगामी मज्जातंतू असतील किंवा श्वासोच्छवास क्रियारूपहि ते असतील. सुषेण हा वरूण देव म्हणजे ब्रह्मचारी असेल. नील हा अग्निचाच अंश आहे. या शरीरांत मस्तिष्क, हृदय, मन, उदर, बस्ती, नाभि, सुषुम्ना अशीं अग्निचीं निरनिराळीं केंद्रें आहेत. जांबवान हा ब्रह्मा आहे. याचें मस्तिष्क हें मुख्य स्थान आहे. शरभ हा प्रतिक्रियारूप पर्जन्यदेव असावा असें वाटतें. नल विश्वकर्म्याचा अवतार म्हणवितो; आणि तूं तर रामदूत वायुसुत महारूद्र हनुमान म्हणजे वैश्वानर आहेस, असें मी मानतों, तरी हीं माझी अनुमानें रास्त नाहींत काय?

हे वायुनंदना! या शरीरांतील असंख्य रक्तपेशींतील प्रत्येक पेशींत चैतन्याग्नि आहेच आहे. पण त्या अग्निस्फुल्लिंगाचें महत्त्व व शाश्वति तीं काय? वैश्वानराचे प्रभाणूच ते. ज्याप्रमाणें खोलींत दिवा नीट जळत आहे तोंवर दाराबाहेरच्याहि प्रभेचा घात समीर करूंच शकत नाहीं, त्याप्रमाणें तुझ्या सत्तेवरच असंख्य वानरें अजिंक्य होऊन बसलीं. वैश्वानराचे सत्तेवर असंख्य रक्तपेशी कार्यक्षम होतात. प्रत्येक जीवबीजांतील आकर्षक बिंदु हें तुझें रूप आहे, असें शास्त्रसंशोधनावरून उघड दिसतें.

हे हनुमंता! अशोकवनांतील सीतेला तूं असें म्हणालास कीं, ''हे मैथिली! हवन केलेलें द्रव्य ज्याप्रमाणें अग्नि इंद्राकडे नेऊन पोंचवितो, त्याप्रमाणें प्रस्त्रवण पर्वतावर बसलेल्या राघवाकडे मी आजच तुला नेऊन पोचवितों.'' या तुझ्या म्हणण्यांतच तूं आपलें देवदूतलक्षण वैश्वानरत्व अप्रत्यक्षरीतीनें प्रगट केलें नाहींस काय?

हे हनुमंता! मति आणि गति हें तुझें रूप आहे. विचार आणि आचार हा तुझा स्वभाव आहे. सुग्रीव, सीता, लंका एतद्रूप देहपुरीशीं पुरुषाचा (आत्मारामाचा) संयोग हें तुझें चारित्र्य आहे. प्रतिकार आणि स्वाधीनता हा तुझा पराक्रम आहे. शिव आणि सेवा हें तुझें व्रत आहे. स्वामिनिष्ठा आणि अनासक्ति हा तुझा धर्म आहे. पावित्र्य हें तुझें शील आहे. तेजोनिधि हें तुझें दिव्यदर्शन आहे. हे वायुनंदना! प्रकाश, स्पंद संगतिकरण, प्रतिकार, प्रसार, पावित्र्य, तेज, संहार, इत्यादि अग्निचेंच हे धर्म तुझेहि नव्हते काय?

तसेंच हे लक्ष्मण प्राणदात्या हनुमंता! तूं या भवरोगावरील एक अलौकिक वैद्य आहेस. तूं ज्या रुद्राचा अंश आहेस, तो रुद्र सुप्रसिद्ध भिषक् आहे. तुझा जनक जो वायु, तो रोगनाशक म्हणून स्तविला जातो. तुझेंहि कवच पटलांत रोगनिवारक माहात्म्य परोपरीनें सांगितलें आहे. अग्नि हें जें तुझें स्वरूप, तेंहि व्याधिहारक असें मानलें जातें. हे हनुमंता! या शरीरास रोग हेंच एक मोठें दु:ख आहे. आधि आणि व्याधी यांनीच मनाची शांति दुरावते. दुष्प्राप्य व अनिष्ट विषयांसंबंधीं मनाचा मोह ही भयंकर आधि आहे. हा जो मोहजन्य ताप, तोच मारीच राक्षस असें मला वाटतें, आणि व्याधि हाच तो क्रूर दशानन असावा! जीवनरामाची सीतारूप शांति ह्यांच्यामुळेच दुरावते. मग शांति गेली कोठें? हेंच अस्वस्थ जीवास कळत नाहीं. अशा वेळीं विचारपूर्वक आचार असा जो तूं, त्याची फार गरज भासते. हें संशोधक दृष्ट्या! हे प्रज्ञावंत पुरुषा! मर्मनियामक शक्तिस प्रेरणा देणारा तूंच आहेस. हे वायुनंदना! मी असें ऐकतों कीं, असूर राक्षस, यातुधान, ऋव्याद, क्रविष्णु, परासुतृप्त, हे सारे या पिंडांतर्गत अस्वास्थ्य वाढविणारे व जीवाची शान्ति धोक्यांत घालणारें कृमि व रोगजंतु यांचे वाचक शब्द आहेत. सूर्य, विद्युत व अग्नि, हे तुझें मूलरूप जो रुद्र, त्या रुद्राचेच प्रकार आहेत. अथवा ते अग्निचेच तीन प्रकार आहेत. रोगनाश हा त्यांचा विशेष

गुणधर्म प्रसिद्धच आहे. म्हणूनच त्यांस रक्षोहा असें म्हणतात. शास्त्रांत वैद्य व औषधी यांसहि रक्षोघ्न म्हटलें आहे. या रक्षोहा नामक अग्निदेवाचीं सूक्तें ऋग्वेदांत प्रसिद्धच आहेत. विकारी आणि अविकारी जीवाणू, कृमि आणि रोगजंतु यांची अगणित संख्या या शरीरांत वावरत आहे. या जीवनरूप यज्ञांत विघ्न करण्यास सदा धडपडत असलेलें हे असूर आणि राक्षस इंद्रिय देवतांना सतावून सोडीत असतात. हा देवासुरसंग्राम खंड सुरूच आहे. याच संग्रामाचा राम-रावण युद्ध हा एक विशेष भीषण असा प्रकार असावा काय?

हे हनुमंता! या मारीच-रावणरूप आधिव्याधींनीं जीवनरामाच्या सीतारूप शांतीला हरण करून नेली असें वाटतें. तेव्हां ती कोणीं नेलीं व ती कोठें प्राप्त होईल? ह्याचा शोध लावणारा विचारपूर्वक आचार म्हणजे तूंच सचीव उपयोगास आलास. तुझ्या या शान्तिप्रापक, चिकित्सापूर्वक शोधानें शरीरांतील अधिकारी जीवाणुरूप वानरांस हर्षवायु झाला, व पुढील युद्धांत त्यांस प्रतिकारक्षम करण्यासाठीं व उत्साहप्रेरित करण्याकरिता तूं त्यास मधुवनाची हवापालट करून शक्तिवर्धक रस पाजून समर्थ केलेंस, असें वाटतें.

हे हनुमंता! बस्तिरूप अशोकवनिकेंत राजयक्ष्मा जंतुरूप राक्षसिणींनीं शांतिरूप सीतेला घेरली आहे, हें वृत्त जीवनरामाला सांगणारा समर्थ तूंच एक ठरलास! एरव्हीं या देहयंत्रांतील गुप्त घडामोडी उघड कोणाला कळणार आहेत? त्याला तुझ्यासारखाच स्वतंत्र मतिमान् आणि गतिमान् अग्निरूप असा सचिव पाहिजे.

(क्रमशः)

---

(पृष्ठ क्र. ३१ वरून)

साधुसंतांकरितां, मुमुक्षूजनांकरितां, योग्यांकरितां, संन्याशांकरितां. विरक्तांकरितां व ज्ञानीजनांकरितां बांधून त्यांत सर्वप्रकारें सोय केली म्हणजे तें बाबांचे सुंदर पारमार्थिक स्मारक होईल. बाबांचें मुलांवर फार प्रेम असे. ते लोकांस औषध सांगत असत. येवढ्याकरितां सर्वतऱ्हेची, सर्व भाषांची विद्यामंदिरें, विद्यापीठें, उच्चविद्यापीठें व विश्वविद्यालयें, बालचमू वगैरे स्थापन करून त्यांत त्या विषयाच्या विद्यार्थ्यांस ज्ञानार्जन करतां आले व त्यांच्या जीवितरूपयात्रेची कालानुरूप त्यांच्या स्थितीप्रमाणें, त्यांचे आवडीप्रमाणें, त्यांच्या बुद्धिमत्तेप्रमाणें त्यांचेजवळ सामग्री तयार झाली म्हणजे तें बाबांच्या शिशुप्रेमाचें, वैद्यशास्त्रावरील व निरनिराळ्या भाषांवरील प्रेमाचे स्मारक होईल. बाबांस संस्कृत उत्तम येत होतें. बाबा संस्कृतपंडित होते. बाबा अप्रतिम, सुंदर गायनपटु व गायनप्रेमी व गायनज्ञाते होते. म्हणून संस्कृत पाठशाळा, वेदशाळा, गायनशाळा ही त्यांची त्या त्या विषयासंबंधानें स्मारकें होतील. बाबा गोप्रिय होते. त्यांच्या गोष्टींत पुष्कळ वेळां 'गौ' शब्दांचा उल्लेख असे. म्हणून गौशाळा हें त्यांचे त्यासंबंधाचें स्मारक होईल. शिरडींत लवकरच गंगा येणार आहे, असें बाबा म्हणत असत. म्हणून लेंडीनाल्यांत श्री गोदावरीचा प्रवाह सोडून त्यास घाट बांधण्याची व्यवस्था करणें म्हणजे हे बाबांचे त्यासंबंधाचें स्मारक होईल. बाबा पूर्ण व्यवहारी होते म्हणून शहर रचना आदिकरून ज्या योजना वर दर्शविल्या आहेत त्या बाबांच्या व्यवहारचातुर्याचें स्मारक होतील. बाबांच्या मंदिरावरील शिखर व मनोरे हे त्यांच्या हिंदुमुसलमान जातीवरील समप्रेमाचें स्मारक होईल. अशातऱ्हेचें हिंदुमुसलमान प्रेम समत्वाचें स्मारक जगांत, क्वचित ठिकाणींच पहावयास सांपडेल, किंबहुना नाहींच म्हटल्यास त्यास अपवादच सांपडणें कठीण. एकाच मंदिरांत हिंदुस्थानांतील सर्व देवतांची व तीर्थांची स्थापना, हें बाबांच्या विश्वव्यापकतेचें स्मारक होईल. मशिदींत अग्नि, व अग्निहोत्र किंवा अग्यारी हें बाबांच्या हिंदु-मुसलमान व पार्शी जातीच्या पूर्ण व समप्रेमाचें वर लिहिल्याप्रमाणें अश्रुतपूर्व व अदृष्टपूर्व स्मारक होईल. या योजनेस अपरिमित द्रव्याची जरूरी आहे हें वर लिहिलेंच आहे, व द्रव्याची सोय झाली म्हणजे योजक व कल्पक ही अपरिमित निघतील. योजना अश्रुतपूर्व नाहींत. कोठें पहिली, तर कोठें दुसरी, कोठें तिसरी, तर कोठें चवथी पहावयास मिळतात. (हरिद्वार, काशी, द्वारका, त्र्यंबकेश्वर वगैरे) फक्त शिरडींत त्यांचें सर्वांचें केंद्रीकरण व्हावें येवढीच इच्छा. गुरुमायेची जशी इच्छा किंवा मर्जी असेल तसें होईल.

पृथ्वी

अभेद परि आमुचा अससि
तूंच येशू खरा।
असे वदति ख्रिस्ति गा,
कितिक पारसीका नरा।
तुला म्हणत आमुचा जगतिं
तूंच वैश्वानरा।
अशा तुज नमो नमो
विमल साइ गंगाधरा॥१॥

---

## 'श्री साईलीला'च्या वाचकांना आवाहन

आपण 'श्री साईलीला'चे सुजाण वाचक असल्याने आध्यात्मिक, धार्मिक, पारमार्थिक, संस्कारशील, मनोविश्लेषणात्मक, विचारप्रवण वाचन, मनन, चिंतन करीत असाल. अशाप्रकारचे अनुभवही आपण घेत असाल. त्यामुळे आपल्या विचारांना अधिक चालना मिळत असेल. विचारांच्या कक्षा वेगवेगळ्या दिशांनी रूंदावत असतील. हे विचार कुठेतरी प्रगट व्हावेत अशी अनिवार इच्छाही आपल्याला झाली असेल. तर मग वेळ कशाला, आपले विचार आपल्या लेखणीतून लागलीच कागदावर उमटू द्या. आम्ही त्यांची मुद्देसूद मांडणी करून त्या योग्य विचारांना 'श्री साईलीला'त नक्कीच स्थान देऊ!

---

'श्री साईलीला'चा अंक मिळत नसल्यास किंवा वितरणासंबंधीच्या अन्य तक्रारींसाठी वितरण व्यवस्थापक, 'श्री साईलीला', ८०४-बी, साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई–४०००१४. यांच्याशी संपर्क साधावा. आपल्या तक्रारीची त्वरित दखल घेण्यात येईल.

---

'श्री साईलीला'तून श्री साईसच्चरिताच्या गद्य भाष्य टीकेचे मागील अंकापर्यंत अध्याय २७ क्रमशः प्रसिद्ध झाल्याचे 'श्री साईलीला'च्या वाचकांना माहीत आहेच. या गद्य भाष्य टीकेचे ग्रंथरूपाने प्रकाशन झाल्याने 'श्री साईलीला'तील प्रकाशन लेखकाच्या विनंतीनुसार थांबविण्यात येत आहे.

## श्री साईभक्तांना सूचना

श्री साईबाबा संस्थान, शिरडीला अर्पण करण्याची देणगी रक्कम, आपण युनियन बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत विना-बँक-आकार जमा करू शकता. आपली रक्कम श्री साईबाबा संस्थान, शिरडीकडे जमा होऊन आपणास संस्थानमार्फत पोच-पावती व उदी-प्रसाद पाठविण्यात येईल.

## श्री साईबाबांच्या जीवनकथा

— चकोर आजगांवकर

**श्री** बाबांनी अवधूत सच्चिदानंद श्री गुरुतत्वाचा केलेला जयजयकार हा फारच बोलका आणि अर्थपूर्ण आहे. श्री गुरु ही एक व्यक्ती नसून ते एक स्थूलाकडून सूक्ष्माकडे, जडाकडून दिव्याकडे, अंध:काराकडून प्रकाशाकडे नेणारे तत्व आहे. सगुण-निर्गुणाच्या सीमेवर वावरणारे हे तत्व गुरुचरणाच्या (पादुकांच्या) रूपाने प्रतिकात्मतेने दाखवितात. श्री गुरु हे शाश्वताचे दीप-स्तंभ, संसारसागरातील नौका, भक्तांच्या कामनांचे कल्पवृक्ष आहेत. माऊलीहून मायाळू, पित्याहून प्रेमळ आणि कौमुदीहून शीतल! गुरुकृपेविना सारे व्यर्थ आहे. श्री गुरुच प्राणमनाचा लय करतात व आत्मज्योत जागवितात. श्री. नानासाहेब चांदोरकर, शामा, डेंगळे, गणू इत्यादींना श्री बाबांच्या देहातून व्यक्त होणाऱ्या मायाळू माऊलीचा वारंवार प्रत्यय येई. भक्तांना रक्षिणारी, त्यांच्या मनोकामना पुरविणारी ही साई-माऊली नानांना वारंवार पावली आहे. नानासाहेब चांदोरकर प्रथम शिरडीस आले, त्यावेळी, म्हणजे १८९२ मध्ये ते नगरच्या कलेक्टरचे चिटणीस होते. १८९३ साली ते पुणे (घोडनदी तालुका) येथील मामलतदार होते. १८९४ ते १९०१ ही सात वर्षे ते पुन्हा नगर कलेक्टरचे चिटणीस नियुक्त झाले. त्यानंतर ते जामनेर, नंदूरबार, पंढरपूर, पुणे, ठाणे येथे अधिकाधिक उच्च पदांवर नेमले गेले. १९०८ व १९०९ मध्ये ते पुणे व ठाणे येथे डेप्युटी कलेक्टर होते. हा प्रसंग १८९८ चा आहे. नाना नगरला होते. त्या जिल्ह्यात असलेल्या हरिश्चंद्र डोंगरावर देवीचे मंदिर पहाण्यास जावयाची नानांना तीव्र इच्छा झाली. कलेक्टर ऑफिसमधील श्री. बाबा खरवंडिकर व इतर माहितगार कारकून मंडळींसह नाना भर उन्हात डोंगराची चढण चढू लागले. काही अंतर चढल्यावर नाना तहानेने कासावीस झाले. पण त्या डोंगरावर पाण्याचा थेंबही मिळण्यासारखी जागा कुठेही नव्हती.

### ''माझा नाना अगदी तहानलेला आहे!''

- वर्ष: १८९८) (हरिश्चंद्र डोंगरावरील दृश्य. नाना, खरवंडिकर व इतर

**नाना:** (चढताना) खरवंडिकर, काय हा ग्रीष्माचा दाह! त्यात ही जीवघेणी चढण! तहानेने जीव व्याकूळ झाला आहे. प्राण अगदी कंठाशी आले आहेत.

**खरवंडिकर:** सर, या हरिश्चंद्र डोंगरावर पाण्याचा एक थेंबही मिळायचा नाही. मी आपल्याला निघताना हे सांगितले होते ना! आता कळ सोसावीच लागेल. त्याशिवाय कोणताही मार्ग नाही.

**नाना:** नाही. खरवंडिकर, आता सारे उपाय हरले आहेत. माझे तर पाऊलही उचलत नाही. कंठ शोषला आहे. मला पाणी हवे आहे. काय करू? साईबाबा, दया करा! तुम्हाला सारे दिसते आहे. तुम्ही सर्वसाक्षी आहात. हे कृपाळू साईमाऊली, मला एक घोटभर पाणी द्या! मी तुम्हाला शरण आलो आहे. (एका कातळावर हताशपणे बसतात.)

(इकडे द्वारकामाईत बाबा शामा व इतर भक्तांशी बोलत आहेत.)

**बाबा:** शामा, तो पहा माझा नाना! तहानेने कासावीस झाला आहे. त्याला पाणी हवे आहे.

**शामा:** (आश्चर्याने) बाबा, येथे नाना कुठे आहेत. आपण काय बोलता आहात?

**बाबा:** शामा, माझा नाना तहानेने व्याकूळ झाला आहे. तो हरिश्चंद्र डोंगर चढता-चढता प्राण कासावीस होऊन त्या दगडावर हताश बसला आहे. शामा, तुला काही दिसत नाही, पण मी सारे पहातो आहे. नाना, घे ते पाणी! (सटका जमिनीवर आपटतात.)

(पुन्हा हरिश्चंद्र डोंगरावरचे दृश्य दिसते.)

**नाना:** बाबा, एक घोटभर पाणी द्या! पाणी! पाणी!! अरे, त्या सरपणाची मोळी घेऊन जाणाऱ्या भिल्लाला बोलवा!

**खरवंडिकर:** हे भाऊ, इकडे ये! (जवळ येतो.) या इथे, जवळ कुठे घोटभर पाणी मिळेल काय?

**भिल्ल:** दादा, ते पहा, ते साहेब बसले आहेत ना, त्या कातळाच्या खाली कपारीत पाणी आहे. (सारे कपारीचा तुकडा दूर करतात. तेथे स्वच्छ पाण्याचा साठा दिसतो.)

**नाना:** जय साईबाबा! (ओंजळी भरून पाणी पितात. इतर अनुकरण करतात.) दयाघना बाबा! तुमची करूणा अपार आहे. (डोळ्यात अश्रू आणून वंदन करतात.) खरवंडिकर, त्या भिल्लाला पैसे द्या! (पैसे देतात.)

**खरवंडिकर:** (नानांकडून पैसे घेऊन मागे वळत) भाऊ, हे पैसे साहेबांनी तुला दिले आहेत. (मागे कुणीही नसते.) सर, आश्चर्य! मोठा चमत्कारच झाला आहे. तो भिल्ल आत्ता इथे होता, परंतु आता कुठेही दिसत नाही. खरेच सर, श्री साईबाबांची ही एक लीला आहे. नाहीतर या कातळाखाली पाणी कुठून येणार! या डोंगरावरची देवी त्या मंदिरात नाही ती माता साईबाबा, आपण स्वत:च आहात.

**सर्व:** श्री बाबा, तुम्हाला लाख लाख प्रणाम. (पुढे चढण चढू लागतात.)

(काही दिवसानंतर नाना शिरडीस येतात. बाबा मशिदीत भक्तांसमवेत बसले आहेत. नाना प्रणाम करतात.)

**नाना:** सच्चिदानंद सद्गुरु श्री साईमाऊली! तुम्हाला अनंत प्रणाम.

**बाबा:** (स्मितहास्य करतात.) नाना, तू हरिश्चंद्र डोंगरावर मला हाक मारीत होतास ना! नाना, तुझे प्राण कासावीस झाले होते. तुला पाणी मिळाले ना?

**नाना:** (साश्रू नयनांनी पहात) बाबा,

आपल्यासारखी मायमाऊली या जगात असताना मला पाणी का मिळणार नाही!

**शामा :** देवा, आता मला आपल्या त्या दिवशीच्या बोलण्याचा अर्थ समजला. तहानलेल्या नानासाहेबांना आपण लीला, नाटक करून पाणी पुरविले ना!

**नाना :** होय माधवराव! माझ्या या मातेने मला त्या दिवशी जीवदान दिले. नाहीतर हा नाना पाणी.... पाणी करीत निजधामाला गेला असता.

**बाबा :** नाना, भगवंतांनी काय सांगितले आहे....

''न मे भक्त: प्रणश्यति''

**नाना, शामा :** धन्य धन्य देवा! आम्ही तुझी लेकरे आहोत.

(श्री बाबा आपल्या प्रेमवलयाखाली आलेल्या व पदोपदी आपले भावस्मरण करणाऱ्या भक्तांच्या गरजा पुरविण्यासाठी किती आतुर असत, त्याचे हे प्रात्यक्षिकच आहे. **''योगक्षेमं वहाम्यहं''** हे या साईहरिचेच चिरआश्वासन नव्हते काय! सूक्ष्मदेहाला मुक्तीकडे नेणारा हा मोक्षदानी स्थूलदेहाच्याही गरजा पुरवीत होता. या मायाळूपणाचे वर्णन **'माऊली'** या शब्दावाचून होणार नाही.)

---

श्री बाबांनी नानासाहेबांना गीतेचे व माधवरावांना भागवतभक्तीचे रहस्य उलगडून दाखविले होते. तथापि, ते स्वत:च श्रेष्ठ गुरु वा महान योगी होते. ते दत्तात्रेयस्वरूप असले तरी त्यांचा फकिराचा व मलंगाचा परिवेश आणि आविष्कार हा कर्मठ बंधने वा विधिनिषेधापासून शतयोजने दूरचा होता. तो प्रेमाचा, करूणेचा, दयेचा आविर्भाव होता. योग्य व पात्रता असलेल्या उच्च साधकावर ते तात्काळ कृपा करीत. त्यांचा स्पर्श हा आश्वासक व उद्धारक असे. ते शिष्याच्या अंतरी आपल्या शक्तीने ज्ञानोदय साधून त्याच्यामध्ये अंतर्बाह्य बदल घडवीत असत. परंतु त्यांच्या कृपेसाठी श्रद्धा व सबुरी, विश्वास व समर्पण, शरणागती आणि तितीक्षा यांची पूर्वतयारी आवश्यक असे. यांचा उपयोग दैनंदिन जीवनाच्या कठोर कसोटीस उतरण्यासाठी होत असे. एखाद्या मनस्वी क्षणी बाबा आपल्या अंतरंग भक्तास पुढील उपकथेत सांगितल्याप्रमाणे उपदेश करीत असत.

## श्रद्धेसवे तितीक्षा – मज प्यार दोन दाम

वर्ष : १८९९) (बाबा शामा, नाना, गणू, अब्दुल, म्हाळसापती इत्यादींसमवेत

**शामा :** बाबा, आपण आमचे देव आहात. तरीही आपले स्वरूप व आपल्या या अवताराचे प्रयोजन काय, ते आम्हा अज्ञानीजनांना सांगा!

**बाबा :** शामा, हे काय विचारतोस? अरे, मी आनंदस्वरूप आहे. माझे स्वरूप सच्चिदानंदाचे आहे. मला ब्रह्मानंदच समज. मला कोणतेही व्यक्तिगत कार्य साधायचे नाही. मी पूर्णकाम आहे.

**गणू :** बाबा, तुम्हाला इच्छा वा कामना नाही, हे खरे, तरीही तुम्हाला आपल्या भक्तांची तहान आहे ना!

**बाबा :** खरे आहे, गणू. मी सर्व इच्छा, वासना यांचा केव्हाच त्याग करून फकिरी पत्करली असली, तरी मी प्रेमसागर आहे. भक्तीच्या कुंजात खेळणारा मी मुकुंद आहे.

**आनंदरूप माझे – मी तृप्त पूर्णकाम**
**परि भक्तिला भुकेला – वर्ते सदा प्रकाम**
**संन्यस्त मी फकीर – नि:संग प्रेमधाम**
**कुंजात भावनेच्या – खेळे मुकुंद श्याम**

– श्री साईगीतायन

**नाना :** बाबा, आपल्या प्रेमसाम्राज्याच्या सीमा कोणत्या?

**बाबा : साम्राज्य हेच माझे – श्रद्धेत सार्वभौम**
**मी प्रेमचक्रवर्ती – सामंत दिव्य धाम**

अरे, माझे साम्राज्य साऱ्या प्रेमभक्तीच्या मुलखावर पसरलेले आहे. उत्कट प्रेम आणि सखोल भक्ती हा मानवी जीवनातील सर्वात मोलाचा ठेवा आहे. प्रेमार्त अंत:करणातील पाळण्यात श्रीरामाचा अखंड जन्म होत असतो.

**मी देह द्वारकेत – व्यापून रोमरोम**
**हृत्कंपनी विराजे – चैतन्यरूप श्याम**

**शामा :** बाबा, माझ्या देवा, मीसुद्धा तुझ्यासारखा मोहनश्याम माधव आहे, पण केवळ नामापुरता!

**बाबा :** अरे, श्याममोहन प्रभूवर आर्त भक्ती हवी, नुसते नाव घेण्याने काही होणार नाही. वियोगावाचून योग नाही, त्यागाविना भोग नाही. आर्ततेवाचून प्रेम नाही. श्रद्धेवाचून खरी शरणागती नाही.

**फल पत्र पुष्पं तोयं – मी वांछितो न हेम**
**द्या प्रेम भक्तिरूप – मज दोन दिव्य दाम**

मला दोन पैसे हवेत – श्रद्धा आणि सबुरी, प्रेम आणि तितीक्षा.

**नाना :** बाबा, तुमची भक्ताकडून हवी असलेली अपेक्षा समजली. पण आम्ही जगात कोणत्या इच्छा बाळगाव्या?

**बाबा :** नाना, तुम्हा लेकरांना संसाराचा सागर तरून मोक्षाच्या गावी जायचे आहे. यासाठी केवळ प्रेमभावनेने भागणार नाही. काळाची कसोटीसुद्धा पार करावी लागेल. संसारात पूर्वकर्मामुळे घडणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. आयुष्यात बंधनास जखडून टाकणाऱ्या धनदौलतीसारख्या विषारी साखळ्या तोडाव्या लागतील. हरीला घट्ट पकडून ठेवावे लागेल.

**नको द्रव्यधन, विषमय बंधन,**
**घ्या आनंदधना रे**
**स्वानंदाच्या कंदा वंदा,**
**हरि कारूण्य घना रे**
**त्यजा मान, अभिमान अकारण,**
**हत्या, वैर, ऋणा रे**
**घ्या शरणागती, श्रद्धा-भक्ति,**
**देह प्रावरणा रे**

– श्री साईगीतायन

काम, क्रोध, स्वार्थ, मत्सर, मद यांचा त्याग करा! श्रीहरि यमुनेच्या काठी तुरियेच्या कुंजवनात लपला आहे. यासाठी सूक्ष्मदेह शुद्ध करून कारण-देहाची यमुना श्रद्धानिष्ठेच्या नावेतून ओलांडा! भक्ताच्या भावमय हृदयात हरिची मधुर बासरी झरत असते. नामासह त्या नादाला पकडा! त्या अमर नाम व नादाच्या दोरांना पकडून मर्त्य जग पार करून अमरत्वाच्या दैवी जगात पाऊल ठेवा! मी तुम्हाला तुमच्या साधनेच्या वाटेवर सतत साथ देईन. तुमच्या

साऱ्या साधना माझ्या कृपेनेच सिद्धीला जाणार आहेत.

**गणू:** पण बाबा, आपण आपल्या गुरुची कृपा कशी प्राप्त केली?

**बाबा:** गणू, अरे, गुरु हेच हरि व हर आहेत. हरि हाच शाश्वत, सनातन गुरु म्हणून अवतरतो. माझ्या नाथ व कबीर संप्रदायात गुरु व परमेश्वर असे द्वैत मानीत नाहीत. माझ्या तरुणपणी आम्ही एका गुरुचे चार शिष्य साधन-मार्ग आचरित होतो. म्हणजे आम्ही अध्यात्ममार्गाचे चार वाटसरू होतो. श्रुति, स्मृती, पुराणे सारे धर्मग्रंथ धुंडाळीत आम्ही परमेश्वर शोधीत होतो.

**अध्यात्म पदवीचे यात्रिक होतो चार**
**शोधीत मुक्तीचे मार्ग पंथ चत्वार**

आम्ही वेदवेदांत, उपनिषदांच्या शब्दार्थांवर वितंडवाद करीत शब्दयुद्धे करीत असू. आम्ही थोरांच्या अनुभवांचे विश्लेषण करीत प्रभुदर्शनासाठी झुरत होतो. पुस्तके, ग्रंथ यातून आम्ही मोक्षाचे दार शोधीत होतो.

**जाणाऱ्या सृष्टी पलिकडला भगवंत**
**श्रुती-स्मृती पुराणे-शास्त्रे अन् वेदांत**
**मंथिली मांडिला शब्दांचा आकांत**
**ग्रंथात धुंडिले निर्वाणाचे द्वार!**

—श्री साईगीतायन

**नाना:** बाबा, आपल्या चारही दोस्तांचे स्वतःचे असे कोणते मत होते?

**बाबा:** नाना, प्रत्येकाची परमेश्वराबद्दल व त्याच्याकडे नेणाऱ्या साधनेबद्दलची वेगळीच कल्पना होती.

**मग एक वदे हा आहे दुर्गम पंथ**
**कणभरही नेदी गुरु आणखी ग्रंथ**
**या संथ साधना हवी मात्र एकांत**
**आपुल्या प्रयत्ना आपुलाच आधार!**

—श्री साईगीतायन

**शामा:** बाबा, दुसरा साधक सवंगडी काय म्हणत असे, ते सांगा.

**बाबा:** मग दुजा वदे की कथिले श्री गीतेने

**आपुले उद्धरण कर्मे अपुल्या होणे**
**मज फोलच गमती ग्रंथांतरीची वचने**
**शब्दात गुंफिला शब्दांचा विस्तार!**

—श्री साईगीतायन

त्याचे मत असे होते की केवळ मनच बंधमोक्षास कारण आहे. मनाची चंचलता ही पूर्वकर्मातूनच निर्माण होते. केवळ योगमार्गच मनाच्या लाटा शांत करून मुक्तीचा दरवाजा उघडून देतो.

**गणू:** बाबा, तिसरा शिष्य, नव्हे दोस्त काय म्हणत असे?

**बाबा: मग गर्जे तिसरा नको योग वा कर्म**

**ज्ञानातून वाहे अक्षय शाश्वत धर्म**
**रे विवेक आहे संसाराचे मर्म**
**ज्ञानाविण नाही अन्य जगी बडिवार!**

—श्री साईगीतायन

**अब्दुल व म्हाळसापती:** बाबा, आपले मत काय होते?

**बाबा:** मला ज्ञान, योग, कर्म काहीच कळत नव्हते. मला दम वा अभिमान मात्र नव्हता. गुरुरायावर उदंड श्रद्धा होती. मी दृढनिश्चयी होतो, पण मी गुरूंच्या चरणी माझ्या शंका, वैगुण्ये अर्पण केली व प्रेमश्रद्धेने लीन झालो. शरण गेलो. गुरुदेव आले. त्यांनी माझी तृषा शांत केली. मला प्रकाशात बुडविले. त्यांनी माझे चंचल मन उलटे केले. माझा देहभाव टांगला. मी अमनस्क विदेही आणि सच्चिदानंदस्वरूप झालो. गुरुच्या मांडीवर जीव शिव बनला. **"सच्चिदानंद मी उरलो विश्वाकार"**

**सर्व:** सच्चिदानंद सद्‌गुरुमहाराज की जय! (जातात.)

(कबीराप्रमाणे सहजमीलनाची थोरवी बाबा सांगत. श्रद्धा, सबुरी आणि गुरुकृपा यातूनच साक्षात्काराची वाट बाबांना मिळाली. योगाची रहस्ये त्यांनी गुरुध्यानातून प्राप्त केली. याचा अर्थ सुफी, कबीर आणि नाथपंथातील गुरुभक्ती, गुरुशरणता, गुरुचरणी अहंकार समर्पण आणि या प्रक्रियेतून गुरुकृपेद्वारे आत्मसाक्षात्कार ही बाबांची गुरुमार्गीय साधनाशैली होती. संसारी भक्तांना ते सचोटी, श्रद्धा-सबुरी, हरिप्रेम, समदृष्टी, निस्वार्थसेवा, एकेश्वर भावना शिकवीत, पण साधकांसाठी त्यांची शिकवण वरील उपकथेत भरलेली आहे. पुढे सुमारे १२ वर्षांनी, म्हणजे १९१२ साली बाबांनी गुरुभक्तांना हे अधिक विस्ताराने सांगितले. त्याचा कथाभाग १९१२ सालच्या उपकथेत सविस्तर येईलच.)

---

श्री साईबाबांचा उपदेश हा हस्तीदंती मनोऱ्यातून दिलेला तत्वज्ञानाचा पाठ नव्हता. तो वास्तव जीवनावर आधारलेला एक प्रात्यक्षिक स्वरूपाचा वस्तुपाठ असे. बाबांनी सामान्यजनांचे सामान्य जीवन पाहिले होते. ते स्वतः धुळीत वावरत होते. प्रापंचिक गृहस्थाश्रमीजनांचे समस्यांनी भरलेले जीवन ते समजून घेत असत. या उपकथेत बाबांनी नानांना केलेला उपदेश त्यांच्या ज्ञानभक्तीची अथांगता तर दाखवितोच, पण त्यांची वास्तव जीवनाला सामोरे जाण्याची भूमिकाही स्पष्ट करतो. मागील एका प्रसंगी श्री बाबांनी ज्ञान व शरणागतीचे मर्म नानांना सांगितले होते. पण नानांसारखा ज्ञानी भक्तही संसाराच्या लाटांनी झोडपला जात होता आणि शांतिसुखाच्या प्राप्तीसाठी कण्हत, उसासत होता. त्यामुळे व्याकूळ झाल्याने शंकासमाधानासाठी नाना बाबांच्या दैवी चरणापाशी आले व म्हणाले,

"बाबा, या संसारात छाया-प्रकाश, सुख-दुःखे, यशापयश यांचा लपंडाव चाललेला असतो. तरीही हा संसार असह्य आहे. आता यातून मुक्ती द्यावी व या संसारातून कायमची सुटका करावी. एका ज्ञानी, पण संसारी माणसाची ही उपरती आहे आणि तीस बाबांचे प्रत्युत्तरही आहे.

## हा प्रभो, ठरावा अखेरचा संसार!

काळ: १९०० चा सुमार) (स्थळ: द्वारकामाईत शामा, नाना, म्हाळसापती, अब्दुल इत्यादी

**नाना:** (प्रणिपात करीत) बाबा, आपण मला गीतेतील भगवंतांचा संदेश पूर्वी कथन केलात, परंतु आयुष्यात कर्तव्यकर्म पार पाडूनही माझ्या मनाला शांती आणि समाधान असे वाटलेले नाही. आता या साऱ्या सुख-दुःखाचा शेवट व्हावयास हवा, असे वाटते आहे. बाबा, आता हा माझा अखेरचा जन्म ठरो—

**"न्या दयासागरा जन्ममृत्यूच्या पार**

**हा प्रभो ठरावा अखेरचा संसार''**

–श्री साईगीतायन

**बाबा:** नाना, आज हे कसले खूळ डोक्यात घेऊन आला आहेस? कसली ही विरक्ती?

**नाना:** हे करूणामूर्ती, आता पुरे झाले, हा पसारा आता आवरा!

**ही नाती गोती भ्रमती धनाच्या भवती**
**आपुलेपणाचे उगाच जाळे विणिती**
**कुणी नसे सोबती अंती वा आकांती**
**मायाच घेतसे छायामय आकार।**

बाबा, मी शरण आलो आहे.

**बाबा:** अरे, पण असे आताच काय घडले, की तू इतका अटीतटीला आला आहेस?

**नाना:** बाबा, संसारात–

**''वासना उसळती धरून रूप आशांचे**
**वर विजयगीत परि तळी निराशा नाचे**
**जन्मातून उघडे महाद्वार मरणाचे**
**शिरपेच कधी कधी राखेचा उपहार''**

–श्री साईगीतायन

**बाबा:** अरे नाना, संसार असाच छाया-प्रकाशाचा, हार-जितीचा आहे. तो कधी कुणाला चुकविता आला आहे काय! मला फकिरालाही ही हरिची माया छळत असते बरे! मग तुझे काय!

**''रे दुस्तर आहे कर्मनदीचा पार**
**का गृहधनदारा एवढाच संसार?**

–श्री साईगीतायन

**नाना:** बाबा, एवढेच वरदान द्या की हा शेवटचा संसार ठरो! खूप सोसले, खूप अनुभवले, तेवढे पुरे.

**बाबा:** अरे, घरदार, बायकापोरे एवढीच तुझी संसाराची कल्पना दिसते. अरे, पहाणे, विचार करणे, बोलणे-चालणे, पापणी हालविणे हा सारा संसाराचा भाग आहे. हा तू कसा टाळू शकशील!

**नाना:** बाबा, ते मला काही कळत नाही. तुम्ही मला मुक्ती द्या!

**बाबा:** अरे, मनाला आवरल्यावाचून संसार संपणार नाही, मुक्तीचा दरवाजा उघडणार नाही, हे प्रथम तुला समजले पाहिजे.

**''मन चंचल धावे पिसाट विषयापाठी**
**करि रंगरूपरसस्पर्शास्तव आटाटी**
**बंधात गुंततो जीव वासनेपोटी**
**संसार सकल हा पंचेंद्रिय व्यापार!**

–श्री साईगीतायन

अरे, जंगलात एकांतात राहूनही मुक्तीचा लाभ होत नाही. संसारातच राहून प्रभूच्या प्रेमात मन, बुद्धी, इंद्रिये व जाणीव बुडविणे, हीच खरी साधना आणि विरक्ती आहे, हे मर्म समजून घे! नाना, मागे मी तुला तुझ्या-माझ्यातील देहभावाची तेल्याची भिंत पाडावयास सांगितले होते ना!

**नाना:** होय बाबा, ते मला आठवते. ही तेल्याची भिंत पाडल्यावरच तुमचा माझ्या हृदयात प्रवेश होईल, असे आपण म्हणाला होता.

**बाबा:** अरे नाना, मला तुझ्या देहभावाचे देवभावात रूपांतर झाल्यावरच तुझ्या जीवनात शिरता येईल. मग मी तुझ्या मीपणाचा ताबा घेईन. तुझ्या हृदयाच्या रथात बसून तुला या साऱ्या पसाऱ्याबाहेर नेईन. तुझा प्रपंच आणि तुझा परमार्थ या दोघांनाही मी सांभाळीन.

**नाना:** बाबा, मी मान-अपमान, स्तुति-निंदा, सुख-दुःख या सर्वांना विटलो आहे आणि तुम्हाला शरण आलो आहे. तुम्ही सरळ-सरळ सद्योमुक्तीचे कृपादान मला करणार नाही काय? मला तुमचे तत्वज्ञान समजत नाही.

**बाबा:** नाना, माझ्या लेकरा, मुक्ती ही काही देणगी नव्हे. जीवनापासून व समाजापासून दूर पळून जाऊनही मुक्ती मिळत नसते. मन, बुद्धी, इंद्रिये व जाणीव परमेश्वरात बुडविणे हीच मुक्ती. प्रपंचात व समाजात राहूनही हे साधता येते. अरे, प्रारब्धामुळेच संसार निर्माण होतो.

**''प्रारब्ध उठविते मनात वृत्ति अनंत**
**मग अहंकार दे नव्या संचिता साथ**
**निस्तब्ध रहावे तरंगात या शांत**
**लक्षावे अविचल सुखदुःखाच्या पार!''**

–श्री साईगीतायन

तू तुझ्या-माझ्यातील देहभावामुळे निर्माण झालेले अंतर माझ्याशी, म्हणजे देवभावाशी एकरूप होऊन दूर कर! मी तुला उद्धरीन. सर्व पापातून मुक्त करीन. जन्म व कर्माच्या लाटातून पैलपार नेऊन सोडीन.

**नाना:** बाबा, आपल्या या विवेचनातून मला साधक व त्याची परमेश्वरमय दशा ही थोडीफार समजली. तरीही मी तुमचा अज्ञ बालकच आहे. व्यवहारात आणि दैनंदिन जीवनात समोर येणाऱ्या प्रसंगातून कसे पार पडावे ते मला समजत नाही. पदोपदी मी चुकत, अडखळत असतो व त्यामुळे खिन्न आणि उदास होतो. बाबा, मला सांभाळा!

**बाबा:** नाना, हे तू चांगले विचारलेस. अरे, सारे जिणे, सारा प्रपंचच परमार्थ बनवावा लागतो. प्रत्येक घटना व कृती यात आपण अज्ञानाने साऱ्याचे कर्तृत्व परमेश्वराकडे न देता स्वतःकडे घेतो. यामुळेच बंधनात पडतो. अरे, जगात कोणतेही कर्म व त्याचे फळ आपल्या हाती नसतानाही हे सारे ''मी करतो'', असा वृथा अभिमान प्रत्येकाला वाटत असतो. हा कर्त्याचा भाव वा अभिमान टाळणे महाकठीण आहे. हे कर्तृत्व स्वतःकडे घेण्यामुळे कर्माच्या व त्याच्या परिणामाच्या जाळ्यात जीव अडकतो व पुनर्जन्माचे बीज पेरीत जातो. या जंजाळातून प्रथमच सुटावयास हवे, नंतर ते फार दुष्कर होते. मुक्ती मिळविण्यासाठी सूक्ष्मदेहावर अहंकारामुळे चढणारी ही कर्मपाकाची पुटे स्वच्छ करावी लागतात. अरे, हा कर्माचा खेळ साक्षीपणाने पहावा–

**''कौतुके पहावा हा लीलामय खेळ**
**भोगात विरक्ती, त्यागी तृप्तीचा मेळ**
**द्वंद्वात बुद्धिचा ढळावा न समतोल**
**प्रेमात प्रभूच्या असारही हो सार।''**

–श्री साईगीतायन

**नाना:** बाबा, हा अहंकार जिंकणे कठीणच वाटते. मी त्यासाठी काय करू?

**बाबा:** अरे, माणसाचे मन अशांत का होते? पूर्वकर्मामुळेच मन स्थिर रहात नाही. वृत्तीच्या लाटा पूर्वसंस्कारातूनच उठतात. या तरंगात शांत रहावे. त्यासाठी श्रद्धा

व सबुरी हवी. अहंकाराची, म्हणजे ''मी कर्ता'' या भावाने प्रतिक्रिया व्यक्त केल्यास नवे कर्म जन्माला येते. नव्या जन्माची भूमिका तयार होते. कर्तृत्व देवाकडे द्यावे. कर्माचे फळ अपेक्षू नये. निरपेक्ष कर्तव्ये पार पाडावी.

**''फळ नसे प्रयत्ना प्रारब्धाविण काही**
**नशिबात असे हे भोग भोगणे देही**
**ये कर्म नव्याने आसक्तीच्या गेही**
**भोगणे फळाविण कर्माचा अधिकार !''**

– श्री साईगीतायन

**नाना :** पण बाबा, कर्माचे फळ वा कर्तृत्व स्वत:कडे न घेता कर्मे करण्यासाठी सोपासा मार्ग सांगा ना!

**बाबा :** नाना, उपाय अनेक आहेत. संचित कर्माचा काही भाग माणूस प्रारब्धाच्या रूपाने भोगतो. पूर्वकर्मामुळे वृत्तींचा झपाटा मनाचा निश्चय डळमळीत करतो. मग क्रिया-प्रतिक्रियांची एक साखळी निर्माण होते. हे थांबले पाहिजे यासाठी येणाऱ्या घटना व त्यावरील कृतीरूप प्रतिक्रिया परमेश्वराला समर्पण करायच्या असतात. या कर्माचे तू माझ्या पायी समर्पण कर! मी कर्माच्या, अहंकाराच्या गाठी तोडून तुला कर्मजाळातून सोडवीन. कर्माच्या साखळीतून सुटका करण्याचा सोपा मार्ग हा ईश्वराकडे कर्तृत्व सोपविण्याचा आहे.

**नाना :** बाबा, अहंकारशून्य कर्म कसे घडते?

**बाबा :** नाना, तू फक्त मजकडे पहा आणि शांत रहा, बाकी सर्व मी पाहीन. गुरु आणि ईश्वर ही एकाच नाण्याची दोन बाजूकडील अंगे आहेत.

**नाना :** याचा अर्थ **''ध्यानमूलंगुरोर्मूर्ति:''** हा गुरुगीतेतील उपदेशासारखाच ना?

**बाबा :** होय, नाना. ध्यान गुरुच्या रूपाचे करावे. कीटकाने भ्रमराचे ध्यान करून भ्रमरच व्हावे, तसे उत्कट ध्यान करावे. तुम्ही गुरुच्या मुखाचे ध्यान करून स्वत:च गुरुस्वरूप व्हा! विषयसेवन करतानाही ते अलिप्तपणे, विरक्तपणे करा! विषयसुखाचा त्याग करतानाही तो तृप्तीने करा! आसक्तीचा लवलेशही उरता कामा नये. यामुळे तुला शांतीचा लाभ होईल. अशी शांतीच मोक्षाचा मार्ग दाखवील.

**''या विश्वनाटकी रंगावे अंगांग**
**परि अंतर्यामी नसो कुणाचा संग**
**अंतरी फुलावे आर्त भक्तीचे रंग**
**मुखवटा मुखावर, हृदयी अमृतधार''**

– श्री साईगीतायन

**नाना :** बाबा, दररोजच्या जीवनात कोणती खबरदारी घ्यावी, ते सांगा!

**बाबा :** जीवनात नेकीने वागावे. आपले वर्तन अत्यंत चोख व प्रामाणिक हवे. भुकेलेल्यांना घास द्यावा. गरजूला यथाशक्ती मदत करावी. तुम्ही दुसऱ्याला दु:ख दिलेत, तर त्याची व्यथा माझ्या अंत:करणास होते. मी वैर, ऋण व हिंसा यांच्या पूर्ण विरुद्ध आहे. दुष्टांना दूर ठेवा! सत्ता गाजवतानाही नम्रता हवी, सूज्ञपणा हवा. ध्येयवादी बनताना व्यवहाराचे भान ठेवणे जरूर आहे.

**''स्वार्थासही व्हावा परसेवा संस्कार**
**आचारच व्हावा एक उदात्त विचार''**

– श्री साईगीतायन

जीवनाच्या नाटकात दिलेली भूमिका करावी, पण आतून आपण प्रभूचे आहोत व प्रभूने नियुक्त केलेले कर्तव्य पार पाडीत आहोत, अशी निरहंकारी वृत्ती ठेवावी. अनन्यभक्ती, समर्पण, मानवसेवा यामुळेच सारा संसार मोक्षरूप होतो.

**''हा विवेक होतो साधन मोक्षपदाचे**
**मग जिणेच होते पंथराज मुक्तीचे!''**

– श्री साईगीतायन

**नाना :** बाबा, समजलो. मी धन्य झालो! सच्चिदानंद सद्‌गुरू श्री साई की जय!

**बाबा :** नाना, दुसऱ्याची सेवा ही स्वार्थत्याग शिकवते. समाज व मानवजात यांच्या सेवेने देह, मन व बुद्धी शुद्ध होते. जाणीव ईश्वरी बनते. हे समजून घे व मनाची तगमग शांत करून घे!

(श्री बाबांनी प्रत्येक कृती ही मनाच्या व देहाच्या शुद्धीसाठी वापरून सारा संसारच परमेश्वरमय करावयास शिकविले. त्यामुळे जीवनातील घटना व प्रसंग हे मुक्तीचे सोपान ठरतात. सारा संसारच मोक्षाकार होतो. बाबांनी शामाला अनन्यभक्ती, गणूंना नामसंकीर्तन, तर नानांना गीतेची ज्ञानभक्ती शिकविली. संसारी उच्च साधकांना जी साधना करायची आहे, ती साऱ्या संसाराचे रूपरंग बदलून त्याला मोक्षाकार बनविण्याची आहे. बाबांच्या शिकवणुकीचे विवेचन मी निरनिराळ्या प्रसंगातून विखरून मांडणार आहे. त्यामुळे वाचकांच्या मनावर त्याचा पक्का व नेमका ठसा उमटेल. बाबा हे केवळ चमत्कारी नव्हते, तर ते गीता, भागवत सांगणारे प्रत्यक्ष श्रीहरि भगवंतच होते.)

---

श्री. गणपतराव सहस्त्रबुद्धे तथा दासगणू हे पुढे संतकवी म्हणून ख्यातनाम झाले. तरी प्रारंभी त्यांचा ओढा शृंगारिक तमाशा व लावण्या यांच्याकडे होता. त्यांचा खाक्या पोलीस खात्याचा रांगडा व संशयी होता. दासगणूंचे आगमन चांदोरकरांच्या १८९२ मधील पदार्पणानंतर, म्हणजे १८९५च्या सुमारास झाले. ते चांदोरकरांचे पोलीस संरक्षक म्हणून बाबांच्या सान्निध्यात आले. दासगणूंच्या व्यक्तित्वाचे संकीर्तन भक्तीचा प्रसार करणाऱ्या कीर्तनकार संतकवीत करण्याची अवघड किमया श्री बाबांनी आपल्या लाघवी शब्दांनी आणि उद्धारक स्पर्शाने केली. यापूर्वीच्या उपकथांत मी १८९५ पासून १९०० पर्यंतचा कथाभाग आणला आहे. **''वाहते चरणातून गंगा''**, **''तू देवता दयेची''** आणि **''मज प्यारे दोन दाम''** या उपकथा वाचकांनी पुन्हा वाचाव्यात. त्यात गणूंच्या व्यक्तित्वाचा बदलता मोहरा विविध अंगांनी वर्णिला आहे. गणूंच्या नोकरी-व्यवसायात श्री बाबांनी वेगळे अनुभव देऊन गणूंना नोकरीतील दारूण संकटातून वाचविले. श्री साईभक्तांना गणूंची पोलीस ठाण्याजवळच झालेल्या चोरीमुळे झालेली अनावस्था, तसेच काणा भिल्लाने त्यांचा उडविलेला थरकाप इत्यादी गोष्टी ऐकावयास मिळाल्या असतीलच. बाबांनी गणूंच्या मनात सरकारी नोकरीतील दास्याबद्दल घृणा व तिरस्कार निर्माण करणारे प्रसंग आणविले व त्यातून त्यांना कृपेने वाचविलेही. संत हे परमेश्वराच्या प्रतिमा! त्यांच्या चरित्रकथा लिहिणे व आख्याने कीर्तनाद्वारे रंगविणे ही कार्ये त्यांनी गणूद्वारे साधली. १९०३ साली नोकरीचा त्याग करून **'संतकथामृत'** या मालिकेचे लेखन करण्यापूर्वीचा हा १९०१चा प्रसंग

पहा....

## संतत तूं प्रेमभरे संतचरित गावे!

काळ: १९०१ चा सुमार) (स्थळ: गोदावरी तटाजवळचे एक अरण्य

**बाबा:** (दासगणूंच्या वाटेवर शून्यातून प्रगट होतात.) गणू, तू या अवघड जंगलाच्या वाटेने का चालला आहेस? तुला माझ्या नजरेला चुकवून शिरडीचा प्रदेश ओलांडून जाता येईल, असा भ्रम झालेला आहे काय?

**गणू:** तसे नव्हे बाबा. मी जरा घाईगडबडीने चाललो आहे. शिरडीला नंतर येणार होतो.

**बाबा:** गणू, तुला खरे बोलायचे नाहीच ना? माझ्या साक्षी डोळ्यांना तू आपले अंतरीचे हेतू दिसू देणार नाहीस, असे का तुला वाटते? तू मला मुद्दाम चुकवीत होतास. कारण तू नोकरी सोडावी, असा मी आग्रह करीत असतो.

**गणू:** बाबा, मला लवकरच पोलीस सब-इन्स्पेक्टरची जागा मिळणार आहे. मी खात्याची परीक्षाही दिली आहे. बढती मिळून थोडा काळ गेला की मी नोकरीचा राजीनामा देणारच आहे.

**बाबा:** गणू, हा तुझा धन व मानाचा लोभ आहे. आता जी नोकरी तू टिकवून आहेस, ती माझ्या मदतीवाचून टिकून राहिली आहे काय?

**गणू:** बाबा, नोकरीतील संकटातून तुम्ही मला अनेकवार सांभाळले आहे, हे मी विसरू शकत नाही. पोलीस ठाण्याजवळची चोरी आणि त्या भयंकर काणा भिल्लाचा यमपाश यातून तुम्हीच माझे रक्षण केले. त्यावेळी मी शतश: आपल्या चरणापाशी भीक मागितली होती.

**बाबा:** गणू, तूं माझी करूणा भाकताना कोणते अभिवाचन दिले होतेस?

**गणू:** बाबा, मी आपल्या सहाय्याची आणि दयेची भिक्षा प्रार्थिली होती.

**बाबा:** गणू, तू तो प्रसंग पार विसरलास. तू गोदावरीच्या तीर्थाची ओंजळ घेऊन नोकरीची तिलांजली दिली होतीस. पोलीस खात्याच्या रोषातून मी तुला मुक्त केले, तर तू त्वरित नोकरीचा राजीनामा देणार होतास.

**गणू:** बाबा, क्षमा करा! मी वचनाची पूर्ती अद्याप केलेली नाही.

**बाबा:** तू प्रेममय प्रभूला दिलेले वचन मोडलेस, त्याचे गंभीर परिणाम तुला भोगावे लागतील. मला तुझा हुद्दा काढून घ्यायचा नाही. मला तुझा आध्यात्मिक दर्जा उंचावयाचा आहे. तुझे हरिसंकीर्तन ऐकणाऱ्याचा तू उद्धार करू शकशील, अशी अवस्था मी तुला देणार आहे. अरे दुसऱ्यांचे बूट पुसण्यासाठी तुझा जन्म नाही. तुझे जीवनध्येय उच्च आहे. तुला विश्वाच्या स्वामींची चाकरी करायची आहे, दासांच्या दासांची नव्हे!

**गणू:** बाबा, दासांचा दास याचा अर्थ काय?

**बाबा:** अरे, तुझे वरिष्ठ हेसुद्धा कुणाचे तरी चाकर आहेत. अल्ला मालिक है! साधुसंत त्याचे दूत आहेत. तू संतांचा व परमेश्वराचा महिमा गायचा आहे.

**दासांचा तूं न दास**<br>
**मालिक करि हृदयी वास**<br>
**सोन्याच्या पिंजऱ्यात बद्ध तूं न व्हावे!**<br>
**नित हरीच्या धरि छंदा**<br>
**प्रभुचरणी हो बंदा**<br>
**पौर्णिमेत भक्तीच्या नित्य तू नहावे!**<br>
**नामसुधारस प्यावा**<br>
**हरि गावा, हरि ध्यावा**<br>
**मंथुनिया हा प्रपंच, प्रेमामृत प्यावे!**

–श्री साईगीतायन

**गणू:** बाबा, मी संतांचा व श्रीहरिचा महिमा गाण्यास योग्य आहे काय?

**बाबा:** गणू, तो हरि सर्वांचा आहे. त्याची थोरवी कुणीही गावी.

**तो फकीर करूणामय**<br>
**त्याविण नच अन्य ठाय**<br>
**क्षण न विसंबे स्वामी भजती जे स्वभावे**

–श्री साईगीतायन

**गणू:** बाबा, संकीर्तन भक्ती मला मुक्ती मिळवून देईल काय?

**बाबा:** **संतरूप प्रभु प्रतिमा**<br>
**गा त्यांचा नित महिमा**<br>
**तेजाच्या आरतीस सूर उंचवावे!**

–श्री साईगीतायन

अरे, आपल्या मुखातून अमृतरस वाहू दे! अष्टभाव रोमांचून तू महिमा गावा.

**गणू:** बाबा, संताचा व हरिचा महिमा मी गाण्यासाठी नोकरीचा त्याग करीन.

(बाबांनी गणूंना नोकरीतील दास्यातून १९०३ पर्यंत मुक्त केले. याचवर्षी दासगणूंनी संतकथामृताची रचना केली. तथापि, १९०१ ते १९०३ पर्यंत दोन वर्षे गणू नोकरीच्या प्रलोभनाच्या बंधातून स्वत:ची मुक्तता करण्याच्या विचारात हेलकावे खात होते. अशा मनाच्या दोलायमान अवस्थेतून बाबांनी दासगणूंना वारंवार स्पष्ट मार्गदर्शन करून त्यांना संतसेवेकडे वळविले. असा जीवन-परिवर्तनाचा अलौकिक चमत्कार अन्यत्र कोठे सापडणे दुरापास्त आहे. यासाठी वाचकांनी या उपकथेचे मर्म आपल्या हृदयात कायमचे व सखोल बिंबवावे, ही प्रार्थना.)

---

मागील एक-दोन उपकथांत नानासाहेब चांदोरकरांच्या शिरडी येथील १८९२ नंतरच्या काही घटना आणि बाबांचे अचूक मार्गदर्शन चित्रित केले. बाबांच्या भक्तप्रेमासाठी धाव घेण्याच्या भक्तवत्सलतेचा एक प्रसंगही वर्णिला. नाना जामनेर येथे मामलतदार असताना त्यांची कन्या मैनाताई बाळंतपणासाठी माहेरी आली होती. १९०२ किंवा १९०४ च्या सुमारास हा प्रसंग घडला. मैनाताई प्रसूति-वेदनांनी व्याकूळ झाल्या होत्या. नवचंडी, हवन इत्यादी उपासनात्मक उपायही झाले होते. शेवटी नानांनी त्या करूणामूर्ती बाबांना साकडे घातले.

## निर्वाणीचा सखा साईनाथ!

स्थळ: द्वारकामाई) (वर्ष: १९०२ ते १९०४ चा सुमार

**बाबा:** शामा, तो बापूगीर कुठे आहे?

**शामा:** देवा, तू त्या रामगीरबुवांना हाक मारीत आहेस ना? ते पहा, खानदेशात आपल्या गावी जायच्या तयारीने येत आहेत.

**रामगीरबुवा:** काय आज्ञा आहे, बाबा!

**बाबा:** बापूगीर, तू आपल्या गावी जात

आहेस, पण वाटेत थोडी नानाच्या घरी विश्रांती घे! त्यांचा समाचार घे! आणि मगच गावी निघ! शामा, ती माधव अडकराने लिहिलेली आरती एका कागदावर लिही व सोबत माझी विभूतीही दे!

**शामा:** होय बाबा, मी ती प्रासादिक आरती कागदावर लिहून भक्तांना देतो. हा आरतीचा कागद. यातच विभूती घालून देतो. (देतात.) पण बाबा, आजच खास नानांची याद का काढलीत बरे?

**बाबा:** नानाने माझी आठवण केली आहे. बेटी मैना माझ्या प्रसादासाठी तळमळत आहे.

**रामगीरबुवा:** बाबा, मजकडे फक्त दोन रुपये आहेत. एवढ्यात मी जामनेरपर्यंत पोहोचेन का? जळगावपर्यंतच तिकिटास एक रुपया चौदा आणे पडतात.

**बाबा:** तू त्याची चिंता करू नकोस. सारी व्यवस्था होईल. अल्ला मालिक है! (बापूगीर प्रवासास निघतात.) अरे शामा, बेटी मैना प्रसूती-वेदनांनी तळमळते आहे. मला बापूगीराच्या हाती विभूती पोहोचविली पाहिजे. तू जा! मी आता अल्लामियासच त्यांच्या मदतीस पाठवितो. सब-कुछ अल्लाही अल्ला है! (बाबा ध्यानस्थ बसतात. इतर जातात.)

(दृश्य बदलते. दुसऱ्या दिवशी सकाळी जामनेरात नानांच्या घरी)

**नाना:** हे भावभुकेल्या साईराया, हे शिरडीश्वरा, हे अनाथांच्या नाथा, माझी मैना वेदनांनी विव्हळते आहे. धावा! तुमचा प्रसाद पाठवा!

**रामगीरबुवा:** (प्रवेश करून) नानासाहेब, तुमचा प्रसाद घेऊनच श्री साईदेवाकडून आलो आहे. ही घ्या बाबांची आरती आणि प्रसाद! (पुडी देतात.)

**नाना:** (पत्नीस) हा बाबांचा प्रसाद, ही उदी मैनाला द्या! मी आरती म्हणतो. (पत्नी आत जाते.) (नाना निरांजन लावून बाबांच्या छबीपुढे आरती म्हणतात....)

**''आरती साईबाबा, सौख्यादातार जीवा**
**चरणरजतळी, द्यावा भक्ता विसावा,**
**दासा विसावा, आरती साईबाबा''**

बाबा, मैनाला सौख्य द्या! तिच्या वेदना थांबवा! बाळ-बाळंतीण यांची सुखरूप सुटका करा! (आरती पुरी म्हणतात.)

**रामगीरबुवा:** माधव अडकरांची ही आरती साक्षात् अमृतवल्ली आहे. ज्ञानदेवांच्या **'आरती ज्ञानराजा'** या आरतीच्या स्वरातच त्यांनी बाबांची करूणा भाकली आहे. जय साई! (नानांच्या पत्नी आनंदी चेहऱ्याने प्रवेशतात.)

**बाईसाहेब:** साहेब, मैना प्रसूत झाली. बाळ-बाळंतीण हाती-पायी सुटली आहे. बाबांचे महान उपकार झाले. आपण त्यांना शरण जाऊ या!

**नाना:** (आनंदातिशयाने) सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय! बाबा, या दासासाठी किती कष्ट घेतलेत. हे मायमाऊली, तुझ्या प्रेमाला सीमा नाही. पण रामगीरबुवा, तुम्ही अचानक कसे आला?

**रामगीरबुवा:** नाना, जळगाव स्टेशनवर आपणच नाही का त्या रजपूत गढवाल टांगेवाल्याला मला आणण्यासाठी धाडलेत.

**नाना:** काय, मी टांगा धाडला? नाही, रामगीरबुवा मला तुमच्या येण्याची कोणतीही वर्दी नव्हती. मग मी टांगा कसा बरे धाडीन?

**रामगीरबुवा:** नानासाहेब, त्याच रजपूत क्षत्रिय टांगेवाल्याने जळगाव स्टेशनबाहेर ''शिरडीचा बापूगीर कोण आहे?'' असे विचारून मला टांग्यात बसविले व सकाळपर्यंत आपल्या कचेरीच्या दारात सोडले. तेथून तो गुप्त झाला.

**नाना:** बापूगीरजी, हे सारे त्या नटनाटकी बाबांचे प्रेमनाट्य! भक्ताच्या भावासाठी बाबा कधी, कोणती आणि किती रूपे घेतील, ते एक त्यांनाच ठाऊक. धन्य बाबा आपली! **''जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव''** तुम्ही दाखविता!

**रामगीरबुवा:** काय अद्‌भुत लीला बरे ही! कुणाचा विश्वास बसणार नाही, तरीही सत्य. **''कलियुगी अवतार। सगुण ब्रह्म साचार।''** असे आमचे बाबा.

**नाना:** बापूगीरजी, आपण आता दोन दिवस विश्रांती घ्या आणि मगच आपल्या गावी जा! बाबांचे दूत म्हणून आपण आम्हाला साक्षात् बाबाच आहात! तुम्हाला शतश: प्रणाम!

(श्री बाबांची ही १९०२ ते १९०४ सालची दिव्य लीला संतचरित्रात अत्यंत असामान्य ठरेल. तीव्र भावाविष्काराला प्रतिसाद म्हणून बाबा स्वत: टांगा, अश्व, टांगेवाला अशा अनेकविध रूपांनी खानदेशात प्रगट झाले व नानांच्या संकटात त्यांनी मैनेला मदतीचा हात दिला. संतांच्या कृपेला कोणतेही स्थळ, काळ वा माध्यम आवश्यक नसते, याचा हा साक्षात् अनुभव होय! धन्य तो संतमहात्मा व धन्य ते सद्‌भक्तराज!)

---

यापूर्वी १९०१ सालच्या उपकथेत मी दासगणू यांनी पोलीस खाते सोडून संतांची चाकरी करण्याचे बाबांना अभिवचन दिल्याचे चित्रित केले होते. दासगणू यांच्यावर कोसळलेल्या संकट-प्रसंगातून त्यांना सोडवीत बाबांनी त्यांना सरकारी नोकरीच्या व बढतीच्या मोहापासून मुक्त केले. दासगणू यांनी पोलिसातील सेवेचा १९०३ मध्ये त्याग केला व ठिकठिकाणी वसत असलेल्या व समाधिस्त झालेल्या छोट्या-मोठ्या संतमहात्म्यांच्या चरित्रकथा आपल्या सुबोध, रसाळ व आख्यानपर शैलीत मांडण्यास सुरुवात केली. त्यांचे पहिले लेखन 'संतकथामृत'द्वारे प्रगट झाले. संतांची चरित्रे गाऊन भाविकांना प्रीतिभोजन घालण्याची बाबांची आज्ञा अशाप्रकारे साकार झाली. पुढील काळात 'अर्वाचीन भक्तलीलामृत', 'भक्तसारामृत', तसेच 'उपनिषदावरील भाष्य' इत्यादी मौलिक लेखन गणूंनी केले. या १९०३च्या संधिकाळात दासगणूंनी बाबांच्या चरित्र-कथांचे संकीर्तन करण्याची संकीर्तन भक्ती महाराष्ट्राच्या गावोगावी प्रसारित केली. एकदा दासगणू हे बाबांचे गुण-संकीर्तन करण्यास निघाले होते. भरजरी फेंटा, रेशमी अंगरखा, उपरणे, गळ्यात फुलमाळा यासह कीर्तनासाठी निघालेल्या दासगणूंना पाहून बाबांनी त्यांना उपदेश केला.

## नारदीय कीर्तनाची सोज्वळ परंपरा

काळ: १९०३) (स्थळ: द्वारकामाई मशिदीत बाबा इतर भक्तांसह

**गणू:** बाबा, मी आपली आज्ञा घ्यावयास आलो आहे. मला आशीर्वाद द्या!

**बाबा:** गणू, तू आज एखाद्या नवरदेवासारखा नटून-सजून चाललास तरी कुठे?

**शामा:** बाबा, आमच्या गणूदासांची काय थट्टा चालविली आहात? ते तर आपल्याच गुणाचे संकीर्तन करण्यास नेवाशास मोहनीराजाच्या मंदिरात चालले आहेत.

**गणू:** बाबा, मी आपल्याच गुणांचे गायन करण्यासाठी निघालो आहे. आपणच मला नोकरीच्या पिंजऱ्यातून सोडविलेत व संतांच्या सेवेला लावलेत. मी आपल्या कृपेने 'संतकथामृत', 'अर्वाचीन भक्तलीलामृत' यांची रचना करणार आहे. भक्तसारामृतात तर आपल्या चरित्राचे अध्यायच समाविष्ट करण्याचा माझा संकल्प आहे. आपले गुणसंकीर्तन, हेच माझे जीवित ध्येय आहे.

**बाबा:** अरे, माझ्या गुणगायनाला वा चरित्र-आख्यानाला हा साजशृंगार नको. काढ ता फेटा, ते उपरणे आणि अंगरखा! यांचा भार मला सोसवत नाही. अगदी उघड्या अंगाने बाहेर पड! मला बाह्य आभरणे लागत नाहीत. आम्हा वैष्णवाची गादी ही मूळ नारदाचे पीठ आहे. मला नारदीय कीर्तन-पद्धतीचा साधेपणाच पसंत आहे.

**गणू:** पण मग बाबा, मी काय उघड्या अंगाने एकतारीवर भजन म्हणू?

(फेटा, अंगरखा, उपरणे काढून) आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. आजपासून मी उघड्याने हाती वीणा घेईन व वैष्णवाची गादी चालवीन.

**बाबा:** तथास्तु, गणू! ''अल्ला कल्याणच करील.'' तू कीर्तन कर! मी तुझ्या मागे-पुढे उभा राहीन. **''मज जो गाई वाडेकोडे। माझे चरित्र माझे पवाडे। तयाच्या मी मागे-पुढे। चोहीकडे उभाचि।''**

**गणू:** बाबा, आपणच पूर्वी म्हटले आहे की **''मद्भक्ता: यत्र गायंति। तत्र तिष्ठामि नारद.''** मी आपला आहे. आपणच मला प्रेरणा द्या! माझी रसवंती फुलवा! श्रोत्यांना नादब्रह्मात गुंग करा! आपणच मला तमासगीराचा भक्त भागवत बनविलेत.

(दासगणूंनी कीर्तनाच्या रंगात महाराष्ट्रातील भक्त-भाविकांना रंगवून साईभक्तीत स्थिर केले. त्यांनी १९०३ मध्ये **'संतकथामृत'** रचले. त्यानंतर लवकरच **'अर्वाचीन भक्तलीलामृत'**ही जगाला दिले. **'भक्तसारामृत'**मध्ये, तसेच **'साईनाथस्तवन मंजिरी'**त बाबांचे चरित्र व तत्त्वज्ञान रंगविले. गणू साईभक्तीचे भार बनले. गणूंच्या **''साई रहम नजर करना''**, **''रहम नजर करो, अब मोरे साई''**, **''अगाध शक्ति, अघटित लीला''** यासारखी अत्यंत सुंदर व भावार्त पदे महाराष्ट्राच्या व भारताच्या भक्तिवाङ्मयात आज अजरामर झाली आहेत.)

---

नानासाहेब डेंगळे, अब्दुल, चांदोरकर, दासगणू यांच्या आगमनाबद्दल येथवर मी विवेचन केले. हा काळ १८८० ते १९०४ पर्यंतचा दोन तपांचा अंधारातून प्रकाशाकडे नेणारा हा बाबांच्या दिव्य जीवनातील लौकिक प्रसिद्धीचा उष:काल होता. यानंतर बाबांच्या निर्वाणापर्यंतच्या १४ वर्षांच्या प्रकाशझोताच्या काळात एक एक अधिकारी सुशिक्षित आणि लौकिक व्यवहारात मान्यता पावलेली व्यक्ती बाबांच्या दैवी प्रभावलयात येऊ लागली. एक स्थूल यादी करावयाची झाल्यास १९०४ मध्ये साठे, १९०५ मध्ये राधाकृष्णाआई, १९०६ मध्ये जोग, नाचणे, १९०७ मध्ये धुमाळ, १९०८ मध्ये कुशाभाऊ, सगुणोपासनाकार भीष्म, दीक्षित, १९०९ मध्ये हाटे, दाभोलकर, १९१० मध्ये तर्खड, नूलकर, खापर्डे, १९११ मध्ये उपासनी महाराज, १९१२ मध्ये पुरंदरे, १९१३ मध्ये नारके असे असंख्य सुशिक्षित व विचारवंत भक्त शिरडीच्या क्षितिजावर दाखल झाले. बाबांच्या संतजीवनातील ही सोनेरी प्रभात होती. या काळात जे बाबांच्या समोर वावरले, हा जिता-जागता परमेश्वर ज्यांनी चर्मचक्षूंनी पाहिला, त्यासारखे धन्य पुरुष या जगात नसतील. या भाग्यवंताचा साईभक्तांना सदैव हेवा वाटावा, एवढे हे नशिबवान होते, हे सत्य आहे. (वर दिलेली वर्षे ही साधारणपणे बरोबर असली तरी त्यात एखाद-दुसऱ्या सालाचा फरक पडू शकतो.) या उपकथेत आपल्याला रावबहादूर साठे व मेघा यांचे पुण्यदर्शन घ्यावयाचे आहे.

## कैलास (शीर्ष) नायक शिवशंकर

वर्ष: १९०४-०५ (स्थळ: द्वारकामाईत नंतर) (अदमासे) साईसमवेत मेघा, शामा, साठे व केळकर

**बाबा:** अरे मेघ:शामा, माझ्यावर अभिषेक करण्याचा अट्टाहास धरू नकोस.

**मेघा:** बाबा, तुम्हाला मी मुसलमान मानून तुमच्यापाशी यावयास तयार नव्हतो. तेव्हा तुम्ही माझे मन ओळखून म्हणाला, ''अरे, मुसलमानाकडे कशाला आलास? चल हट्, चालता हो! साठेसाहेब, अशा हरामखोरांना का पाठवतो?''

**साठे:** बाबा, हा शिवभक्त होता, ''ॐ नम: शिवाय'' हा पवित्र मंत्र जपत होता. म्हणून याला आपली पूजा करण्यासाठी मी पाठविले होते. दादा केळकरांकडे शिफारस केली होती. आपण प्रथम मेघाचा अव्हेर केला. मग स्वीकार केला.

**बाबा:** माझा मेघ:श्याम भोळा व एकनिष्ठ भक्त आहे.

**मेघा:** बाबा, आपण शिवहर आहात, याचा मला साक्षात्कार झाला व तेव्हापासून मी अन्य देव जाणत नाही. तुम्हीच शिवहर, सांबसदाशिव.

**बाबा:** मेघा, तुला माझी पूजा करण्यासाठी साठेसाहेबांनी पाठविले. पण तू प्रथम शिरडीतल्या सर्व देवतांची पूजा करून माझी पूजा कर, अशी शिस्त मी तुला लावली. शिव तुझ्या-माझ्यात, सर्व देवतांत भरून दशांगुळे वर उरला आहे.

**बाबा:** अरे गणू, खोटी निष्ठा दाखवू नकोस. खरी श्रद्धा मला समजते. तुझी श्रद्धा व भक्ती अधिक सखोल व्हावयास हवी. केवळ वरवरची नको.

**शामा:** देवा, विचार करणारे आणि चिकित्सक मन श्रद्धेची खोली गाठत नसते.

**बाबा:** या म्हाळसापतीकडे, या अब्दुल्लाकडे आणि या खेडवळ भक्ताकडे पहा! ते विद्वान पंडित नसतील, पण त्यांच्याकडून खऱ्या श्रद्धेचे धडे तुम्ही घ्यावे. शामा, तुझी श्रद्धासुद्धा अशी डळमळीतच आहे. पण तू माझ्यावर सख्यभक्ती जरूर करतो आहेस. तू व गणू या दोघांनी आपली चंचल विचारधारा आवरली पाहिजे आणि हृदयगुहेच्या आतील गाभाऱ्यात गुरूमूर्तीवर

स्थिरावले पाहिजे.

**गणू:** बाबा, आम्ही या शब्दमय आणि शाब्दिक व्यवहारातून बाहेर कसे पडू शकू, ते सांगा.

**बाबा:** गणू, उथळ श्रद्धा परमेश्वरापर्यंत वा गुरुपर्यंत पोहचू शकत नाही.

**गणू:** बाबा, आता मी आपले चरणतीर्थ नित्य प्राशन करीन.

**बाबा:** अरे गणू, मी तुला चरणतीर्थ प्यावयास सांगितलेले नाही. गुरुवर आणि भगवंतावर तीव्र, उत्कट प्रेम करणे म्हणजेच गुरुचरणतीर्थ सेवन आहे. परमेश्वराला प्रेम व उत्कट भाव हा सर्वात अधिक पसंत पडतो. एका सीध्यासाध्या मनातील तीव्र सद्‌भाव व प्रेम हे एखाद्या विद्वान पंडिताच्या शब्दवैभवाहून प्रभूंना अधिक आवडते. या मेघा, म्हाळसा, अब्दुल्लाचे प्रेम पहा! भक्तीचे उदाहरण त्यांच्यातून तू घे! त्यांचा भाव उचललास, तर अल्ला तुझे कल्याण करील. प्रभूवर प्रेम कर! देवावर आसक्ती धर! संसारात निर्लेपपणे वावर!

**नाना:** बाबा, तुम्ही आम्हाला वारंवार उपदेश करून जगाकडे पहावयाची योग्य अशी समदृष्टी दिलीत. तुम्ही आता फक्त उत्कट प्रेम व सखोल भक्ती द्या!

**केळकर:** बाबा, सत्तेचा मद आणि ज्ञानाचा अहंकार आमच्यापासून योजने दूर राहो! दम, गर्व आणि मोह, लोभ यांचा वारा आम्हाला न लागो!

**गणू:** बाबा, माझी रसवंती खऱ्या भक्तीच्या मधुरतम भावाने बहरून येवो! मी तुमचा महिमा अगदी निरभिमान होऊन गाईन. भगवंताचे प्रेम मला संसारातील अलिप्त भूमिकेत स्थिर करो!

**"शांत चित्ता, महाप्रज्ञा, साईनाथा, दयाघना"** अशी श्री साईस्तवनमंजिरी माझ्या लेखणीतून उतरू द्या! मी गणू तुमच्या मशिदीतला एक हलालखोर आहे. माझ्यावर दया करा! तुमचे प्रेम मला मुक्तीची वाट दाखवो!

**"साई रहम नजर करना, बच्चों का पालन करना"**

हे जग खोटे, मायावी आहे, हे मला समजले आहे. मला दैवी प्रकाश दाखवा! मी अंध आहे.

**"रहम नजर करो, अब मोरे साई"**

बाबा, दया करा! मी उभा जन्म वाया घालविला, तरीही मला निर्वाणीचा सखा भेटलेला नाही. तो आता तुमच्या रूपाने पुढे उभा आहे. मी तुमच्या चरणाचा बंदा आहे. मी तुम्हाला शरण आलो आहे. मी काय बोलू? माझी वाचा मुकी झाली आहे. तुमच्या तेजाने ती दिङ्मूढ झाली आहे.

**बाबा:** गणू, या कवनाने तू माझ्या काळजालाच हात घातलास. तुझे कल्याण अल्ला करील!

**गणू:** बाबा, मी आपल्या कथाकीर्तनप्रसंगी अलंकारिक भाषा वापरतो. आपल्या चरित्रातील घटना व भक्तांचे अनुभवप्रसंग नाट्यमयरीतीने मांडतो. तेव्हा ही कृत्रिम भाषा आवश्यक असते. नाहीतर या बहिर्मुख समाजाला अंतर्मुख कसे करता येईल! भाविकांची हृदये भावबंधात बांधण्यासाठी प्रथम त्यांना, त्यांच्या बुद्धीला मला शब्दबंधाने स्तिमित करायचे असते. त्यामुळेच त्यांचे लक्ष या शिरडीच्या क्षितिजाकडे वळू शकेल, असे मला वेड्याला वाटत असते.

या माझ्या दिखाऊ शब्दांना क्षमा करा! मी आपल्या आदेशाप्रमाणे कीर्तनाच्या वेळचा दिखाऊ जामानिमा आणि पोषाख त्यागिला आहे. उघड्याने, अनवाणीपणे हरिकीर्तन करतो. तसाच मी साध्या, सोप्या, अनलंकृत भाषेत तुम्हाला आळवीन आणि यापुढे शुद्ध प्रेमाची गाणी गुंफीन.

**बाबा:** अल्ला भला करेगा! (सर्व जातात.)

(वर वर्णिलेली साईजीवनकथा सर्व कवी आणि लेखकांना एक पृथ्वीमोलाचा संदेश देत आहे. साईभक्त लेखक आपण बाबांचे चरित्र व संदेश आपण प्रसारित करीत आहोत, असा अभिमान बाळगत असतात. मीही असाच एक लेखक! खरे तर बाबांना कृत्रिम प्रसिद्धीची इच्छा नसते. बाबांचे दैवी तत्व आणि महिमा यांची प्रभा स्वयंसिद्ध आहे. कारण बाबा स्वयंज्योती आहेत. बाबांचा जन्म १८३५ चा व लौकिक प्रसिद्धीचा प्रभातकाळ १९०५ नंतरचा, म्हणजे सुमारे ७० वर्षानंतरचा. त्यांची इच्छा असती तर ते एका तपात प्रसिद्धीच्या शिखरावर झळकले असते. पण संतांना पुष्कळदा अज्ञातवास प्रिय असतो. वर्षे ही त्यांच्या दृष्टीने निरर्थक आहेत. युगे व मन्वंतरे यांचेसुद्धा त्यांना बंधन नसते. एका क्षणात त्यांना अनेक युगांचे, जन्मांचे ज्ञान होते. दिशा व काळ हे दिक्कालातीत, संतांपुढे केवळ क:पदार्थ! एखाद्या अडाण्याचे बोबडे, तोतरे बोलही संतांना मोलाचे वाटतात. कारण त्यामागे त्यांचे हृदय प्रेमार्त अंतर बोलत असते. अत्यंत अलंकारिक भाषा जर ती श्रद्धा व आत्मियता यांनी ओलावलेली नसेल, तर ती संतांना अर्थशून्य वाटते. त्यामुळे कुणी कवी वा कलाकाराने मी बाबांचे जीवन रंगवीत आहे, असा व्यर्थ अहंकार धरू नये. भक्ताचे, लेखन-सेवेचे कोडकौतुक पुरविण्यासाठी बाबाच त्याला प्रेरित असतात. आम्ही नम्र शरणागतीने त्यांच्यासमोर उभे रहायचे. तेच आम्हाला स्फूर्ती, शैली व सामर्थ्य देतील. या भावनेने मी लेखणी चालवीत आहे. यापुढे योग्य वेळी भीष्म, गणू, दाभोलकर हे लेखक येणार असल्याने ही प्रस्तावना.)


## चिलीम :

**पहिल्या भेटीच्या आठवड्यांत एके दिवशीं बाबांजवळ बसलों असतां बाबांनीं अबदूल यास हांक मारली व म्हणाले, धुनींतली चिलीम आण. त्यानें चिलीम बाबांजवळ देतांच बाबा त्याच्यावर संतापले व स्वत: चिलीम दुरुस्त करूं लागले. श्री साईबाबा कोणतीही गोष्ट स्वहस्तें करूं लागले म्हणजे ते इतक्या नाजूक रीतीनें व कुशलतेनें करीत असत कीं ते त्यांचें कृत्य पहाण्याची मोठी मौज असे. बराच वेळ ती साफ केल्यावर मजकडे पाहून म्हणाले, "भाऊ, ही पहा आतां कशी चांगली दिसते, नाहींतर त्यानें आणली तेव्हां कशी वेडी वांकडीं होती." मी धीर करून म्हणालों, "बाबा, ती आपण स्वत: केलीत म्हणून इतकी चांगली दिसते." बाबा म्हणाले, "मी नाही बा ही नीट केली. ही त्वां मला दिली." मी हांसत म्हणालों, "बाबा, मीं केव्हां आपणास ही दिली?" ते म्हणाले, "अरे, आज सहा वर्षें झालीं त्वां दिलेली चिलीम मी ओढतों." असे म्हटल्यावर मी स्तब्ध झालों व श्रींस नमस्कार केला. पण त्या सर्व संभाषणाचा खुलासा अजून मला झाला नाही.**

**– कै. रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ**
प्रधान यांना आलेल्या अनुभवांपैकी
हा एक अनुभव

ग्रंथ परिचय

– डॉ. ग. प्र. परांजपे



# शोधबुद्धीने घेतलेला प्रासादिक परामर्श 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी'

**मा**नवी जीवनात संतांचे कार्य फार महत्त्वाचे आहे. मानवी जीवन सुखदु:खमय असल्याने त्यात समत्वबुद्धीने कसे जगावे याचा ज्ञानबुद्धियोग संतपरंपरेने शिकविला, आचरणाने व्यवहृत केला, समाजापुढे आदर्श प्रस्थापित केला. त्यामुळे संतांच्या जीवनातून मानवाचे बहुआयामी दर्शन घडते. डॉ. अशोक प्रभाकर कामत यांच्या **'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी'** या ग्रंथाने ते कार्य केले आहे. वारकरी संप्रदायातील संतांच्या चरित्रांचा आढावा घेणाऱ्या या ग्रंथाला त्यामुळेच महत्त्व आहे.

डॉ. अशोक कामत समन्वयवादी म्हणूनच प्रसिद्ध आहेत. संतविषयक त्यांचे लेखन अत्यंत मार्मिक असते. त्यांची या ग्रंथाची भाषा सरळ, सोपी आहे. प्रस्तुत विषयाचा आत्यंतिक जिव्हाळा त्यातून दिसतो. त्यामुळे ग्रंथ प्रासादिक झाला आहे. पुण्याच्या गोकुळ मासिक प्रकाशनाने प्रकाशित केलेले 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' हे २२९ पृष्ठांचे पुस्तक संतवाङ्मयाच्या, विशेषत: वारकरी संप्रदायाच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे. या संप्रदायातील इतर संतांच्या चरित्राची माहिती अत्यंत मोजक्या, चटकदार शब्दांत येथे संकलित झाल्यामुळे या प्रकाशनाला महत्त्व असून आजची महत्त्वाची गरज पूर्ण होत आहे. आणखी एका वैशिष्ट्याचा उल्लेख आवश्यक ठरतो, तो हा की प्रस्तुत ग्रंथाला संतवाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक श्री. स. कृ. देवधर यांची प्रस्तावना लाभली आहे. येथे पांडित्याचा झगमगाट नाही. लहानमोठ्या संशोध्य विषयांना स्पर्श अवश्य आहे, पण लेखक त्या जाळ्यात अडकलेले नाहीत.

भक्तराज पुंडलिकापासून थेट निळोबारायांपर्यंत सर्व संतांचा परामर्श घेताना त्या त्या संतांचे जीवनचरित्र मोजकेपणाने मांडून मग त्यांच्या कार्याची ओळख करून दिलेली आहे. तसं म्हटलं तर संतांच्या लौकिक इतिहासालाही महत्त्व आहेच. पूर्वी दोन ज्ञानेश्वरांचा वाद कितीतरी काळ चालू होता! पण प्रा. कामतांनी सामान्यत: महत्त्वाच्या अशा वादस्थळांचे उल्लेख करूनही वादविवाद टाळल्याचे दिसते. त्यांच्या लेखनाचे सूत्र संतकार्याचे अवलोकन हेच राहिले आहे, असे दिसते. अद्वैत तत्त्वज्ञानाचे सूत्र ते अंगिकारतात. वाचकालाही ते तिकडेच खेचतात. संत सेना यांच्या चरित्राचा आढावा घेताना ते उत्तरेकडले की महाराष्ट्रातले या विषयाचे मार्मिक स्पष्टीकरण ते करून जातात (पृ. १७८ ते १८४). मुक्ताबाईंच्या गुरूसंबंधीची चर्चा (पृ. ५५, ७५) अशीच चपखलपणे मांडलेली आहे. 'सोपानदेवी' ग्रंथाबद्दल डॉ. तुळपुळे व कानडे यांचे नकारात्मक संदर्भ देऊन (पृ. ३८) ते पुढे गेले आहेत. निवृत्तीनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई या तिन्ही प्रकरणांत ज्ञानेशांशी साधर्म्य चर्चा केली आहे. पृ. ६० वर मुक्ताबाईंबरोबर विसोबा–नामदेव यांच्यातील साधर्म्यावर प्रकाश टाकला आहे. 'खेचर' या शब्दाबद्दलचा त्यांचा ऊहापोह मार्मिक वाटतो. मात्र 'खेचरीयोगमुद्रा' या विषयाचा उल्लेख करून तो प्रश्नचिन्ह रूपाने सोडून दिलेला आहे (पृ. ९२). या निमित्ताने डॉ. रा. चि. ढेरे यांच्या अलिकडेच प्रकाशित झालेल्या 'षट्स्थल' ग्रंथाचे आधार घेऊन केलेले विवेचनही चांगले झाले आहे. तसेच वटेश्वर चांगदेवांचा ऊहापोहही (पृ. ७५) मार्मिक आहे.

संत जनाबाई स्वत:स 'दासी' म्हणवून घेत असत. डॉ. कामत यांनी 'दासी'पणाची केलेली चर्चा उत्तम आहे. त्या 'दासी' नव्हत्या, तर संत श्री नामदेवांच्या 'शिष्या' (शिष्य = दास) होत्या, हे आग्रहाने प्रतिपादिले आहे (पृ. १५७). जनाबाईंचे अंतरंग त्यांच्या अभंगांतून कसे व्यक्त होते, तेही डॉ. कामतांनी यशस्वीपणे दाखविले आहे.

भक्तराज पुंडलिकाचे प्रकरण महत्त्वाचे आहे. वारकरी संप्रदायामध्ये असलेल्या पुंडलिकासंबंधीच्या सर्व धारणांचा परामर्श घेतला असून तेलुगु, कानडी व संस्कृत वाङ्मयातील पुंडलिकाचे संदर्भ येथे दिलेले आहेत, ते मोलाचे वाटतात. पुंडलिकाच्या ऐतिहासिक काळाच्या संदर्भात शंकराचार्यांच्या स्तोत्राचा विषयही मार्मिक आहे.

डॉ. कामत हे हिंदी साहित्यातले 'वाचस्पति' असल्याने हिंदी साहित्यातून येणारे मराठी संतांचे संदर्भ त्यांनी अचुकपणे नोंदविलेले आहेत. तसेच विविध मासिके, पाक्षिके यांच्या कर्तृत्वाचा उल्लेखही ते आवर्जून करतात (स्वस्तिश्री – पृ. ३७).

आजच्या काळाचा विचार करता चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या बाबतीत संतवाङ्मयाचा परामर्श घेताना आजची प्रमाणे वा कल्पना त्यांच्यावर लादणे समयोचित नाही. जनाबाई 'उपेक्षितांच्या प्रतिनिधी' (पृ. १५४) वा सेनाच्या बाबतीत 'नापिताचे शापित जीवन'

# ईश्वरनिष्ठांची मांदियाळी



## डॉ. अशोक प्रभाकर कामत

(पृ. १७८) हे उल्लेख खटकतात. त्या बाजूने अनेक स्पष्टीकरणे असू शकतात म्हणून असे उल्लेख नसतील तर बरे, इतकेच! 'एकविधाभाव, भक्तांचा स्वधर्म' याद्दृष्टीने नरहरी कट्टर शिवभक्त! मात्र प्रामाणिक. म्हणूनच 'शिवविष्णुऐक्य' हा चमत्काराचा विषय झाला. पृ. १३३ वरील विधान यामुळेच पटणारे नाही. चमत्कार हाही एक चर्चेचाच विषय. चमत्कारांचेही काहीसे तर्कयुक्त अर्थ लावण्याचा प्रयत्न डॉ. कामतांनी केला आहे (पृ. १२७, १०५, १४५), पण तो तितकासा सफल नाही.

पृ. २१८ वर वारकरी संप्रदायाचे समर्थपंचायतन म्हणून चारच संतांचा निर्देश आहे. एकनाथांचा उल्लेख त्यात हवा होता. या ग्रंथात एकनाथ, ज्ञानदेव व तुकाराम यांची प्रकरणे थोडक्यात घातली असती तर बरे झाले असते. भागवत संप्रदायातल्या सर्व संतांच्या परिचयाच्या दृष्टीने ते उपयुक्त झाले असते.

समर्थकृत ज्ञानदेवांची आरती हा अजूनही चर्चेचा विषय आहे. डॉ. कामतांनी त्यासंबंधी काही लिहिले असते तर ते उपयुक्त झाले असते. लेखकाचे स्वत:चे मनोगत या ग्रंथात नाही, ही गोष्ट काही प्रमाणात तरी खटकते. तसेच 'ठळक आधार' दिले असले तरी नेहमीची पद्धतीच (विधानांवर अंक देऊन पृष्ठांकासह ग्रंथनिर्देश) योग्य झाली असती. त्यामुळे विशिष्ट विधानांना संदर्भांचा नेमकेपणा नाही (गोस्वामी – पृ. ४८).

अशा काही उणिवांचा विचार सोडला तर संतवाङ्मयामध्ये या ग्रंथाने मोलाचीच भर पडली आहे, असे म्हणावे लागेल.

पुस्तकाचे नाव : ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
लेखक : डॉ. अशोक प्रभाकर कामत
प्रकाशिका : सौ. प्राची प्रदीप चिकटे
गोकुळ मासिक
प्रकाशनाकरिता, ११९४,
सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०.
पृष्ठे : २२९
मूल्य : रु. ९०

पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्री. स. कृ. देवधर म्हणतात.... ज्ञानदेवांच्या काळी अठरापगड जातींमध्ये थोर थोर संत झाले. परंपरागत शास्त्रार्थाच्या कठोरतेला या सर्वांनाच तोंड द्यावे लागले. शास्त्रापेक्षा शास्त्रकर्माला आपलासा करण्यात या महात्म्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. यामुळे शास्त्राच्या मर्यादा आणि बंध यांना बांधू शकले नाहीत. शास्त्रांनी वादंग सोडून यांचा आदर्श मानावा आणि उगी राहावे असे मोठेपण या महात्म्यांना लाभले होते. परंतु झाडाखाली झाड फुलत नाही या निसर्गनियमाप्रमाणे सर्वश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या छायेत या संतांचे विसावलेले मोठेपण लोकांना माहीत करून देण्याच्या संकल्पावर या ग्रंथाचे रूप आकारले आहे.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीत असलेले परंतु खऱ्या अर्थाने जनसामान्यांना ज्ञात नसलेले हे संत या ग्रंथामुळे सर्वांच्या समोर येत आहेत. ह्या संतांचे वैभव वर्णिताना, त्यांचे मूलस्थान, त्यांची ईश्वरभक्ती आणि ईश्वरभक्तीच्या भक्तिरसाने आर्द्र झालेली अक्षरवाणी यांचा शोधबुद्धीने परामर्श लेखकाने घेतला आहे. एकेका संतावर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्यत्र अन्य भाषकांनीही मोलाचे संशोधन केले आहे. याचा उल्लेख करायला ग्रंथकार विसरत नाहीत. विद्वानांतील मतभेद तसेच ठेवून, संतांच्या जीवनातील अद्वैताची कहाणी सांगताना लेखक त्यात हरवून गेला आहे असे वाटते. केवळ शुष्क वाद आणि पांडित्याच्या जंजाळातून हा ग्रंथ साकारण्याचा प्रयत्न केला गेला असता, तर तो ग्रंथही शुष्क झाला असता.